# साहित्य

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२६



९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

## ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील

# साहित्य

**मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक**

स्थापना : जानेवारी १९४७

## जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२६

**संपादक मंडळ**

श्री. एकनाथ आव्हाड, श्री. चंद्रशेखर गोखले, प्रा. प्रतिभा बिश्वास

**या अंकाचे संपादक**

श्री. एकनाथ आव्हाड

**प्रकाशक**

प्रा. प्रतिभा सराफ

मुखपृष्ठ : प्रदीप म्हापसेकर

अक्षरजुळणी : ग्रंथाली

मुद्रितशोधन : अनिल दाभाडे

आतील मांडणी, सजावट चित्रे : सतीश खानविलकर

छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई ४०००३१

- मूल्य तीस रुपये, वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/–
  द्वैवार्षिक वर्गणी रु. ४००/–
- धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.
- NEFT S/B A/C No. 002200100046717
  IFSC : SRCB0000002
  Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum
  (वर्गणी पाठवल्यावर साहित्य संघाच्या भ्रमणध्वनीवर कळवावे)



**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई ४००००४. भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६
इ–मेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाईट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** एकनाथ आव्हाड, शृंगारपुरे हाउस, ए विंग, फ्लॅट नं. १, १०वा रोड,
सांडू गार्डन बसस्टॉपच्या बाजूला, चेंबूर, मुंबई ४०००७१
भ्रमणध्वनी : ९८२१७७९६८ इ–मेल : eknathavhad23@gmail.com



या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.
या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रम


- संपादकीय / २

- **लेख –** विश्वास पाटील : व्यक्ती आणि वाङ्मय एक दृष्टिकोन
  डॉ. बाळासाहेब लबडे / ३

- **लेख –** शब्दसृष्टीचे ईश्वर साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख / ४४
  डॉ. प्रिया निघोजकर

- **लेख –** हाय! ही माय रडते आहे! / ५०
  डॉ. संध्या पवार

- **कथा –** नातीगोती / ५३
  बा. बा. कोटांबे

- **लेख –** मराठी साहित्य संमेलनातील बालमेळाव्यांचे महत्त्व / ७४
  डॉ. कैलास दौंड

- **कविता –** अंजली ढमाळ, सचिन अनिल मणेरीकर, प्रीती विलास जगझाप, श्रीकृष्ण राऊत, अजय कांडर, सतीश लोथे / ७९ ते ८४

- **पुस्तकपरिचय** – प्रा. प्रतिभा बिश्वास
  एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी – संगीता अरबुने, अभिराम प्रहर – भारती बिर्जे-डिग्गीकर, कन्फेशन – विजय खाडिलकर, सप्तरंगी कोरिया : एक अनुभव – सुधा हुजूरबाजार-तुंबे, दिव्यत्वाच्या पारंब्या – श्याम दाभाडे / ८५ ते ९०

- **कार्यवृत्तांत –** प्रा. प्रतिभा सराफ (साहित्य शाखा) / ९१

# संपादकीय

मुंबई मराठी साहित्य संघाचे मुखपत्र असलेला साहित्य (जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२६) हा त्रैमासिक अंक आपल्या हाती सुपर्द करताना मनापासून आनंद होत आहे.

विश्वास पाटील हे मराठी साहित्यातील एक अग्रगण्य ऐतिहासिक कादंबरीकार व सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक आहेत. 'पानिपत', 'झाडाझडती' (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी) यांसारख्या प्रचंड गाजलेल्या त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक तथ्ये व नाट्यमयतेचा संगम साधणारे ते एक व्यासंगी लेखक तर आहेतच शिवाय ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते विद्यमान अध्यक्षही आहेत. यानिमित्ताने 'विश्वास पाटील : व्यक्ती आणि वाङ्मय एक दृष्टिकोन' हा प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांनी लिहिलेला अभ्यासपूर्ण असा मुख्य लेख आपल्याला या अंकात वाचता येईल.

त्र्यंबक विनायक सरदेशमुख हे एक प्रख्यात मराठी कादंबरीकार, कवी आणि समीक्षक होते. बखर एका राजाची, उच्छाद, डांगोरा एका नगरीचा, ससेमिरा या त्यांच्या कादंबऱ्या विशेष प्रसिद्ध आहेत. सरदेशमुख यांच्या लेखनात आध्यात्मिक मूल्ये आणि मानवी जीवनातील शोकात्मता यांचे सखोल चित्रण आढळते. सरदेशमुख यांच्याच साहित्यावर पीएच.डी. केलेल्या डॉ. प्रिया निघोजकर यांनी लिहिलेला 'शब्दसृष्टीचे ईश्वर साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख' हा लेख विशेष वाचनीय झाला आहे. विद्यार्थीप्रिय शिक्षिका, सामाजिक कार्यकर्त्या आणि सुप्रसिद्ध लेखिका डॉ. संध्या पवार यांचा 'हाय! ही माय रडते आहे.' हा लेख गावाचं शहरीकरण झाल्यावर नक्की काय बदलतं? यावर विचार करायला लावणारा आहे.

ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी कौटुंबिक नातेसंबंधावर बेतलेली ग्रामीण कथाकार बा.बा. कोटांबे यांची 'नातीगोती' ही ग्रामीण कथा आपल्याला या अंकात वाचता येईल. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि बालसाहित्यात मोलाचे योगदान देणारे डॉ. कैलास दौंड यांचा 'मराठी साहित्य संमेलनातील बालमेळाव्याचे महत्त्व' हा लेखही आपल्याला या अंकात वाचायला मिळेल.

शिवाय अंजली ढमाळ, प्रीती जगझाप, अजय कांडर आणि सतीश लोथे यांच्या आशयगर्भ कविता तसेच श्रीकृष्ण राऊत आणि सचिन मनेरीकर यांच्या सहज सुंदर गझला या अंकात आहेत. प्रा. प्रतिभा बिश्वास यांनी संगीता अरबुने, भारती बिर्जे–डिग्गीकर, विजय खाडिलकर, सुधा हुजूरबाजार–तुंबे, श्याम दाभाडे त्यांच्या पुस्तकांचा करून दिलेला नेटका आणि नेमका परिचय या अंकात आहे. एकूणच असा भरगच्च मजकूर या अंकात आपल्याला वाचायला मिळेल. यासाठी सर्व लेखक, कवींचे मनापासून आभार. तसेच अंकाच्या प्रकाशक प्रा. प्रतिभा सराफ यांचेही अंकासाठी मोलाचे मार्गदर्शन लाभले त्यांचेही मनापासून आभार.

तसेच या काळातील साहित्य संघाचा कार्यवृत्तांतही अंकात समाविष्ट केला आहे.

हा अंक आपल्याला कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. आपल्या पत्राची वाट पाहतोय. सर्वांना नूतन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! आता आपली भेट पुढील अंकात. धन्यवाद.

**– एकनाथ आव्हाड**
भ्रमणध्वनी : ९८२१७७७९६८

# विश्वास पाटील
# व्यक्ती आणि वाङ्मय एक दृष्टिकोन

डॉ. बाळासाहेब लबडे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे ही कोणत्याही साहित्यिकास आनंददायी बाब असते. त्यादृष्टीने जानेवारी २०२६ मध्ये साताऱ्यात संपन्न होत असलेल्या या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून विश्वास पाटील यांच्या निवडीचे महत्त्व अधिकच वाढते, कारण ते आजच्या मराठी साहित्यातील अत्यंत प्रभावी, लोकप्रिय, संशोधननिष्ठ आणि चिंतनशील कादंबरीकार आहेत.

त्यांचा साहित्यप्रवास समाज, न्याय, इतिहास, पर्यावरण, विस्थापन, मानवी संवेदना आणि सांस्कृतिक संघर्ष या विषयांना स्पर्श करणारा आहे. ऐतिहासिक कादंबरीला नव्या रूपात, नव्या परिमाणात उभे करणारे ते मराठीतील आघाडीचे कथनकार आहेत. त्यांच्या साहित्याने मराठी वाचकवर्गाला चिंतनशीलता, इतिहासाचा अभिमान आणि वर्तमानाची जागरूकता दिली आहे.

त्यांची अनेक पुस्तके भारतातील विविध भाषांत अनुवादित झाली असून त्यांनी मराठी साहित्याला जागतिक पातळीवर स्थान मिळवून दिले आहे : The Great Derangement : the climate change and Unthinkable by Amitave Ghosh 2016, तसेच सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार व कवी सुनील गंगोपाध्याय यांनी देश नावाच्या पाक्षिकांमध्ये पाटील यांच्या 'महानायक' कादंबरीचा गौरव करणारा खास लेख लिहिला होता, २००५ मध्ये.

अमिताभ घोष यांनी 'झाडझडती' कादंबरीचे अनेकदा विशेष कौतुक केले आहे.

वाचकवर्गाने त्यांना मोठी पसंती दिलेली आहे. सध्या त्यांच्या शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'महासम्राट' या शीर्षकांतर्गत सिक्वेल कादंबऱ्या

प्रकाशित होत आहेत. त्यांची तिसरी याच विषयावरील ‘आग्र्यावरून सुटका अर्थात अस्मान भरारी’ ही कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे. तिचा सुपुर्द सोहळा प्रवीण तरडेंच्या हस्ते रायगडावर संपन्न झाला. दीर्घकालीन सातत्यपूर्ण प्रेरणादायी लेखन हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. एकापेक्षा एक कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. काही कादंबऱ्यांवर चित्रपट सुद्धा निर्माण झालेले आहेत. ते गाजलेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांच्या दर्दभरी दास्तानवर त्यांनी लिहिलेले आहे. तर चित्रपटांच्या मर्मग्राही आणि दुर्लक्षित बाबींची समीक्षा केली आहे.

साहित्याचा किल्ला सर करताना –

विश्वास पाटील यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९५९ रोजी महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील नेरले या खेड्यातील शेतकरी कुटुंबात झाला.

त्यांनी एम.ए. (इंग्रजी साहित्य) आणि कायद्याची पदवी (LLB) घेतली.

त्यानंतर ते भारतीय प्रशासकीय सेवेत गेले. भारतीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या पार पाडल्या.

त्यांच्या प्रशासकीय अनुभवाने, विशेषतः ग्रामीण महाराष्ट्र, विकास योजना, विस्थापित लोकांचे प्रश्न अशा समाजघटकांशी प्रत्यक्ष संवाद, त्यांना समाजसंवेदनशील बनवले, जे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्पष्ट दिसते.

मराठी साहित्यात गेल्या तीन–चार दशकांत इतिहासाभिमुख कादंबरीला नवीन आकार, नवीन ऊर्जा आणि नवीन व्यासपीठ देणाऱ्या काही महत्त्वाच्या नावांपैकी एक नाव म्हणजे विश्वास पाटील. इतिहास, सामाजिक न्याय, पर्यावरण, राजकारण, युद्धनीती, मानवी संघर्ष, प्रेम आणि सांस्कृतिक स्मृती यांच्या विस्तीर्ण पटावर त्यांनी ज्या ताकदीने लेखन केले आहे, त्यामुळे ते आजच्या मराठी वाङ्मयातील अत्यंत प्रभावी कथनकार म्हणून ओळखले जातात. त्यांना इंदिरा गोस्वामी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

अगदी बालपणापासूनच त्यांनी कादंबरी लेखनाला प्रारंभ केला. आज सुद्धा ते अतिशय उत्साहाने साहित्य सेवा करत आहेत. वेगवेगळ्या माध्यमांतून धडाडीने बोलताना दिसतात. त्यांची बोलण्याची आणि लिहिण्याची शैली धडाडीची, प्रस्तुती भावनाप्रधान आणि संशोधनावर आधारित आहे. ते व्यक्तिशः अत्यंत शिस्तीचे, परिश्रमी, स्वाभिमानी आणि ऐतिहासिक–राष्ट्रीय मूल्यांबद्दल कटिबद्ध असलेले लेखक आहेत. सत्याला सत्य आणि असत्याला असत्य म्हणणारे लेखक म्हणजे विश्वास पाटील. त्यांची साहित्य संपदा पाहता ती विपुल आहे. त्यात कथा, कादंबरी, चित्रपट समीक्षा, व्यक्ती समीक्षा, यांचा समावेश आहे. साहित्य अकादमीचे ते सध्या निमंत्रक आहेत आणि झाडाझडती कादंबरीसाठी साहित्य अकादमी पुरस्काराने



त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

अशा या सर्जनशीलतेच्या प्रवासामागे त्यांच्या आयुष्यातील काही निर्णायक व्यक्तिमत्त्वांचा, अनुभवांचा आणि आत्मिक प्रेरणेचा मोठा वाटा आहे. रणजित देसाई यांच्याशी झालेला सखोल संवाद, साहित्यिक पूर्वसुरींचा आशीर्वाद आणि कोल्हापूरच्या संस्कृतीतून मिळालेली ऊर्जा हे सर्व विश्वास पाटील यांच्या निर्मितीचे मूलाधार बनलेले दिसते.

'झाडाझडती'च्या प्रकाशनावेळी दादांनी दाखवलेला विश्वास, दिलेला आशीर्वाद आणि त्यांनी व्यक्त केलेले शब्द या पायऱ्यांवरून मला तुझ्या शब्दांनीच खेचून वर आणले आहे.

यातून एका ज्येष्ठ साहित्यसम्राटाने एका तरुण लेखकाच्या शक्तीची घेतलेली दखल दिसते. हा क्षण विश्वास पाटील यांच्या लेखनाला केवळ प्रोत्साहनच नाही तर आत्मविश्वासाचे पंख देणारा ठरला. दादांनी वर्तवलेला विश्वास पुढे साहित्य अकादमी पुरस्कारासारख्या यशात मूर्त स्वरूपात फलद्रूप झालेला दिसतो.

देसाईंच्या 'स्वामी', 'राधेय', 'श्रीमान योगी' सारख्या कादंबऱ्यांनी इतिहासाला

स्पंदन देण्याचा जो उच्च आदर्श निर्माण केला, त्याच परंपरेतील गंभीरता, तन्मयता आणि भव्यता विश्वास पाटील यांनी स्वतःच्या लेखनात अंगीकारली.

त्यांच्या मते, कोल्हापूरची मातीच त्यांची साहित्यकार म्हणून घडण आहे. ही माती शिवाजी सावंत, रणजित देसाई, डॉ. आनंद यादव, चंद्रकुमार नलगे यांसारख्या भारदस्त साहित्यिकांचे पाळणाघर. या परंपरेचे वाळवंट नसून निसर्गाने समृद्ध आणि संस्कृतीने परिपूर्ण असे क्षेत्र त्यांच्या संवेदनांना आकार देणारे ठरले.

या भूमीतील इतिहास, लोककला, संघर्षशील जनजीवन, सजलेली परंपरा हे सर्व त्यांच्या लेखनाच्या मुळाशी आहे. 'पानिपत' किंवा 'झाडाझडती' असो, प्रत्येक कादंबरीत समाज, संस्कृती आणि इतिहास या त्रिसूत्रीचा गंध जाणवतो. त्यांचा साहित्यकुटुंबाशी असलेला भावनिक संपर्क हेही त्यांच्या सर्जनशीलतेचे इंधन आहे. रणजित देसाई-माधवी देसाई यांचा स्नेह, मित्रत्व, लेखनावरील चर्चा या सर्वांमधून त्यांना साहित्याचा आत्मा समजला. विशेषतः, चित्रकार, संगीतकार, चित्रपट-कलाकारांचा संग, साहित्यिकांच्या आठवणी, वि.स. खांडेकरांसारख्या दिग्गजांचे किस्से, त्यांच्या वाङ्मयीन उमलत्या काळामध्ये या तीन-चार व्यक्तींनी त्यांना प्रचंड सहकार्य केले; त्यांची नोंद होणे, आवश्यक आहे. ग्रामीण कथाकार आनंद यादव, समीक्षक पाठीराखे श्री शंकर सारडा, डॉक्टर म.द. हातकणंगलेकर यांचा सहवास आणि मार्गदर्शन खूप लाभले.

या सर्वांनी त्यांच्या जगण्याला साहित्यिक रंग दिला. त्यांच्या कादंबऱ्यांची ताकद त्यांच्या प्रत्यक्ष निरीक्षणातून येते. ग्रामीण जीवन, शोषितांचे दुःख, संघर्षाचे तपशील, ऐतिहासिक घटना हे ते केवळ लिहीत नाहीत, तर जगतात.

'झाडाझडती'मधील समाजपरिवर्तनाचा वेध असो किंवा 'पानिपत'चा ऐतिहासिक कालपट-दोन्ही ठिकाणी वास्तवाला भिडणारा काव्यात्मक भाषाभिनय दिसतो. ही निष्ठा त्यांच्या अनुभवांमधूनच घडलेली आहे. १९८५ मधील दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनात त्यांच्या पहिल्या कादंबरीला मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या साहित्यप्रवासातील दिवट्या पेटवणारा क्षण ठरला. रणजित देसाईंच्याच हस्ते मिळालेल्या त्या गौरवाने त्यांच्या लेखनाच्या पायाभरणीला पहिली पावती दिली. यामुळेच त्यांच्या लेखनात भव्यता, संशोधन, भाषिक सौंदर्य आणि जनमानसाला भिडणारी भावविश्वाची भरणपोषण करणारी ठरली. त्यांच्या साहित्य-प्रवासाची पायाभरणी त्यांच्या तीन महान गुरूंच्या आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे आणि र.वा. दिघे यांच्या प्रभावातून झाली आहे. स्वतःचे साहित्यिक कार्य सुरू करण्यापूर्वी या तिघांच्या उंबरठ्यावर माथा टेकून कृतज्ञता व्यक्त करणे, ही त्यांची गुरुभक्ती आणि साहित्यपरंपरेप्रती निष्ठा अधोरेखित करणारी भूमिकाच होय.

१. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे - वाङ्मयीन तेजाचे मार्गदर्शक

आचार्य अत्रे हे विनोद, व्यंग, पत्रकारिता, नाटक, राजकारण आणि साहित्य अशा सर्व क्षेत्रांत तेजस्वी ठसा उमटवणारे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या भाषेची धार, निर्भीड अभिव्यक्ती, आणि लोकसंदेशाला कलात्मक रूप देण्याची विलक्षण ताकद त्यांच्या लेखनाचीही प्रेरणा आहे. अत्र्यांच्या प्रखर विचारांनी आणि धाडसी मांडणीने त्यांना साहित्यिक निडरतेचा संस्कार दिला.

२. अण्णाभाऊ साठे - लोककथेतील जीवनसत्त्वाचा वारसा

अण्णाभाऊ साठे हे शोषित-वंचित समाजाचे संवेदनशील गाथागायक. त्यांच्या कथांमध्ये माणूस, त्याचे दुःख-संघर्ष आणि त्यातील कणखर आशा हे केंद्रबिंदू असतात. त्यांच्या 'लोकशाहीर' वृत्तीनं त्यांना जनमानसाशी जोडणारी लेखनदृष्टी मिळाली. सामाजिक वास्तव, अस्मितावाद आणि मानवी संघर्षाचे चित्रण करण्याची ताकद त्यांनी अण्णाभाऊंकडून आत्मसात केली.

३. र.वा. दिघे कादंबरीतल्या सूक्ष्म वास्तवाचे गुरू होते. त्यांची सराई, पाणकळा, आई आहे शेतात यांसारख्या कादंबऱ्या ग्रामीण जगण्याचा अस्सल स्पर्श देणाऱ्या. या लेखनातून भावनिक गुंतागुंत, श्रमजीवी जीवन आणि मातीतल्या माणसांचे अंतरंग उलगडते. त्यांनी इतिहासकथन आणि सामाजिक कथानक यांना मानवतावादी दृष्टिकोनातून पाहण्याची कला दिघेकडून आत्मसात केली.

४. प्रसिद्ध हायकूकार आचार्य अत्रे यांच्या कन्या शिरीष पै यांच्याबद्दल त्यांना प्रचंड आदर आहे. विश्वास पाटील यांच्या साहित्याला प्रथम व्यासपीठ त्यांनीच मिळवून दिले.

त्यांनी साहित्यप्रवेश केवळ कथा सांगण्यासाठी केला नाही; तर इतिहासातील मूक कोपरे उजेडात आणण्यासाठी केला. मराठीमध्ये परंपरेने ऐतिहासिक, ग्रामीण, रहस्य, कादंबरी विद्यमान होती. ना.स. इनामदार, र.वा. दिघे, बाबुराव अर्नाळकर, अण्णाभाऊ साठे, वि.स. खांडेकर या लेखकांनी तिची पायाभरणी केली होती. परंतु त्यांनी त्या पायावर संशोधन, युद्धतंत्र, जीवंत दृश्यनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ तिला जोडले. त्यांच्या लेखनविश्वाला आकार देणाऱ्या प्रेरणास्थानांमध्ये कवी कुसुमाग्रजांचे (वि.वा. शिरवाडकर) नाव सर्वात अग्रस्थानी येते. कुसुमाग्रजांच्या प्रतिभेसमोर उभे राहणे म्हणजे एका काव्यगंगेशी संवाद साधल्यासारखे, आणि त्यांच्याकडून शब्दांच्या तेजाचा, माणुसकीच्या भावनेचा व कलात्मक शिस्तीचा संस्कार घेणे हीच भावना त्यांच्या लेखनातून जाणवते. त्यांची फेसबुकवॉल, त्यांचे विश्वास पाटील यूट्युब फॅन चॅनेल, वाचकांनी भरून असते. त्यात नावीन्यपूर्ण पोस्ट असतात. केवळ स्वतःविषयी ते बोलत नाहीत तर समाजात जे-जे चांगलं आहे,

त्याच्याविषयी आवाज उठवत राहतात.

त्यांनी तरुण लेखक म्हणून पहिले पाऊल टाकताना ते नाशिकमध्ये कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, प्रभाकर पणशीकर यांसारख्या दिग्गजांच्या सान्निध्यात राहिले. या सान्निध्यातून साहित्य म्हणजे केवळ शब्दांचे जाळे नव्हे, तर संवेदनेची, विचारांची आणि नितळ कलात्मकतेची जबाबदारी आहे, ही शिकवण त्यांना कुसुमाग्रजांकडून मिळाली.

कुसुमाग्रजांच्या कवितांतील भव्यता, करुणा, मानवी संघर्षाचे सौंदर्य आणि कल्पनाशक्तीची प्रखरता या सर्वांचा ठसा त्यांच्या लेखनशैलीत आढळतो. 'कणा' मधील वास्तवदर्शन असो किंवा 'मौन'मधील अंतःप्रेरणा या ओळी विश्वास पाटील यांच्या साहित्यबुद्धीला सातत्याने मार्गदर्शन करत राहिल्या.

कुसुमाग्रजांनी सांगितलेली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतिहासाचे संपूर्ण ओझे अंगावर घेण्याची गरज नाही; कलाकाराला त्यातून गवसलेले संचित नव्या अर्थाने व्यक्त करता येते. हीच शिकवण त्यांच्या पानिपत सारख्या भव्य कादंबऱ्यांमध्ये प्रकर्षाने दिसते. इतिहासाला केवळ तथ्यरूप न मांडता, त्यातली मानवी घालमेल, भावविश्व आणि संघर्ष नव्या भव्यतेने रेखाटण्याची दृष्टी त्यांना गुरुस्थानी असणाऱ्या कुसुमाग्रजांकडूनच लाभली.

कुसुमाग्रजांच्या जन्मभूमीला नमस्कार करताना ते स्पष्ट करतात की तात्यांचे शब्द, त्यांच्या कविता आणि त्यांचा आशीर्वाद हेच त्यांच्या साहित्यिक आयुष्याची खरी शिदोरी आहे. लेखक म्हणून नम्रता, कलाकृतीशी निष्ठा आणि मायमराठीबद्दलची खोल भक्ती ही मूल्येही कुसुमाग्रजांच्या संस्कारातूनच त्यांनी उचलली.

कुसुमाग्रजांनी पानिपतला दिलेले कौतुक, घरापर्यंत येऊन केलेली भेट, आणि तरुण लेखकावर दाखवलेला विश्वास ही यांच्या मनातील कायमस्वरूपी उजळ आठवण आहे. त्यांच्यासाठी कुसुमाग्रज हे साहित्यिक मार्गदर्शकच नव्हे तर प्रेमाने पाठ थोपटणारे गुरुवर्य आहेत.

त्यांच्या साहित्याचा आत्मा समजून घ्यायचा असेल, तर कुसुमाग्रजांचे स्थान समजणे गरजेचे आहे. कुसुमाग्रजांनी दिलेली सौंदर्यदृष्टी, शब्दांतील तेज, मानवी मूल्यांचे भान, आणि इतिहासाला नव्या दृष्टिकोनातून पाहण्याचे धैर्य हे सर्व विश्वास पाटील यांच्या लेखनाचा पाया आहेत. त्यांच्या साहित्यप्रवासात कुसुमाग्रज हे दीपस्तंभासारखे उष्मा देणारे, मार्ग दाखवणारे, आणि सतत प्रेरणा देणारे ठरले आहेत.

# विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या

## १. पानिपत

पानिपतचे तृतीय युद्ध हे महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वाधिक वेदनादायी आणि आत्मपरीक्षणाला प्रवृत्त करणारे पर्व. या अडीचशे वर्षांपासून काळजात रुतलेल्या जखमेचे रूपांतर विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या कादंबरीने एका व्यापक, जिवंत आणि वस्तुनिष्ठ ऐतिहासिक कथेत केले.

जवळपास पाचशे पानांचे भव्य स्वरूप, नवख्या लेखकाची सुरुवात, आणि ऐतिहासिक विषयाचे गांभीर्य या सर्व शक्य शंका-संशयांवर कादंबरीने आपल्या कथनशैलीच्या, संशोधनाच्या आणि भावनिक आवाहनाच्या सामर्थ्याने मात केली. मराठी साहित्यविश्वात पाऊल ठेवताच या कादंबरीने कुसुमाग्रज, वसंत कानेटकर यांसारख्या दिग्गजांचेही कौतुक मिळवले, आणि सामान्य वाचकांना मोहून टाकले.

मुंबई आकाशवाणीच्या सर्वेक्षणात गेल्या ५० वर्षांतील सर्वोत्कृष्ट १० मराठी पुस्तकांमध्ये 'पानिपत'चा समावेश हा तिच्या साहित्यगौरवाचा ठोस पुरावा आहे. ३५हून अधिक पुरस्कार, अनुवाद, रंगमंचीय रूपांतर आणि दशकानुदशके टिकून राहिलेले वाचकसंवर्धन हे या कादंबरीचे ऐतिहासिक व साहित्यिक महत्त्व अधिक दृढ करतात.

संजय शेलार यांच्या प्रसंगचित्रांनी सजलेल्या तिसाव्या सचित्र आवृत्तीने युद्धाचे भव्य-भीषण दृश्य आणि मानवी पतनाचे चित्र आणखी परिणामकारक केले आहे. त्यांची लेखनशैली इतिहासातील भव्य घटनांना मानवी भावनांच्या उबदार, करुण आणि तुटलेल्या सुरात उजळते धोरण, रणनीती, राजकारण, वीरता आणि माणुसकी यांचे बहुआयामी रूप या कादंबरीत प्रकर्षाने दिसते.

'पानिपत' ही केवळ युद्धकादंबरी नाही, ती पराभवाच्या खोल जखमेतून उगवलेल्या सांस्कृतिक स्मृतीची जाणीव करून देणारी, गर्व आणि वेदना या दोन्हींच्या संगमातून उभी राहिलेली एक भव्य ऐतिहासिक साहित्यकृती आहे. विश्वास पाटील यांना मराठीतील अग्रगण्य कादंबरीकार म्हणून मानाची जागा मिळवून देणारा ही कादंबरी, साहित्याच्या मंदिरात आजही तेजाने उजळलेली आहे.

त्यांच्या झाडाझडतीने विस्थापितांच्या प्रश्नांनी मराठी कादंबरीला नवीन टोन दिला. खैरमोडे गुरुजी आजरामर झाले. मात्र त्यांच्या साहित्याचा खरा सुवर्णकाळ पुढील मोठ्या कादंबरीतून दिसून येतो, आणि ती म्हणजे पानिपत. पानिपतच्या पराभवाचे शल्य मराठी माणसाच्या मनात होते. ती एक दुखरी वेदना होती. त्या

वेदनेला मूर्त रूप त्यांनी दिले. पानिपतचा पराभव सुद्धा विजय वाटावा अशा वेगळ्या दृष्टिकोनातून त्यांनी पानीपतला मूर्त स्वरूप दिले. आणि पानिपत अभिमानाची गोष्ट झाली. या कादंबरीतील उतारा पाहता येईल–

'होय श्रीमंऽऽत, रावांच्या मृत्यूने मराठी दौलतीची गळसरी तुटलीऽ!

सेवकांनी मुडदा गजेंद्राच्या अंबारीत ठेवला. वर शालजोडी पांघरली. शेजारी बापू हिंगणे बसला. भाऊसाहेबांच्या रोमारोमाला चूड लागली. सर्वांग लाव्हा होऊन उकळू लागले, त्यांनी चंद्रसेनवर उडी ठोकली, खुरासनीची मूठ जोरात आवळली, कराकरा दातओठ दाबत ते ओरडले,

''अरे, नमकहरामांनो जाल कोठे? गिलच्याऽ नजिबाऽऽ तुमची यमसदनाला पाठवणी केल्याशिवाय मी रणातून माघारा फिरणार नाहीऽ.''

दुपारचे अडीच वाजून गेले होते. पानिपतचा भडकलेला परिसर अधिकच पेट घेत होता. गिलच्यांच्या उजव्या अंगाला उभा ठाकलेला नजीब हळूहळू पुढचा मार्ग काढीत चालला होता. हातातल्या जाडजूड बंदुका पेलीत त्याचे प्यादे चालले होते. बेलदार–कामाठी पुढे धावून, जमीन उकरून आडोसा तयार करीत होते. प्यादे आडोशाचा आसरा घेऊन ओट्यावर बंदुका ठेवून फैरीवर फैरी उडवीत होते. तोच सर्वांना विश्वासराव पडल्याची खबर लागली. नजीब दारू प्यालेल्या मर्कटासारखा भुईचक्र काढीत नाचू लागला. त्याची पथके वेगाने समोरच्या शिंदे–होळकरांकडे सरकू लागली.

विश्वासराव पडल्याची खबर थंडीच्या गार लाटा अंगाला डसाव्या, तशी साऱ्या लष्कराला भिववून गेली. बुणग्यांत घबराट माजली. रावांच्या मुडद्याचा हत्ती मागे टाकून भाऊसाहेब पुढे गर्दीत घुसून झुंजार झुंज देऊ लागले. गजेंद्रावर विश्वासरावांचा मुडदा झाकला होता. बापू हिंगणे शेजारी शोकाकुल होऊन बसला होता. हत्ती पाठीमागे पडला. तेवढ्यात राणवशातल्या स्त्रियांच्या अंबारीचे हत्ती जवळ आले. शेजारच्या अंबारीत पार्वतीबाई, रखमाबाई, आक्कासाहेब, पायगुड्यांचे कुटुंब अशा स्त्रिया होत्या. पडदा बाजूला करून पार्वतीबाईंनी बघितले. मखमली शालजोडीत गुंडाळलेला मुडदा दिसला, त्यांचे मन चरकले, त्यांनी मोठ्याने विचारले,

''पंडितऽ तो मुडदा कोणाचा?''

हिंगण्याच्या डोळ्याला धार लागली. तो म्हणाला, ''विश्वासराव रावसाहेब ठार झाले. त्यांचाच हा देह!''

पार्वतीबाईंना शोक अनावर झाला, त्या अंबारीच्या खांबावर डोके आपटू लागल्या, रखमाबाई आक्कासाहेबही आसवे गाळत पार्वतीबाईंना म्हणाल्या,

''रडू नको मुली, काय करायचे ? भगवंतानेच बळे आवतण देऊन आम्हांला अनर्थाकडे ओढले. अजूनही त्याची हौस फिटली नाही. कोण जाते, कोण राहते, कोणास ठावे?'' (पानीपत/ संगरतांडव / ४८७)

विश्वास पाटील यांचे नाव ज्या कादंबरीने राष्ट्रीय पातळीवर पोचवले, ती म्हणजे पानिपत. या कादंबरीत मराठा साम्राज्याचे तिसरे पानिपत युद्ध केंद्रस्थानी आहे. पानिपतच्या आधीही या विषयावर लिहिले गेले होते, परंतु इतक्या विस्तृत संशोधनासह, इतक्या अचूक युद्धतंत्र आणि भूगोलासह इतक्या रोमहर्षक आणि भावनिक कथनशैलीत, इतक्या राष्ट्रीय संदर्भासह पानिपतचे चित्रण प्रथमच घडले.

ही कादंबरी मराठी वाचकांच्या मनात स्मृती, अभिमान, वेदना, राष्ट्रीयता आणि संघर्षाचे चित्र खोलवर रुजवते. पानिपत ही केवळ युद्धकथा नाही; ती मराठी साम्राज्यांचे उभार-पाडाव, राजकारण, देशद्रोह, धैर्य, स्त्रीशक्ती, रणनिती, नेतृत्व आणि सामूहिक नियती यांचे खोलवर विश्लेषण आहे. पानिपत घराघरात पोहोचली. वाचकांनी डोक्यावर घेतली. तिच्या वेगवेगळ्या भाषेत आवृत्ती आल्या. ती मराठी वाचकांपूर्वी सीमित राहिली नाही तर जगभरात पोहोचली. विश्वास पाटील यांना एक नवी उपाधी या कादंबरीमुळे मिळाली, पानिपतकार!

**२. संभाजी**

विश्वास पाटील यांनी मराठी ऐतिहासिक कादंबरी साहित्याला दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे 'संभाजी' ही कादंबरी. २००६ साली प्रथम मराठीत प्रसिद्ध झालेली ही कादंबरी शिवचरित्राच्या दुसऱ्या पर्वाचे छत्रपती संभाजीराजांच्या रोमहर्षक, संघर्षमय आणि गौरवशाली जीवनचरित्राचे आख्यान आहे. शिवरायांच्या महा-निर्वाणानंतर पाच लाख मोगलांची फौज आणि त्यांची चार लाख जनावरे यांना तलवारीच्या टोकावर रोखणाऱ्या या थोर योद्ध्याची कहाणी पाटील यांनी उत्कट ऐतिहासिक जाणिवेने उभी केली आहे.

औरंगजेबाच्या दक्षिणेकडील चढाईने दणाणून गेलेल्या काळात संभाजीराजांचे नेतृत्व ही केवळ राजकीय नव्हे, तर मानसिक आणि सांस्कृतिक प्रतिकाराची पराकोटी होती. अत्यल्प साधनांची फौज आणि संपूर्ण सामर्थ्याने झडलेल्या शत्रुप्रचंड मुठीत मराठ्यांचा प्रतिकार या दाहक संघर्षाचे चित्रण त्यांच्या कथेच्या प्रत्येक पानावर थरारकतेने उभे राहते.

छत्रपती संभाजीराजांचे चरित्र मराठी इतिहासात दीर्घकाळ एका संशयाच्या धुक्यात लपून राहिले. औरंगजेबाच्या पाच लाख फौजेशी सलग आठ वर्षे प्राणांतिक

झुंज देणारा हा कवी-राजा, योद्धा आणि दूरदर्शी राज्यकर्ते, वयाच्या केवळ बत्तिसाव्या वर्षी यातनांनी भरलेल्या मृत्युशिखरावर पोहोचला; तरीही शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातील एकही प्रमुख किल्ला गमावू दिला नाही, तसेच मराठा आरमारातील एकही जहाज शत्रूच्या ताब्यात गेलं नाही, हे इतिहासातील थरार आणि दर्प दोन्ही एकत्र आणणारे अद्‌भुत सत्यकथन आहे.

त्यांच्या लेखणीतून उलगडलेली 'शिवपुत्र संभाजी' ही गाथा संशोधन, सह्याद्रीतील पायपीट, सागरखाड्यांची भौगोलिक जाण आणि दुर्लक्षित कागदपत्रांचा मूक पुरावा यावर आधारलेली आहे. आजवर अपप्रचाराने झाकोळलेला, अनेकदा हेतुपुरस्सर बदनाम केलेला संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू या कादंबरीत वस्तुनिष्ठपणे उजेडात येतो. पाटील यांची भाषा भावस्पर्शी, पण तितकीच इतिहासनिष्ठ आहे; त्यामुळे कथा केवळ इतिहास न राहता एक जिवंत, धगधगती ऐतिहासिक साक्ष बनते.

या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे संभाजीराजांना पराक्रमाबरोबरच विचारवंत, काव्यप्रेमी, मुत्सद्दी आणि स्वराज्याचे कठोर रक्षणकर्ते म्हणून उभे करणे. मराठा सामर्थ्याचे क्रूर छेदन करण्यासाठी औरंगजेबाने संपूर्ण जीवन खर्च केले, पण संभाजीराजांचे स्वराज्यनिष्ठ नेतृत्व त्याला वर्षानुवर्षे पराभूत करत राहिले, ही ऐतिहासिक वास्तवता पाटील प्रभावीपणे उलगडतात, त्यांची ही कादंबरी संशयाच्या पडद्याआड दडलेला खरा संभाजीराजे शोधून वाचकांसमोर उभा करते. पराक्रम, काव्य, वेदना आणि बलिदान यांचे आविष्कार असलेली ही कादंबरी मराठी इतिहास साहित्याला नव्या दृष्टीने समृद्ध करणारी ठरते.

संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वातील तडफ, विद्वत्ता, रणनीतीची जाण आणि स्वराज्यावरील अथांग निष्ठा यांचे दर्शन पाटील यांच्या लेखनात प्रभावीरीत्या घडते. ते शूर योद्धे, कुशल सेनापती, ग्रंथप्रेमी विद्वान आणि असंख्य संकटांतही न झुकणारे राष्ट्रनायक अशा सर्वांगसुंदर स्वरूपात येथे येतात. या कादंबरीचे मराठीतील प्रचंड यश लक्षात घेता ती हिंदी, इंग्रजी आणि आता कन्नड भाषेतही उपलब्ध झाली आहे. भारतीय ज्ञानपीठ व वाणी प्रकाशन-हिंदी, वेस्टलँड/-इंग्रजी, सपना बुक हाउस, बेंगळुरू-कन्नड, डॉ. चंद्रकांत पोकळे यांनी केलेला कन्नड अनुवाद संभाजीराजांच्या शौर्याचा आवाज कर्नाटकातही पोचवणारा ठरला आहे.

कर्नाटकातील बंगळुरू, बसरूर, मंगळुरू या भूमींचा शिव-शंभू इतिहासाशी असलेला घट्ट संबंध लक्षात घेता, संभाजी कादंबरीचे कन्नड भाषेत येणे ही ऐतिहासिक व भावनिक दोन्ही पातळ्यांवरील महत्त्वाची घटना ठरते.








विश्वास पाटीलांचे लेखन वाचकांच्या संवेदना हलवणारे, पण इतिहासाच्या कणखर पायावर उभे आहे. युद्धाचे वर्णन, राजकीय डावपेच, संभाजीराजांची मनःस्थिती, दरबाराचे वातावरण हे सर्व इतक्या जिवंतपणे येते की वाचकाला त्या काळात प्रत्यक्ष नेऊन सोडते.

आपल्या हवेलीच्या माडीतून- विशेषतः मागच्या गवाक्षातून शंभूराजांची नजर अनेकदा त्या काळपट, रहस्यमय घराकडे जायची. त्यांना अधेमधे मियाँखान दिसायचे. अथणीच्या त्या आदिलशाही सुभेदाराबद्दल त्यांना बरीचशी माहिती प्राप्त झाली होती. मुळात तो आदिलशाही सेवेत असला तरी त्याची आणि त्याच्या घराण्याची निष्ठा ही दिल्लीकर मोगल पातशहांशीच होती. मियाँखानही दक्षिणेतील खबरी औरंगजेबाला पोचवणे, मोगलांचे हित जपणे, अशी कामे पाहत होता. परंतु त्याच्या वैऱ्याने डाव साधला होता. त्याच्या विरोधात औरंगजेबाकडे कागाळ्या केल्या होत्या. आलमगीर आधीच संशयी स्वभावाचा, त्याला इतके निमित्त पुरेसे होते. त्याने आपल्या फौजेचा बेहडा रात्री अथणीवर पाठवला होता. मियाँखानला कैद करून बहादूरगडावर फरफटत आणले होते.

हळूहळू एक गोष्ट प्रकर्षाने शंभूराजांच्या ध्यानात येऊ लागली. मराठी राज्याचा युवराज म्हणून त्यांना आत गडावर कितीही फिरायची मुभा असली, तरी त्यांच्या हवेलीच्या आजूबाजूने रात्रीबेरात्री गस्तीची पथके दबक्या पावलाने फिरत असत, युवराजांवर पाळत ठेवीत. कधी शंभूराजे आपली वेस ओलांडून दिवसा पलीकडे सरस्वती नदीच्या बाजूला निघाले की, संरक्षणाच्या नावाखाली त्यांच्या आगेमागे अनेक लष्करी बेहड्यांची भुतावळ धावतच असायची. (संभाजी पृ.१२६)

संभाजी ही कादंबरी केवळ एका महान राजा-योद्ध्याचे जीवनचरित्र नसून स्वराज्यासाठी झटणाऱ्या संपूर्ण मराठा समाजाच्या सामूहिक जिद्दीचा दस्तऐवज आहे. तिचे विविध भाषांमध्ये झालेले अनुवाद हे साहित्यिक यशापलीकडचे

संभाजीराजांच्या स्वातंत्र्यलढ्याची जागतिक प्रतिध्वनी वाढवणारे असे प्रभावी सांस्कृतिक काम आहे. ही कादंबरी मराठी इतिहासकथेला नवी उंची देणारी, वाचकाचा थरकाप उडवणारी आणि राष्ट्रप्रेरणेचे तेज पुन्हा स्मरून देणारी अशी कालातीत साहित्यकृती आहे.

संभाजी म्हणजे महाझुंजार राजाचे पुनरावलोकन. छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा बराच काळ विवादांनी, पूर्वग्रहांनी, राजकीय रंगांनी झाकोळलेली होती. विश्वास पाटील यांनी या कादंबरीतून या महान योद्ध्याच्या जीवनावर वस्तुनिष्ठ, संशोधनाधारित, धाडसी लेखन केले. याविषयीची वादळे ही त्यांनी अंगावर घेतली. त्यांनी केलेल्या काही चित्रणांवर आक्षेपही घेतले गेले. त्याचे निराकरणही त्यांनी केले. ही कादंबरी संभाजी महाराजांचे शौर्य, त्यांची राज्यव्यवस्था, त्यांचे गुप्तहेरजाळे, औरंगजेबाशी झालेली प्राणांतिक टक्कर, धर्म-राजकारणाचा संघर्ष, बलिदानाची उत्कटता यांचे अप्रतिम चित्रण करते. आजही भारतातील अनेक भाषांत या कादंबरीचे अनुवाद सुरू आहेत; कन्नडमध्ये तिचे नवीन प्रकाशन मोठ्या प्रमाणावर कौतुकास्पद ठरले.

विश्वास पाटील फक्त ऐतिहासिक लेखक नाहीत; त्यांनी पर्यावरण, शेती, औद्योगिक धोरणे, नदीप्रकल्प, आदिवासी जीवन, विकासाचा विषम वेग यांवर अत्यंत प्रभावी लेखन केले आहे. वैविध्यपूर्ण लेखनाचा आविष्कार घडविणारे साहित्यिक म्हणजे विश्वास पाटील, त्यांच्या कादंबऱ्यांत डॉक्युमेंटेशन, पुरावे, प्रसिद्ध प्रवासवर्णने, मुगल, मराठा आणि ब्रिटिश अभिलेख यांचा आधार दिसतो.

रणनीती, भूगोल, सेनासंघटन, हत्यारे, मानसिक युद्ध, त्यांच्या लेखनात युद्धाची दृश्यात्मकता प्रखर आहे. भाषेची धारदार शैली आहे. वेगवान, सिनेमॅटिक, भावनाप्रधान, उदात्त आणि रोमहर्षक अशी आहे.

इतिहासाचा भार न वाढवता कथापूर्ण  कला अत्यंत नैपुण्याने साधली आहे.

ते इतिहासातील दुय्यम ठरवलेल्या किंवा चुकीने न्याय दिलेल्या व्यक्तिमत्त्वांचे पुनर्वाचन करतात.

ऐतिहासिक कादंबरीला आधुनिक रूप आणि आंतरराष्ट्रीय स्तर देणे. मराठा इतिहासाचे पुनरुज्जीवन, राष्ट्रीय अभिमान आणि सांस्कृतिक शक्ती वाढवणे. पर्यावरण-विकास या विषयाला साहित्यिक परिमाण देणे.

संशोधनाधारित साहित्याचा नवा आदर्श निर्माण करणे. वाचकसंख्येला पुन्हा कादंबरीकडे खेचणे. कन्नड, हिंदी, गुजराती, इंग्लिश अशा अनेक भाषांत अनुवाद झाला. म्हणजे मराठीची जागतिक उपस्थिती वाढवणे. चित्रपट, नाटके, माहितीपट

यांना प्रचंड साहित्यिक प्रेरणा देणे. ते फक्त एक कादंबरीकार नाहीत; ते ऐतिहासिक स्मृतीचे रक्षक, पर्यावरणीय चेतनेचे वाहक, राष्ट्रीय चित्ताचे लेखक आणि मराठी साहित्याचे वैश्विक दूत आहेत.

त्यांचे व्यक्तिमत्त्व परिश्रम, स्वाभिमान, संशोधन, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांनी घडलेले आहे. त्यांच्या कादंबऱ्या पुढील पिढ्यांसाठी ज्ञान, स्मृती, अभिमान यांचे जिवंत दस्तऐवज ठरतील.

त्यांच्या वाङ्मयात इतिहासाची धग, कथानकाची ताकद आणि भाषेचा ज्वालामुखी हे तिन्ही घटक एकत्रित येतात. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ मनोरंजन नसून जागरण आहे.

### ३. चंद्रमुखी

विश्वास पाटील यांची 'चंद्रमुखी' ही कादंबरी तमाशा संस्कृती, राजकारण आणि मानवी नात्यांच्या गुंतागुंतीचा स्पंदनशील संगम आहे. महाराष्ट्राच्या लोक-कलेतील 'कलावंतिणी'चे आयुष्य, तिच्यावरची सामाजिक शिकवण, तसेच तिच्या भावविश्वातील कोवळेपणा आणि करुणा या सर्वांचा वस्तुनिष्ठ, तरीही भावपूर्ण वेध ही कादंबरी घेते.

दौलतराव हा ध्येयवादी, जमिनीवरचा राजकारणी घर, संसार, पक्षकारभार सांभाळतानाच लोककलेचा खरा रसिक. त्याच्या आयुष्यात अवतरते चंद्रमुखी, तमाशातील एक विलक्षण नर्तकी. तिचे सौंदर्य, नृत्यकौशल्य आणि त्याआड दडलेला 'बाईपणाचा शाप' हे तिच्या व्यक्तिरेखेला एकाचवेळी तेजस्वी आणि शोकात्म बनवतात.

विश्वास पाटील या नातेसंबंधाकडे केवळ रोमान्स म्हणून पाहत नाहीत; ते तमाशा ही कला, तिच्यातील शोषण-संस्कृती, सामाजिक तिरस्कार, पुरुषी वर्चस्व आणि स्त्रीच्या अस्तित्वाची लढाई यांचे अचूक चित्रण करतात. त्यामुळे चंद्रमुखीचे पात्र केवळ 'शुक्राची चांदणी' न राहता एक संवेदनशील, संघर्षशील, स्वतःचे अस्तित्व शोधणारी स्त्री म्हणून आकाराला येते.

कादंबरीत 'लाल दिवा', 'घुंघरा', राजकारण, कला, सत्ता, प्रेम आणि जबाबदारी यांच्या परस्परछायांचे चित्रण अत्यंत प्रभावी आहे. दौलतराव-चंद्रमुखी नात्यातील नाजूक भावनांचे द्वंद्व, सामाजिक बंधने आणि अंतर्मनातील वेदना यांच्या कुशल मांडणीमुळे ही कथा केवळ प्रेमकथा राहत नाही; ती एक जीवंत सामाजिक शोधकथा बनते. 'चंद्रमुखी' ही मानवी भावनांच्या गुंतागुंतीला स्पर्श

करणारी, तमाशा संस्कृतीची अस्सल धग अनुभवू देणारी आणि स्त्री-अस्तित्वाच्या संघर्षाला आवाज देणारी प्रभावी सामाजिक-मानसशास्त्रीय कादंबरी आहे.

चंद्रमुखी ही कादंबरी नसून, तिच्या माध्यमातून समाजव्यवस्था, राजकारण, मानवी नातेसंबंध आणि सत्तेच्या खेळींचे ती अचूक व भेदक विश्लेषण करते.

कादंबरीची नायिका चंद्रमुखी ही एका प्रतिभावान, स्वाभिमानी आणि भावनाशील तमाशा कलावंत स्त्रीचा प्रतीकात्मक चेहरा आहे. तिच्या कलावैभवाने अनेकांना मोहित केले असले तरी तिच्या मनातील वेदना, स्वप्ने, संघर्ष आणि जीवनातील उष्ण, थंड अनुभव यांना विश्वास पाटील यांनी अत्यंत संवेदनशीलतेने उभे केले आहे. तिला भेटलेला राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाकांक्षी राजकारणी हा व्यक्तिरेखा-विकासाचा केंद्रबिंदू बनतो. या दोन व्यक्तींच्या नात्यातून प्रेम, आकर्षण, सत्ता, महत्त्वाकांक्षा आणि सामाजिक बंधनांचे गुंतागुंतीचे जाळे उलगडत जाते.

'चंद्रमुखी' ही केवळ प्रेमकहाणी नाही; ती ग्रामीण-शहरी संस्कृतीतील ताणतणाव, शक्तिसंबंध आणि स्त्रीच्या देहमनाविषयीच्या समाजाच्या दुटप्पी दृष्टि-कोनावर प्रभावी भाष्य करते. कादंबरीतील भाषा प्रवाही, चित्रमय आणि नाट्यमय आहे. कथानकाची रचना सिनेमॅटिक असून त्यामुळेच कादंबरीवर आधारित चित्रपटालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला.

डॉ. रामजी तिवारी यांनी केलेल्या हिंदी अनुवादामुळे चंद्रमुखीला राष्ट्रीय पातळीवर व्यापक वाचकवर्ग मिळाला. पंडित विद्यानीवास मिश्रांसारख्या विद्वानांनी ते आवडीनं वाचलं, यावरून या कादंबरीची साहित्यिक ताकद स्पष्ट होते.

**४. महासम्राट चार सिक्वेल कादंबऱ्या –**

**१. झंझावात**

विश्वास पाटील यांची 'झंझावात' ही 'महासम्राट' मालिकेतील पहिली कादंबरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनगाथेचा आरंभ समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. शिवचरित्राला नव्या, अधिक विस्तृत आणि संशोधननिष्ठ दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न या कादंबरीत दिसतो.

कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे- शिवाजी महाराजांचा जन्म होण्यापूर्वीची मराठ्यांची स्थिती, सामाजिक-राजकीय हलकल्लोळ, दक्षिणेतील सत्तासंघर्ष, आणि शहाजी राजे यांची अफाट धुरा या सर्वांचा सखोल मागोवा. शिवाजी महाराजांची विचारजडण-घडण कशी झाली, स्वराज्याचा विचार त्यांच्या अंतर्मनात कसा अंकुरला, हा 'बीजारोपणाचा काळ' विश्वास पाटील प्रभावी कथनशैलीत उभा करतात.

जिजाऊ-शिवाजी महाराजांचा बीजापूर प्रवास, बालशिवरायांचे शास्त्र-शस्त्र-राजकारणातील शिक्षण, शहाजी राजांच्या मार्गदर्शनाचा व सल्ल्याचा प्रभाव- या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकताना लेखकाने ऐतिहासिक स्रोत, लोककथा, पुरावे आणि कल्पनाशक्ती यांचा संतुलित वापर केला आहे. त्यामुळे कथन जिवंत, प्रवाही आणि दृश्यात्म भासते.

'झंझावात' या शीर्षकाप्रमाणेच, कादंबरीत तो काळ एक प्रचंड अस्थिरता, संघर्ष आणि वादळांचा होता. परंतु त्याच वादळांनी एका असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीस दिशा दिली. शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे, स्वराज्य-स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे बीज या कादंबरीत प्रभावीपणे उलगडते. 'झंझावात' ही शिवचरित्रातील अज्ञात, उपेक्षित घटकांना प्रकाशात आणणारी, संशोधनयुक्त, भाषाशैलीने ओघवती आणि ऐतिहासिक जाणिवांचा पाया मजबूत करणारी कादंबरी आहे. शिवाजी महाराजांच्या विचारांच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या उगमस्थानाचा शोध घेणाऱ्यांसाठी ती अत्यंत समृद्ध करणारी साहित्यकृती ठरते.

## २. रणखैंदळ

इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास, चरित्रांची मानसशास्त्रीय उकल आणि कथनकौशल्य यांचा सुरेख मेळ घालणारी त्यांची महासम्राट ही शिवचरित्रकथा चार खंडांत येत आहे. झंझावात आणि रणखैंदळ हे दोन्ही खंड या साहित्यिक महामोहिमेचे आधारस्तंभ आहेत.

रणखैंदळ या दुसऱ्या खंडात शिवछत्रपतींच्या जीवनातील निर्णायक, वेधक आणि धाडसी घडामोडींचा अचूक आणि रोमांचकारी आढावा लेखक घेतात.

पन्हाळ्याभोवतीच्या वेढ्याचा फास आदिलशाही फौजेने आवळत आणला. किल्ल्यावर जा-ये करण्यासाठी पूर्णतः पाबंदी घालण्यात आली होती.

त्या रात्री आपल्या बड्या डेऱ्यात फाजलखान जागाच होता. आज तर त्याची नींद पूर्णतः उडाली होती. तो डेऱ्याबाहेर अंधारात येऊन डोळ्यांसमोरच्या पन्हाळा किल्ल्याच्या उंच, अंधारात सैतानासारख्या खड्या असलेल्या त्या तटभिंती पुनःपुन्हा पाहत राहिला. अफझलखानासारख्या आपल्या बहादूर बापाचा कोथळा ह्या शिवाजीनेच फाडला होता. तो आपला कट्टर दुश्मन समोरच्या किल्ल्यावर आहे, या कल्पनेने फाजलचे सर्वांग संतापाने थरथरत होते. त्याच्या झोपेचे कोळसे झाले होते.

त्याच तिरमिरीत फाजलखानने घोड्यावर मांड ठोकली आणि घोडा तसाच

पलीकडच्या उतारावर घुसवला. डेऱ्याबाहेरच्या पहारेकऱ्यांची आणि गस्तीच्या पथकाची पर्वा न करता, त्याने आपले जनावर तसेच आत रेमटवले. (रणखैंदळ पृ.९७)

ऐतिहासिक स्रोतांच्या भक्कम आधारे उभे राहिलेले कथानक हेच पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. सरदेसाई यांचे मराठी रियासत, शिवकालीन पत्रसंग्रह, बखरी, इंग्रजांचा पत्रव्यवहार, परदेशी इतिहासकारांच्या नोंदी – या सर्वांचा अभ्यास करून लेखकाने निर्माण केलेला इतिहासाचा पट विलक्षण जिवंत झाला आहे.

सुरतेची लूट, पावनखिंड, उंबरखिंडीत तीस हजार मोगली फौजेचे निरस्त्रीकरण, शाहिस्तेखानाची वेसण, मुधोळ स्वारी, सागराच्या पोटात उभे राहिलेले शिवलंका – सिंधुदुर्ग यांची निर्मिती या सर्व घटना पाटील यांच्या लेखनात पुन्हा जिवंत होतात. त्या केवळ युद्धकथा नसून शिवरायांच्या रणनीती, दूरदृष्टी आणि असामान्य नेतृत्वाचे दर्शन घडवतात.

कादंबरीची मोठी ताकद म्हणजे इतिहासाच्या कडेलोटात हरवलेली अनेक उपेक्षित, अल्पज्ञात, पण अत्यंत धाडसी पात्रे.

सिद्दी वाहवाह, दोरोजी फाकडे, शंभूजी जाधव, हेर विश्वासराव दिघे–यांचा कर्तृत्वाचा उज्ज्वल परिचय पाटील देतात. शिवा काशिदच्या संदर्भातील नवीन उकल आणि त्याचा सिद्दी जौहरच्या तळापर्यंतचा मार्गदर्शक प्रवास यांसारखे तपशील वाचकांसाठी नवे दालन उघडतात.

लेखकाने बखरींच्या भारदस्त भाषेपेक्षा आधुनिक, ओघवती आणि सुबोध मराठी वापरली आहे. त्यामुळे कादंबरी ऐतिहासिक असूनही क्लिष्ट वाटत नाही. चित्तवेधक वर्णनशैलीमुळे युद्धदृश्ये, राजकीय, समुद्री आरमाराचे नियोजन – हे सर्व वाचकाच्या डोळ्यासमोर उभे राहते.

पन्हाळगडा भोवतीचा वेढा करकचून आवळला गेला, तर आपले जन्माचे नुकसान होईल, आपण स्वराज्यापासून कायमचे बाजूला तुटलो, तर स्वराज्यावर काळप्रसंगही उभा राहू शकतो, अशी काळजी राजांनाही मनातून वाटू लागली होती. त्याच वेळी त्यांचा श्वास राजगडाच्या आणि पुणे जहागिरीच्या काळजीने पोखरत होता.

गडावरची राजांच्या सोबतीची शिबंदी अगदीच जुजबी होती. त्यांची संख्या सारे स्वारशिपाई मिळून सहा–सात हजाराच्या पलीकडेही नसल्याने चाळीसभर हजारांच्या फौजेचे सभोवती पडणारे रिंगण भेदून बाहेर पडणे, ही अत्यंत कठीण कसोटीच ठरणार होती.







आदिलशाही पथके सर्व दिशांनी वेगाने वेढा आवळत चालली होती.

विजापूरकरांचे तीस-पस्तीस हजारांचे लष्कर किल्ल्याभोवती सुडाच्या भावनेने नाचत होतेच. शिवाय वाडीचे खेमसावंत, कोकणातले दाभोळकडचे कुटऱ्याचे शिर्के, श्रृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे, अशा खानदानी वतनदार आणि जहागिरदार मराठ्यांची पत्रे रोज सलाबतखानाकडे पोचत होती. लवकरात लवकर 'शहाजीराजाच्या ह्या बंडखोर पोराच्या मुसक्या आवळा. त्याला काबूत आणा. त्याचे राजा बनायचे सोंग उघडे पाडा' अशा आशयाचा मजकूर धाडला जात होता.

आंबवडेगावच्या तळावर खानासाठी खास हमामखाना, मसलतीसाठी एक बडी सदर आणि आजूबाजूने अनेक नोकरचाकरांसाठी लहान आकाराच्या, पण मजबूत अशा झोपड्या उभारल्या गेल्या होत्या. फौजेतील पथकांसाठी लष्करी कवायतीचा सराव असो किंवा एखाद्या शाही सोहळ्याचा प्रसंग, अशा दृष्टीने समोर एक तात्पुरते मोकळे मैदान बनवले गेले होते. (रणखैंदळ पृ. ९७)

रणखैंदळ हे केवळ ऐतिहासिक पुनर्कथन नसून शिवकाळाच्या वास्तविक वर्णनाला नव्याने प्रकाश टाकण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. इतिहासकारांच्या नोंदींपेक्षा साहित्यिक स्वातंत्र्याचा वापर इथे मितभाषी आणि संयत आहे. त्यामुळे काल्पनिक व वास्तवाचे संतुलन अबाधित राहते.

पाटील यांनी उभा केलेला शिवकाळाचा पट वाचकांच्या कल्पनाशक्तीला केवळ रोमांचित करत नाही, तर इतिहासाच्या अज्ञात कोपऱ्यात डोकावण्यास भाग

पाडतो. म्हणूनच रणखैंदळ ही आधुनिक मराठीतली एक महत्त्वाची ऐतिहासिक कादंबरी ठरते.

रणखैंदळ ही शिवरायांच्या संघर्षपूर्ण आणि दूरदर्शी कारभाराच्या एका निर्णायक टप्प्याचे साहित्यिक पुनर्लेखन आहे. प्रामाणिक ऐतिहासिक आधार, उत्तुंग कथनशैली, उपेक्षित पात्रांचा अभ्यास आणि युद्ध-राजकारणाचे जिवंत चित्रण यामुळे ही कादंबरी साहित्यविश्वात ठसा उमटवणारी ठरते. विजय बोधनकर यांचे देखणे मुखपृष्ठ आणि समर्पण स्वरूपातील आचार्य अत्रे यांना केलेली अर्पणासुद्धा या ग्रंथाच्या सांस्कृतिक व्याप्तीला अधिक अर्थपूर्ण करते. शिवरायांविषयीची असलेली विश्वास पाटलांची भूमिका त्यांच्या कवितेतून दिसून येते.

*शिवरायांच्या आरत्या कसल्या रे*
*पोवाडा म्हणा!*
*तो कोणी नव्हता*
*मंदिरातला देव भोळा*
*हिंदवी स्वराज्याच्या भाळीचा टिळा*
*आगीचा तो कडाडता गोळा!*
*शोधा त्या सह्याद्रीच्या पाषाणावरच्या खुणा*
*बघा ते किल्लेदुर्ग पुन्हा पुन्हा*
*ठेवून पाठीचा ताठ कणा*
*नेटाने फक्त शिवरायांचा पोवाडा म्हणा!*
*आरती चांगली गणेशाची*
*गाभाऱ्यात मांगल्य नांदते*
*शिवरायांच्या महतीसाठी नकोत नाजूक टाळ चिपळ्या*
*हवेत कडाडते ढोल,*
*राजांची कीर्ती अस्मानापरी अनमोल,*
*मर्दांचा गावा पोवाडा मर्दाने सांगती इतिहासाची पाने*
*जोतिबानेही गाजवली राने केवळ पोवाड्याने,*
*विसरलात मूळ आबासाहेबांच्या आणि मूळ मांसाहेबांच्या खुणा,*
*अन् आता विसराल जर पाळणा आणि आरतीतील अंतर*
*कसा जागवाल इतिहास तो निरंतर!*
*शिवजयंती हा सण मर्दानगीचा*

*सांगतो, इतिहासाची साक्ष ठेवुनी*
*पुन्हा पुन्हा*
*ठेवुनी ताठ कणा*
*आरत्या नकोत रे पोवाडा म्हणा!*

**५. द ग्रेट कांचना सर्कस**

या कादंबरीच्या निर्मितीमागील विश्वास पाटील यांची मेहनत दिसते. 'द ग्रेट कांचना सर्कस' ही कादंबरी केवळ कल्पनारंजनातून जन्मलेली नाही; ती प्रत्यक्ष अनुभव, संशोधन, यात्रांचा प्रवास आणि जीवघेण्या जगण्याशी केलेल्या संवादातून तयार झालेली भक्कम साहित्यकृती आहे.

सर्कसच्या जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांनी भारतभर केलेल्या दौऱ्यांतून अधिक खोल झाला. त्यांनी महाराष्ट्रातील सर्कसकलेच्या उगमस्थानांचाही शोध घेतला–तासगाव, मिरज, मैशाळ ही ठिकाणे, जिथून भारतीय मर्दानी सर्कसकलेचा जन्म झाला. या सर्व प्रदेशांना भेट देत त्यांनी वृद्धावस्थेच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या सर्कसपटूंच्या आठवणी, संघर्ष आणि वेदना प्रत्यक्ष ऐकल्या.

विशेष म्हणजे, वाघ-सिंहांसारख्या हिंस्र प्राण्यांबरोबर धोकादायक खेळ करणाऱ्या कलाकारांचे जगणे त्यांनी जवळून पाहिले. त्यांच्याशी संवाद साधताना लेखकाच्या संवेदनशील नजरेने त्यांच्या भीषण, थरारक आणि मानवी संघर्षांनी भरलेल्या आयुष्याचे गहिरे पैलू टिपले. हे अनुभव कादंबरीमध्ये वास्तवाची ताकद आणि भावनिक खोली निर्माण करतात.

यूट्यूब चॅनेलसाठी केलेल्या मुलाखती, प्रत्यक्ष नोंदी, मैदानावरचे निरीक्षण, विविध भाषांतील कलाकारांशी साधलेला संवाद या सर्वांनी कादंबरीच्या ढाच्याला वस्तुनिष्ठता दिली. सर्कसकर्मींच्या अस्तित्वाच्या लढाईतून, त्यांच्याच जिभेवरील गोष्टीतून जन्मलेला साहित्यमय दस्तऐवज म्हणजे द ग्रेट कांचना सर्कस. इतिहास, शोध, संशोधन आणि मानवी दु:खाचे जिवंत साक्षात्कार या सर्वांचा संयोग म्हणजे ही कादंबरी. विश्वास पाटील यांनी या निर्मितीसाठी केवळ साहित्यिक कल्पना नव्हे, तर संपूर्ण देशभर भटकून मिळवलेले अनुभव ओतप्रोतपणे यात गुंफलेले आहेत. त्यामुळेच द ग्रेट कांचना सर्कस ही कादंबरी साहित्यिक मेहनत, संवेदनशील अभ्यास आणि मानवी स्पर्शाचा अद्वितीय नमुना ठरते. पुण्यनगरी मधून क्रमशः ही कादंबरी प्रकाशित झाली.

ग्रामीण भारतातील अदृश्य संघर्ष आणि विस्मृतीत गेलेल्या कलाकारांचा

गौरव करणारी ही भावनाप्रधान साहित्यकृती आहे. तिचे वेगळेपण अनेक अंगांनी उलगडते. जिवंत वाघिणींशी कुस्ती करणाऱ्या मुली, वाघिणींच्या बाळंतपणाला हातभार लावणारी माणसे, प्राण्यांशी एकरूप झालेले कलाकार, त्यांची माती, त्यांची वेदना आणि त्यांचा असामान्य धैर्याचा वारसा या पुस्तकात वास्तवाच्या ताकदीने उतरतो. अमीर खानच्या दंगलच्या आधी शंभर वर्षांपूर्वीच भारतात होणारी 'अपूर्व दंगल'- तारा शिंदे, छबुताई, रेवा, रखी, बिबा, सुमन अशा अनेक महिलांनी जगाला चकित करणारे पराक्रम दाखवले.

या सर्वांना साहित्यिक स्मारक मिळवून देण्याचे काम कांचना करते. इतिहासाच्या अंधारात लपलेल्या या नावांना कादंबरी उजेडात आणते- हेच तिचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. भारतीय साहित्यात जंगल बुक ही प्राण्यांवरील कल्पित कथा असली तरी कांचना हा प्रत्यक्ष जगाचा दस्तऐवज आहे.

येथे प्राणी हा कल्पनारम्य नाही, तर रक्तमांसाचा साथीदार आहे.

मानव आणि हिंस्र प्राणी यांच्यातील विश्वास, भीती, मैत्री, साहस आणि जीवनमृत्यूचे प्रश्न हे कादंबरीला एक असामान्य भावस्पर्शी थर देतात.

ही कादंबरी मनोरंजनाच्या मैदानातील थाटमाट दाखवते, पण त्यामागील कठोर सत्यही सांगते- सर्कसवाल्यांचे आयुष्यभराचे संघर्ष, अपघात आणि मृत्यूची भीती, आर्थिक अनिश्चितता, कथित 'कौतुका'मागचा जिवंत वेदना संसार, यामुळे कादंबरी सामाजिक दस्तऐवजासारखी उभी राहते.

विश्वास पाटील त्यांच्या विस्तृत संशोधनाला कथारूप देताना नाट्यमयता, भावनिकता आणि ऐतिहासिक दृष्टी यांचा उत्तम मिलाफ साधतात. त्यांच्या वर्णनशैलीत थरार, मानवी आकांत, निसर्गाचा गंध आणि ग्रामीण जगण्याची खडतर लय आहे.

### ६. लस्ट फॉर मुंबई

'लस्ट फॉर मुंबई' ही त्यांची कादंबरी मुंबईच्या लालबाग-परेलमधील मजूर चळवळीचा, गिरणी कामगारांच्या संघर्षाचा आणि उद्योगव्यवस्थेतील प्रचंड बदलांचा भावनिक व विचारप्रवण पट मांडते. आर्थिक उदारीकरणानंतर मुंबईतील गिरण्या बंद पडल्या, कामगारांचे संसार उघडे पडले, आणि मजुरी-उद्योग-सत्ता यांची त्रिसूत्री कशी मोडत गेली, हा या कादंबरीचा मुख्य गाभा आहे.

कादंबरीच्या केंद्रस्थानी कामगारांचे अस्थिर आयुष्य, त्यांचे उद्ध्वस्त होणारे स्वप्नविश्व, तसेच भूमाफिया व राजकीय शक्तींचा हस्तक्षेप यांचे चित्रण आहे. लालबागच्या कोसळत्या गिरण्यांमध्ये अडकलेली पिढी-वडील-मुलं-कुटुंब-या सर्वांचे

सामाजिक-आर्थिक विघटन विश्वास पाटील धारदार प्रतिमा, उपमा आणि तपशीलवार सामाजिक वास्तवातून दाखवतात. कथानकात गिरणकामगारांची लढाई, आंदोलनांचे स्वरूप आणि अस्मिता व अस्तित्व या दोन छटांमधला संघर्ष प्रभावीपणे उलगडतो.

लेखकाची भाषाशैली ही पत्रकारितेची ज्वलंतता आणि साहित्यिक भावगर्भता यांचा प्रभावी मेळ साधणारी आहे. तांत्रिक माहिती, शहरवैज्ञानिक बदल, वसाहतींची अधोगती, राजकीय सांठगाठ, आणि साध्या माणसाचे तुटलेले आयुष्य- हे सर्व लेखक अत्यंत संतुलित पद्धतीने मांडतात. कादंबरी फक्त एका काळाचा इतिहास सांगत नाही; ती विस्थापन, शोषण आणि विकासाच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायाचे सामाजिक दस्तऐवजीकरण करते.

अखेर 'लास्ट फॉर लालबाग' ही कादंबरी महानगराच्या बदलत्या भूगोलाची, उद्योगपतनाची आणि कामगारवर्गाच्या अदृश्य होणाऱ्या ओळखीची हृदयस्पर्शी कहाणी बनते. विश्वास पाटील यांनी लिहिलेली ही केवळ एक कथा नसून एका युगाचा जाहीरनामा, संघर्षाचे चरित्र आणि मुंबईच्या सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण लेखाजोखा आहे.

### ७. दुडिया

'दुडिया' ही मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस (२०२२) यांनी प्रकाशित केलेली चर्चेत असलेली विश्वास पाटील यांची कादंबरी आहे. ते कसलेले कादंबरीकार आहेत. मराठी वाचकांवर त्यांच्या कादंबऱ्यांनी गारूड केलेले आहे. चरित्रात्मक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी अशा वैविध्यपूर्ण कादंबरी प्रकारात प्रभावी लेखन करणारे कादंबरीकार. त्यांची वेगळ्या विषयावरची, बाजाची दुडिया ही कादंबरी नक्षलवादी चळवळीचे वास्तववादी सत्यकथन म्हणून वैशिष्ट्यपूर्ण अशी असणारी कादंबरी आहे. ही त्यांनी छत्तीसगड येथे निवडणूक निरीक्षक-अधिकारी म्हणून तीन महिने घेतलेल्या अनुभवावर आधारित आहे. संपूर्ण कादंबरी ही वाचल्यानंतर तिचा प्रभाव लक्षणीय आहे. त्यांची शैली चित्रदर्शी आहे. आंतरिक उमाळ्यातून लेखन झाल्याचे जाणवते. हे लेखकाचे अनुभवकथनच आहे. त्यामुळे यात वास्तवाचा भाग अधिक व कल्पिताचा भाग अत्यल्प आहे. व्यक्तिरेखांची नावे काल्पनिक आहेत. त्यामुळे आपणास हिला आत्मकथन म्हणता येत नाही. बाकी स्थळ-काळ, घटना-प्रसंग हे सारे जीवंत आणि वास्तववादी आहेत. तत्कालीन जीवनाचा भाग आहेत. कादंबरीचा विषय लोकशाही आणि वर्गसंघर्षावर आधारित असलेली माओवादी विचारधारा त्यातील दुडिया ही व्यक्तिरेखा आहे.

दुडिया ही कादंबरी मानवी भावभावनांचा आलेख सुरेखपणे रेखाटत जाते. मानवी मनात प्रेमाची भावना असते. तिच्यातील चढउतार दुडियाच्या आयुष्यात दिसतात. निरागस प्रेम, प्रेमातील बांधिलकी, प्रेमातील समंजसपणा, तिच्याजवळ आहे. तिचे सर्व नातेबंध लेखकाने सुंदर रेखाटले आहेत. त्यामुळे प्रभावी घटना-प्रसंग कादंबरीत दिसतात. दुडिया या आदिवासी मुलीची निरागसता, तिचे आई-वडिलांविषयीचे प्रेम, भावाविषयीची ओढ प्रत्ययकारी आहे. त्यातून आपण वेगळ्या भावविश्वात जातो. दुडियाचे झालेले पहिले प्रेम, पहिला विवाह, दुसरे लग्न, या सर्व घटनाप्रसंगातील तिच्या मनोभावना लेखकाने बारकाईने टिपल्या आहेत. वाचक हा तिच्या भावनांशी समरस होतो. तिच्या सुखदुःखाला अनुभवतो. दुडिया ही वेगळी नायिका वाटू लागते. तिच्या मराठी पारंपरिक नायिकेपेक्षा वेगळी ठरते. ती आपल्यात स्त्रीत्व जपून आहे. तिच्यात मातृत्व आहे. संवेदनशीलता आहे. सत्याला सामोरे जाऊन स्वीकारण्याची तयारी आहे. तरी ती कठोर निर्णय घेऊ शकते. आयुष्याच्या शेवटच्या वळणार आई नसून आई होते. आपल्या नवऱ्याच्या पहिल्या बायकोची मुले हीच आपली मुले आहेत, या निर्णयावर येऊन ठाम राहते. ती चांगली माणूस आहे. बेडर- बिनधास्त हे गुण असूनही तिच्याजवळ माया- प्रेम आहे. आपल्या कामात कुशल आहे. ती आनंदात शेवटी संसार करते. असा तिच्या भावभावनांचा आलेख यात आला आहे. तिच्या जीवन कहाणीशी आपण समरस होऊन जातो.

त्याबरोबरच महेंद्र कर्मा या व्यक्तिरेखेचं वर्णन किती जिवंत आलं आहे, ते पाहता येतं.

'त्या खतरनाक सायंकाळी झिरमघाटीच्या हिरव्या झाडापानांतून नक्षलींच्या जोरदार आरोळ्या कानी पडत होत्या, ''महेंद्र कर्मा कहाँ है?'' तेव्हा एके-४७, एलएमजी अशा अनेक धडाडत्या संहारक रायफलींची व शस्त्रांची पर्वा न करता नक्षलींच्या दिशेनं एक जाडासा सावळा इसम पुढे आला. प्रेतांच्या ढिगाऱ्यातून निर्भयपणे पुढे चालत येत त्यानं नक्षलींना ललकारले, ''हां मै हूं महेंद्र कर्मा.'' त्याच क्षणी शंभरभर गोळ्यांनी कर्माच्या शरीराची अक्षरशः चाळण केली होती. त्यांच्या प्रेतावर नक्षलवादी खुन्नसमधे बराच वेळ थयथया नाचले होते. अशी छत्तीसगड नावाची ती हिरवी भूमी अलीकडच्या काळात लाल रक्तामधे नाहत होती.' (दुडिया पृ.४)

नक्षलवाद्यांचे जीवन व विचारसरणी याची चिकित्सा ही कादंबरी करते. भारतात माओवादाची किंवा नक्षलवादाची सुरुवात पश्चिम बंगालमध्ये एकोणीसशे साठच्या दशकात झाली. पश्चिम बंगालमधील नक्षलबारी गावात या भागात चारू








मुजूमदार यांनी तेथील जमीनदारांविरोधात आंदोलन केले होते. या आंदोलनालाच पुढे नक्षलवाद असं संबोधलं जाऊ लागलं. सत्तरच्या दशकात या आंदोलनाने अत्यंत उग्र रूप धारण केलं. ही चळवळ दडपण्याचा पोलिसांकडून अनेकदा प्रयत्न झाला. गेल्या काही वर्षांत माओवाद्यांचे अनेक गट तयार झाले. मध्य भारतातील अनेक भागात त्यांनी आपलं अस्तित्व प्रस्थापित केलं आहे. या भागाला रेड कॉरिडॉर असं म्हणतात.

झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, बिहार, छत्तीसगढ आणि आंध्र प्रदेश या भागांत या चळवळीचा मोठा प्रभाव आहे. देशातील अकरा राज्यांतील नव्वद जिल्ह्यांत ही चळवळ पसरली आहे. नक्षलवादी आणि प्रशासन यांच्यात कायम संघर्ष असतो. त्याचे चित्रण दुडियात आहे. तसेच चळवळीचे चित्रणही आहे. यात वर्गलढ्याची भूमिका आहे. भांडवलशाहीचे आकलन आहे. यातील दलमच्या बंडखोरांच्या मते, ते स्थानिक आदिवासींच्या हक्कासाठी आणि ज्या लोकांकडे सरकारने लक्ष दिलं नाही, अशा लोकांच्या हक्कासाठी हे लोक लढत आहेत. त्यांची जनतानी सरकार ही विचारधारा दिसते. आपले स्वतंत्र झेंडे ते गावोगावी फडकवतात. सरकारची हत्यारे लुटणे. चौक्या उडवणे. पोलीस मारणे. या सगळ्या झटापटीचे वर्णन रोमहर्षकपणे यात येते. सरकारने केलेल्या आदिवासींच्या शोषणाची कहाणी ही कादंबरी सांगते. प्रभा शर्मा ही धारदार व्यक्तिरेखा यात आहे, ते सत्य बोलत असतात.

'मध्येच प्रभा शर्मा खळखळून हसले. त्यांचा चेहरा एकाएकी कमालीचा विचारमग्न दिसला. शपथेवर कबुली द्यावी तशा थाटात ते मला म्हणाले, साठ, सत्तर आणि ऐंशीच्या दशकांतील सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी इकडे बिचाऱ्या आदिवासींवर केलेल्या अत्याचार आणि अन्यायाचे जेवढे म्हणून किस्से तुम्ही ऐकाल, ते सारे तंतोतंत खरेच असणार. बोलता बोलता मध्येच थांबून ते पुन्हा सांगू लागले, माझ्या माहितीतला एक फॉरेस्ट ऑफिसर आहे. एकदा रात्री प्यायल्यावर तो मला

खरी गोष्ट सांगू लागला- ''काही आदिवासी कुटुंबांकडून मी एक लाख रुपये रोजंदारीचे काम करून घेतले. पण ह्या पागल लोकांना कॅश कशासाठी द्यायची? त्यांच्यापुढे मी फक्त चार बोरी (पोती) तांदूळ आणि दोन ड्रम भरून महुआची दारू ठेवली. त्यात सारे भागले. उलटं ते खूशच झाले.' (दुडिया पृ.१५)

केंद्रवर्ती व्यक्तिरेखा दुडिया आहे. या शिवाय कादंबरीत, कॉ. गोपाल पोंक्षे, चौबेसाहेब, जयशेखरसर, शंकर, सुधाकर, कौसल्या, अवधेशबाबू, अस्लम या इतर महत्त्वाच्या व्यक्तिरेखा प्रभावी आहेत.

या कादंबरीपेक्षा वेगळे अस्तित्व दुडियाचे आहे. कारण अनिल बर्वे यांची 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरी ही कम्युनिस्ट मॅनिफेस्टोवर आधारलेली पूर्णतः डाव्या विचारसरणीची कादंबरी आहे. तसे आपणास दुडियाबाबत म्हणता येत नाही. यात डावी-उजवी- आदिवासी या साऱ्याच विचारधारा तटस्थपणे विचारात घेऊन रेखाटल्या आहेत. त्यामुळे ही कादंबरी कमालीची संतुलित विचाराधारेची आहे. धीरेंद्र अस्थाना यांची. 'समय एक शब्दभर नहीं है'- ही नक्षलवादावरील कादंबरी हिंदीत आहे. दुडियात लेखकाची तटस्थता कादंबरीला उंचीवर घेऊन गेली आहे. कोणतीही कादंबरी परिपूर्ण असत नाही. दुडिया ही व्यक्तिरेखा यात आहे.

नक्षलवादाच्या चिकित्सेपेक्षाही सरकारी यंत्रणा आणि नक्षलींच्या कचाट्यात सापडलेल्या गरीब आदिवासी जनतेची स्वाभिमानी प्रतिनिधी म्हणून मला दुडिया ही व्यक्तिरेखा खूप महत्त्वाची वाटली. दुडियाही आदिवासी समाजातील नायिका आहे. मराठी कादंबरीतील आजपर्यंत झालेल्या नायिकांपेक्षा वेगळी आहे. जी हातामध्ये शस्त्र घेऊन लढते आहे. जाचक-रूढी-परंपराविरूद्ध लढते आहे. आदिवासी समाजात लग्नासाठी मुलींना स्तन उघडे ठेऊन परीक्षा देऊन कौमार्य सिद्ध करणे तिच्या विचारधारेत नाही. त्यासाठी ती बंड करते. समाजाची पर्वा न करता घरातून पळून जाते. माओवाद्यामध्ये सहभागी होते. आदिवासींचे प्रश्न सुटले पाहिजेत. जंगलावर आदिवासींचा अधिकार आहे. हे डोंगर, नद्या, जंगले, वाचली पाहिजेत. नैसर्गिक आणि मुक्त वातावरणात आदिवासींना जगता आले पाहिजे. भांडवलदारांची नजर इथल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर आहे. त्यामुळे प्रशासनाकडून स्थानिकांवर अत्याचार होत आहेत. पुढारी-पोलीस हे लैंगिक शोषण करत आहेत.

या साऱ्याची चीड घेऊन दुडिया दलममध्ये सहभागी झालीय. त्वेषाने लढते आहे. परंतु ती नक्षलवादी संघटनेत गेल्यामुळे ती सरकारच्या अजेंड्यावर आली आहे. तशीच ती आपल्या कुटुंबापासून तुटली आहे. तिची घुसमट होते आहे. दुसऱ्या बाजूस तिला नक्षलवादी गर्भवती स्त्रियांवर हल्ले करतात ही बाब तिला

अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे या संघटनेत मानवता नाही अशी तिची धारणा झाली आहे. तिचे लैंगिक शोषण नक्षलवादी संघटनेत होते आहे. हे तिच्या लक्षात आल्यानंतर ती स्वतः स्वतःचा गर्भपात करते. ही नायिका स्वतः निर्णय घेणारी खंबीर लढवय्या आहे. ती वेगवान आहे. सगळ्या मोहिमांमध्ये ती चमकते. तिला शिक्षणाची आस आहे. परिवर्तनाची आस आहे. नक्षलवादी संघटनेत भावनांना फारसे स्थान नाही, हे तिच्या लक्षात येते. ती विद्रोह करून संघटनेतून बाहेर पडते. लोकशाहीत येते. सरेंडर होते. पुन्हा कचरू नावाच्या दोन मुले असणाऱ्या इसमाशी लग्न करते. असा हा तिचा कादंबरीतील प्रवास हा हॉलीवुड पटातील नायिकेप्रमाणे आपणास थक्क करणारा आहे.

विश्वास पाटील यांच्या कादंबरीचे सूत्र नेमके आहे. निवडणूक निरीक्षक अधिकारी त्याच्या ड्युटीवर नक्षलप्रभावग्रस्त भागात येतो व जातो. त्याची ओळख दुडिया या सरेंडर स्वयंपाकी कॉम्रेडशी होते. तिच्या जीवनाच्या पैलूच्या अनुषंगाने मोठा पसारा, राजकीय, पुढारी, प्रशासन, दलमवाले, जनतानी सरकारवाले, ते आदिवासी, वगैरे असा खूप मोठा पट कादंबरी रेखाटते. अनेक विचारधारांना मुळापासून ती तपासत त्यातील सत्याचा पर्दाफाश करते. त्यामुळे ही कादंबरी केवळ दुडिया भोवती केंद्रित न राहता, ती समग्र भारतीय व्यवस्थेतील डाव्या- उजव्यांची झाडाझडती करते. एक प्रकारे जगण्यातील वैविध्यपूर्ण तत्त्वज्ञानाचा आविष्कार करते. विशेषतः माओवादी तत्त्वज्ञानाच्या विविध पैलूंना, चळवळींना ही कादंबरी चांगला स्पर्श करते. या चळवळीचा परिसर, त्यांचा उदय, तत्त्वज्ञान, अनुयायी, त्यांचा आंतरराष्ट्रीय मार्क्सवादीसबंध, हे सारे बाकाव्यानिशी रेखाटले आहे. ही कादंबरी खऱ्या अर्थाने भारतीय मार्क्सवादाच्या जमेच्या व उणिवेच्या बाजू दाखवते. या चळवळीतील नाट्य, आक्रमकता, प्रेमप्रकरणे, अर्थकारण, निष्ठा, फुटीरता, वगैरे पैलू रेखाटत लेखकाने मूळापासून प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरीकाराची शैली कमालीची सहज-सोपी आहे. भाषेत कुठेही जडता नाही. क्लिष्टता नाही. फार तत्त्वज्ञान नाही. थोडक्यात सर्व भाषिक मात्रांचा वापर हा संतुलितपणे करण्यात आला आहे. भाषेतील वाक्यांचा प्रवाहीपणा हा कथानकाला गती देणारा आहे. त्यामुळे कथनातील सहजपणा हा गुण आपणास भावतो आहे.

'दुपारपर्यंतचे कामकाज आवरून डाक बंगल्यावर ओढणाऱ्या भोजनासाठी परतलो होतो. एवढ्यात खालून बावर्ची वर माझ्या सूटमध्ये आला. माझ्या भेटीसाठी दुडिया, तिचा नवरा कचरू आणि त्याची ती दोन पोरे असं सारं कुटुंब घेऊन मोठ्या अप्रूपानं खाली येऊन पोचल्याचं मला सांगण्यात आलं. मी बऱ्यापैकी

थकलो होतो. माझ्या कपाळावरची आठी मावळत नव्हती, हे बावर्चीच्या ध्यानात आले. तसा तो पडत्या सुरात अजिजीने बोलला, साहबजीऽ एक दो मिनिट दीजिये ना उसे-'

लेकिन साहबजी-दुडियाचे छोटे-छोटे दोन बच्चे आहेत. बडे साहबजी कसे दिसतात, हे तिला आपल्या पोरांना दाखवायचे आहे-

दुडिया (पृ.११७) यातील आत्मनिवेदनाच्या सुरामुळे कथन प्रभावी होते. कथ्य नेमके आहे. जेवढ्यास तेवढे घटनाप्रसंगानुरूप आहे. आपण एखादा इंग्रजी चित्रपट पाहत आहोत, असे वाटत राहते. पटकथे प्रमाणे सतत पुढे काय घडणार या नाट्याची उत्सुकता आपणास वाटत राहते. वाचकांची तंद्री भंगत नाही. भाषेचे जामर खास छत्तीसगडी जमले आहे. त्या प्रसंगानुरूप तशा शब्दांचा, वाक्प्रयोगांचा वापर लेखकाने केला आहे. त्यामुळे छत्तीसगडी हिंदीचा एक सुंदर माहोल कादंबरीत जाणवत राहतो. कधी प्रथम पुरुषी तर कधी द्वितीय पुरुषी निवेदनाने कादंबरीत रंगत आली आहे. या कादंबरीत वातावरण निर्मिती आहे, ती सुंदर आहे. चकमकी रोमांचकारी आहेत. उत्कंठावर्धक आहेत. त्यातील जंगल, नद्या, पर्वत, ओढे, झाडे, यांच्या सोबतीला असलेली शस्त्रास्रे यांनी एक नवे जग डोळ्यासमोर उभे राहते.

कादंबरीचा पोत हा बांधेसुध आहे. जिथं कादंबरी संपायला पाहिजे, तिथे संपते. कथानकाला उपकथानके आहेत. मुख्य व्यक्तिरेखा दुडिया तिच्या विचार, रूढीपरंपरा, चालीरीती, परंपरा, जीवनशैलीनुसार रेखाटली आहे. तिच्यातील वैचारिक परिवर्तनाची आंदोलने बदलासह लेखकाने चांगली टिपली आहेत. त्यामुळे ही खूप प्रभावी व केंद्रवर्ती व्यक्तिरेखा ठरली आहे. दुडियाचे बालपण, तिचा विद्रोह, तिचे धैर्य, शौर्य, प्रेम, चळवळीप्रती निष्ठा, तरीही मनात असलेली स्त्रियांबद्दलची माणुसकी, मातृत्व, मनाची कठोरता, सत्याची आस, कटुंबाबद्दलचे प्रेम, यामुळे ही व्यक्तिरेखा अजरामर झाली आहे. त्याबरोबरच निवेदक ही व्यक्तिरेखा, दुडियाचा भाऊ ठाकेरामदादा, तिचा नवरा कचरू व इतर दोन्ही बाजूंचे अधिकारी, यांच्या व्यक्तिरेखा छान आहेत. स्वाभाविक वाटतात. यातील नक्षलवाद्यांकडून मारल्या गेलेल्या मिलिट्री पोलीस आणि सामान्यांच्या कथा कादंबरीला वजन प्राप्त करून देणाऱ्या आहेत. यात क्रूरपणे मारले जाणारे लोक, त्यांच्या होणाऱ्या शोकांतिका मनात भय आणि अनुकंपा तयार करतात. कादंबरीचा एकंदरीत आकृतिबंध हा सणसणीत आहे. गोळीबंद नेमकेपणाने जाणारा आहे.

विश्वास पाटील हे कसलेले लेखक आहेत. त्यांची दुडिया कादंबरी ही

अनुभवाधिष्ठित असल्यामुळे तिला कोणतीही अवास्तव कल्पनाविलासाची, अतिरंजिततेची जोड नाही. त्यामुळे यातील जो निवेदक आहे, तो निरीक्षक आहे. अधिकारी आहे. एवढं असूनही त्यातील संवेदनशील माणूस जागा आहे. त्यामुळे यातील कथानक हे वास्तववादी वाचकाला अंतर्मुख करून चिंतन, मनन करायला लावते ही त्यांची जमेची बाजू आहे. कादंबरीने उभा केलेला काल आणि अवकाश याला खोली आणि उंची आहे, हे जाणवते.

त्याबरोबरच आजूबाजूस जे घडते आहे, ते संवेदनशीलपणे टिपले आहे. आजूबाजूच्या सगळ्या घटनात्मक नाट्याला साकारताना लेखक हा एका सीमारेषेवर आहे. त्यावरून त्याचा तोल इकडे तिकडे जाऊ शकतो. पण त्याने अचूक संतुलन राखल्यामुळे त्याची भूमिका कॅमरामनची झाली आहे. तो इतर कुणात फारसा गुंतलेला नाही. किंवा त्याच्या अंतर्मनातील इतर भावविश्व त्याने रेखाटले नाही. समोर चाललेल्या चित्रपटाची पटकथा तो लिहितो आहे. तोच कथन करतो आहे. आपली ड्युटी ही प्राणप्रिय आहे. निवडणूक व्यवस्थित पार पाडणे, हेच त्याचे कर्तव्य आहे. त्याशी तो बांधील आहे. लोकशाहीवर त्याचा पूर्ण विश्वास आहे. त्यादृष्टीनेच तो सरेंडर झालेल्या दुडिया आणि इतरांकडे पाहतो आहे. ही त्याची दृष्टी आहे. वाचकांना सगळ्या सत्याच्या पैलूंजवळ ही कादंबरी घेऊन जाते. वाचकांनीच निर्णय घ्यावा इथपर्यंत ती येते. खेड्यांचे शोषण जमीनदार, तसेच लोकशाहीतील पुढारी भांडवलदार नोकरदार करतात. या सत्यालाही उजागर करते तर जनतानी सरकार म्हणत नक्षलवाद्यांची अन्यायी–अत्याचारी कृत्येही ही कादंबरी उघडी करते. सलवा जुडम म्हणजे पिचलेल्या लोकांचा आवाज. खूप मोठ्या नक्षलप्रभावित भागाची नेमकेपणाने चिकित्सा करते. सगळ्या प्रदेशाचा गुणधर्म रेखाटते.

दुडिया : लोकशाही प्रक्रियेच्या अनुषंगाने माओवादी चळवळीची संतुलित चिकित्सा करणारी महत्त्वाची कादंबरी आहे असे म्हणता येते. तिच्यात केंद्रवर्ती नायिका दुडिया ही आहे. आजपर्यंत मराठी कादंबरीत मधु मंगेश कर्णिकांची जुईली, गो.नी. दांडेकरांची अंबुवहिनी, उद्धव शेळकेंच्या 'धग'ची कौशिक, रा.रं. बोराडे यांच्या 'पाचोळाची पार्वती', श्री.ना. पेंडसे यांच्या 'रथचक्रची नायिका', 'गारंबीची राधा', खानोलकरांची 'चानी', 'ब्र', कविता महाजनची 'नायिका', 'झिमपोरीझिमची नायिका', 'एका वाडीची गोष्टची नायिका, बाळासाहेब लबडे यांच्या 'पिपिलिकाची कौशी' यानंतर मराठीत दखलपात्र अशी विश्वास पाटील यांची दुडिया ही व्यक्तिरेखा आहे.

८. महानायक

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व सुभाषचंद्र बोस यांचे जीवन व संघर्ष हा किरकोळ इतिहास नव्हे, तर राजकीय व सामाजिक दृष्टीने मोठ्या पातळीवर उभा केलेला या कादंबरीत आहे. 'महानायक' ही कादंबरी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनाचे एक सर्वांगस्पर्शी, संशोधननिष्ठ आणि अविस्मरणीय चरित्र आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या पाठीमागील खऱ्या संघर्षशक्तीचा शोध घेणाऱ्यांसाठी हे पुस्तक फक्त साहित्यकृती नाही–तर स्फूर्ती, प्रेरणा आणि ऐतिहासिक जाणिवांचे दीपस्तंभ आहे.

कादंबरीचे सामर्थ्य म्हणजे–नेताजींच्या लहानपणापासून सुरू होणारा प्रवास, त्यांचे विलक्षण आत्मबल, शैक्षणिक प्रावीण्य, नजरकैदेतली लढाई, ब्रिटिश पदाचा त्याग आणि अखेरीस आझाद हिंद सेनेची उभारणी- या सर्व टप्प्यांचे अत्यंत जिवंत आणि तपशीलवार चित्रण. पाटील यांच्या लेखणीत नेताजी केवळ एक महान योद्धा न राहता, ध्येयवादी विचारवंत, संघटक, आणि राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणारा क्रांतिकारी नेता म्हणून साकारतात.

आझाद हिंद सेनेची स्थापना, परदेशातील साहसी प्रवास, गुप्त हालचालींचे काटेकोर नियोजन आणि ब्रिटिश साम्राज्याला दिलेल्या आव्हानाचे वर्णन कादंबरीला अतुलनीय थरार प्रदान करते. पुस्तकातील अनेक प्रसंग–शौर्य, त्याग, राष्ट्रभक्ती आणि जिद्दीचे दर्शन घडवतात; त्यामुळे वाचक पुन्हापुन्हा त्या पानांकडे ओढला जातो.

या कादंबरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नेताजींच्या संघर्षातून वाचकामध्ये निर्माण होणारा स्वअनुशासनाचा आणि राष्ट्राभिमानाचा ऊर्जावान स्पंदन. पाटील यांच्या साक्षेपी संशोधनामुळे ऐतिहासिक संदर्भ विश्वसनीय बनतात; तर त्यांच्या प्रभावी कथनशैलीमुळे ते मनात कोरले जातात.

'महानायक' ही केवळ कादंबरी नाही; ती नेताजींच्या अव्याहत संघर्षाची, अपार धैर्याची आणि अद्भुत राष्ट्रनिष्ठेची एक साहित्यिक स्मारकशिला आहे. भारताच्या स्वातंत्र्यइतिहासातील दडलेल्या सत्यांचे तेजस्वी पुनरुज्जीवन करणारी ही कादंबरी प्रत्येक अभ्यासक, तरुण वाचक आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या इतिहासात रस असणाऱ्यांनी जरूर वाचावी.

सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर आधारित कादंबरी विश्वास पाटलांच्या संशोधनाची पराकाष्ठा मानली जाते.

राजकीय विचारसरणी, राष्ट्रवाद, परकीय राजकारण, लष्करी ध्येयवाद,

स्वातंत्र्याची तळमळ या सर्वांचा अत्यंत तल्लख अभ्यास या कादंबरीत आहे. सुभाषचंद्र बोस यांचे जीवन हे एक गूढ आहे. त्या गुढाचा शोध घेण्याचा प्रयत्न आतापर्यंत अनेकांनी केलेला आहे. विश्वास पाटील यांनी सुद्धा अनेक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे सुभाषबाबूंच्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न महानायक मध्ये केलेला आहे. आणि त्यांच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू उलगडून दाखवलेले आहेत.

**९. पांगिरा**

ही कादंबरी ग्रामीण भागातील राजकारण नेमकेपणाने मांडत जाते. खेड्याचे प्रश्न रेखाटत जाते. सजवून झुंजीसाठी आणल्यावर त्याची जशी अवस्था होते, तसा मानाजी बावरलेला होता.

'गावकऱ्यांना घेऊन सोकाजीराव वेशीपाशी जाऊन उभा राहिला. वेशीवर पानाफुलांनी सजवलेली कमान डौलात उभी होती. बाजूला सुवासिनींचा ताफा आरत्या घेऊन, खोळंबून उभा. संपतराव आणि तान्या भिलारेनं लेझमाचा ताफा तयार ठेवलेला; मलवडीचा गजाही तालात उभा; तास-दोन तास सारा गाव खोळंबला. दुपार टळली आणि धुळीच्या रस्त्यात आचकं खात सावंताची ॲम्बेसिडर वेशीत येऊन उभी राहिली. तांबूस वाणाचा, कडक इस्त्रीतला, पासष्ट वर्षांचा म्हातारा खाली उतरला. याऽ आमदार साएबऽऽ अशी आरोळी मारून सोकाजीरावनं भलादांडगा हार सावंताला घातला. आमदारापाठोपाठ गॉगल घातलेला, खादी पँट-शर्टमधला रुबाबदार युवक उतरला. आमदार सावंत हसून म्हणाले, ''सरकारांना ओळखलं नाही का?''

''आवो, आसन कसं?,'' सोकाजी भांबवून म्हणाले, ''आवो, तुझा माग तालुक्यचान तारणहार, माझे वडील श्री पत्रावाच की.''

त्या गर्दीतून सोकाजीनी संपं संपा करुणा दिला. संपतराव पुढे गेले. सोकाजीराव म्हणाले, ''ह्या लेखकाची बलक आसनलंच की.''

''आहे तरऽऽ,'' आमदार सावंत श्रीपतराव आणि संपतरावकडं पाहून हसून म्हणाले, ''बघा पोरांनो, आम्ही गोरगरिबांची सेवा करून थकलो. आता यापुढं रयतेची सेवाचाकरी तुम्हीच करायची. हा जगन्नाथाचा रथ तुम्हीच ओढायचा.'' (पांगिरा पृ.२३)

राजकारणातील मुरब्बीपण विश्वास पाटील नेमकेपणाने शब्दबद्ध करतात. ते पांगिरामध्ये आलेले आहे.

'सजविलेल्या ट्रॅक्टरात आमदार बाबा सावंत, श्रीपतराव आणि सोकाजीराव

बसले. वाजत-गाजत मिरवणूक पुढे चालली. 'आमदार बाबासाहेब सावंत सरकारांचा विजय असोऽऽ' - घोषणांवर घोषणा दुमदुमत होत्या. आमदार सावंत विस्फारल्या नजरेनं समोरच्या गर्दीकडं बघत होते. अशीच मिरवणूक, असाच जयघोष, असाच डामडौल माझ्या माघारी माझ्या श्रीपतरावचा राहायला हवा, अशी त्यांची इच्छा साऱ्या जिल्ह्याला ठाऊक होती. पण आता आपल्या घराण्याच्या राजकीय अस्तित्वाला कोणीतरी शह देण्यासाठी उभा आहे याची जाणीव बाबा सावंतांना झाली होती. जामगावच्या काळ्यांचा संताजी, कुठला कोण कुणबाट आपल्या खानदानाविरोधी बांधणी करतोय, ही गोष्ट त्यांच्या ध्यानी येऊन काही महिने लोटले होते. श्रीपतरावचं आजवरचं आयुष्य शाळाशिक्षणाच्या निमित्त पुण्या-मुंबईत गेलं आहे, तो आपल्या माघारी टिकला पाहिजे ही सावंतांची तळमळ होती.

आमदार सावंत हे या मुलखाचे पूर्वाश्रमीचे जहागीरदार होते. व्यक्ती वर्णन व वातावरण निर्मिती आणि चिकित्सा याबाबतीत पांगिरा लक्षणीय ठरते. (पांगिरा पृ.२३)

कादंबरी ग्रामीण महाराष्ट्रातील दुष्काळ, दरिद्रता, स्थलांतर, सामाजिक असमानता आणि ग्रामीण विकासाच्या खोट्या गाजावाज्याचे जिवंत चित्रण करणारी महत्त्वाची साहित्यकृती आहे. आज विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असल्या, प्रगतीचे आकडे दाखवले जात असले तरी त्या विकासाची गंगा खऱ्या अर्थाने शेतकरी, मजूर, कष्टकरी यांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचलेली नाही. हे या कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे उलगडले जाते.

कादंबरीत पांगिरा आणि डोंगरवाडी ही दोन गावं केवळ पार्श्वभूमी नसून स्वतःच नायक आहेत. गावाची वैराण जमीन, कोरडा दुष्काळ, विझत चाललेलं जीवन, रिती होत चाललेली मने- या साऱ्यांची सामूहिक वेदना लेखक अत्यंत संवेदनशीलतेने आणि वास्तववादी शैलीत मांडतात. विश्वास पाटील यांची भाषा सशक्त, चित्रमय आणि पाहताक्षणी भेद करणारी असल्याने वाचकाला त्या गावातच नेऊन उभं करते.

या कादंबरीतली पात्रे जरी एखाद्या व्यक्तीची कथा सांगत असली, तरी त्यांचा संघर्ष सामूहिक आहे. शेतकरी कुटुंबांचं रोजचं जगणं, सरकारच्या निष्क्रिय योजनांच्या नावाखाली होणारं शोषण, पाण्याच्या समस्या, मुलांच्या भविष्याची धूसर होत जाणारी स्वप्नं- ही सगळी अनुभवपटातील वास्तवता पांगिराला केवळ साहित्यकृती न राहता, सामाजिक दस्तऐवज बनवते.

पांगिरा ही कादंबरी वाचकाला ग्रामीण विकासाबाबतचे आपली गृहीतकं








पुन्हा तपासायला लावते. प्रगतीच्या चकचकीत आवरणाखाली दडलेल्या विस्थापित आणि उपेक्षित जगाचे कठोर सत्य उलगडून दाखवणे, सामाजिक संवेदनांना जागं करणे आणि वाचकाला अंतर्मुख करणे- हे या कादंबरीचे मोठे योगदान आहे. म्हणूनच पांगिरा ही एका गावाची नव्हे तर संपूर्ण ग्रामीण भारताची सामूहिक कथा ठरते. ही कादंबरी विकासाच्या मृगजळामागील कटू वास्तव उलगडते आणि म्हणूनच विश्वास पाटील यांच्या साहित्यसृष्टीतील अत्यंत महत्त्वपूर्ण, परिवर्तनवादी आणि विचारप्रवर्तक अशी कादंबरी ठरते.

### १०. झाडाझडती

विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही साहित्य अकादमीने सन्मानित केलेली कादंबरी महाराष्ट्रातील धरणबांधणी, विस्थापन आणि ग्रामीण जीवनातील मूलभूत बदल यांचे अत्यंत वास्तव, समग्र आणि मन हेलावून टाकणारे चित्रण करते. ही केवळ धरणग्रस्तांची कथा नाही; तर विकासाच्या नावाखाली मानवी जीवनावर होणाऱ्या आघातांचा, राजकीय स्वार्थांचा आणि सामाजिक विघटनाचा चिकित्सक आढावा घेणारी प्रभावी साहित्यकृती आहे.

धरणामुळे गाव विखुरते, माणसे उखडून फेकली जातात, त्यांच्या घराघरातील स्मृती पाण्यात बुडतात- या प्रक्रियेचे जीवंत, वेधक आणि सूक्ष्म चित्रण ही कादंबरी करते. पुनर्वसनाच्या नावाखाली होणारे भ्रष्टाचार, पक्षीय संधिसाधूपणा, खोट्या आश्वासनांचा खेळ आणि सामान्य माणसाचे प्रचंड असुरक्षित, अनिश्चित जीवन हे कथानकाचे मध्यवर्ती दोषकेंद्री सत्य ठरते.

कादंबरीतील पात्रे जिवंत, संघर्षमय आणि अंतर्मनातील अस्वस्थता घेऊन वाचकासमोर उभी राहतात. विकासाची किंमत कोण मोजतो? कागदी योजनांमध्ये न दिसणाऱ्या माणसांचे जगणे किती स्वस्त असते? आणि 'प्रगती'च्या नावाखाली

समाजाची झाडाझडती कशी होते? हे प्रश्न लेखकाने अत्यंत प्रभावीरीत्या उभे केले आहेत.

विश्वास पाटील यांची भाषा ओघवती, पण धारदार आहे. ग्रामीण बोली, सामाजिक वास्तव आणि राजकीय खेळ यांचे ते अचूक संतुलन राखतात. कादंबरीचे कथन प्रदेशातील दहा-पंधरा वर्षांच्या बदलांचा साक्षेपिक इतिहास बनते कधी करुण, कधी क्रोधपूर्ण, तर कधी शांत पण असह्य वेदना सांगणारे.

'झाडाझडती' ही साहित्यिक सौंदर्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा संयोग असलेली अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. विकासाच्या काळ्याकुट्ट मागच्या बाजूचा सत्यआरसा वाचकासमोर ठेवणारी, धरणग्रस्तांच्या वेदनेला आवाज देणारी, आणि मानवी अनुभूतीचे बहुआयामी प्रतिबिंब दाखवणारी ही कृती आधुनिक मराठी साहित्यात कायम स्मरणात राहील अशी आहे.

**११. नागकेशर**

विश्वास पाटील यांनी ग्रामीण राजकारण, सहकारी साखर कारखाने, कुटुंबीय सत्तासंघर्ष आणि मानवी नाती यांच्या गुंतागुंतीचे प्रभावी चित्रण सातत्याने आपल्या कादंबऱ्यांमध्ये केले आहे. नागकेशर ही त्यांची अशीच एक सशक्त, बहुआयामी आणि काळाचे भान देणारी कादंबरी आहे. साखर उद्योगाच्या भोवती गुंफलेले हे कथानक प्रत्यक्षात ग्रामीण राजकारणातील लोभ, स्वार्थ, सत्ता, अभिमान आणि सामाजिक बदलांची जिवंत कहाणी बनते.

कादंबरीचे केंद्र दोन भावंडांभोवती बापूराव आणि बबननाना यांच्या भोवती फिरते. दोघेही प्रतिष्ठित डोंगरे-देशमुख घराण्यातील, परंतु साखर कारखान्यावरील वर्चस्वाच्या हावेतून त्यांच्या नात्यात संघर्ष, मतभेद आणि कटकारस्थानांचे वादळ उठते. शिक्षणातून घडलेला, शांत, सूक्ष्म निरीक्षणशक्ती असलेला बापूराव आणि यश, सत्ता व प्रतिष्ठेत रममाण असलेला बबननाना या दोन व्यक्तिमत्त्वांच्या विरोधातून ग्रामीण नेतृत्वाची मानसिकता लेखक नेमकेपणाने टिपतात.

पुढच्या पिढीत राजकुमार उर्फ प्रिन्स आणि बाजीराव यांच्यातील संघर्ष ही कादंबरीची दुसरी मुख्य रेखा. प्रिन्स हा निसर्गप्रेमी, सहकाराच्या चमकदमकपासून दूर राहणारा; तर बाजीराव महत्त्वाकांक्षी, राजकारणाची स्वप्ने पाहणारा. या दोन स्वभावविश्वांच्या संघर्षातून सहकार-राजकारणाची खरी परीक्षा दिसते. नेत्रा या पात्राद्वारे लेखक सत्तेची वेगळी, पण वास्तववादी बाजू उलगडतात. वर्चस्वाची हाव, वारशाची हव्यास आणि कुटुंबातील राजकारणाचा विषारी परिणाम.







शलका हे पात्र कादंबरीचे सर्वाधिक प्रभावी केंद्र आहे. अत्याचार सहन करतानाही न झुकणारी, स्वतःच्या सामर्थ्याने उभी राहणारी, कष्टाळू आणि बुद्धिमान अशी ही नायिका सत्तेच्या शिडीवर स्वतःच्या धैर्याने चढते. तिच्यामुळेच कारखाना पुन्हा योग्य मार्गावर येतो, प्रिन्सचे नेतृत्व सक्षम बनते आणि ग्रामीण समाजातील महिलांची बदलती भूमिका अधोरेखित होते. शलकाच्या आयुष्यातील राजकीय संघर्ष बाजीराव, नेत्रा, तिचा पहिला पती रमेश दिवसे, आणि सुपर प्रिन्स अशा चौफेर दबावांमध्ये जिंकलेली निवडणूक लेखक अत्यंत नाट्यमय, पण वास्तवतेला धरून रंगवतात.

राजकारणातील सत्तांतर, सहकारातील आर्थिक खेळी, कुटुंबातील भावनिक गुंतागुंत आणि नात्यांवर येणारे ताण-तणाव यांची गुंफण विश्वास पाटील यांच्या शैलीस अनुसरून प्रवाही, आकर्षक आणि कथेला ताकद देणारी आहे. कथानकातील उलटफेर, संघर्ष, कटकारस्थानांचे थर आणि शेवटी न्याय व लोकशाहीची जिंकलेली बाजू हे सर्व वाचकाला खिळवून ठेवते.

**१२. क्रांतिसूर्य**

विश्वास पाटील यांची क्रांतिसूर्य ही कादंबरी १९४२च्या पुरोगामी, आंदोलनांनी धगधगणाऱ्या कालखंडात उभी राहणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील या थोर क्रांतिकारकाच्या जीवनाचा दस्तऐवजी, तसेच कलात्मक शोध घेते. सत्यघटनांवर आधारलेली ही कादंबरी ऐतिहासिक साहित्याचा आणि चरित्रकलेचा उत्कृष्ट नमुना ठरते.

नाना पाटलांचे व्यक्तिमत्त्व–शब्दांची जादू असलेला प्रखर वक्ता, डाव्या विचारसरणीचा तगडा योद्धा, शोषितांच्या बाजूने खंबीर उभे राहणारा सामाजिक क्रांतिकारक, लेखक अत्यंत परिणामकारक पद्धतीने उभे करतो. साताऱ्यात निर्माण झालेली 'प्रतिसरकार' ही तत्कालीन भारतातील अद्वितीय प्रयोगात्मक जनशासन–व्यवस्था, तिच्यामागचा जनतेचा विश्वास, आणि या घटनेत नानांनी बजावलेली असामान्य नेतृत्व भूमिका यांचे वर्णन रोमांचकतेने साकारले आहे. कादंबरी ऐतिहासिक दस्तऐवजाप्रमाणे नेमके, तर साहित्यकृतीसारखे भावस्पर्शी भासते.

विश्वास पाटील यांच्या लेखनाची खासियत म्हणजे त्यांनी नुसत्या घटना सांगितल्या नाहीत; तर त्या घटनांमागच्या सामाजिक, राजकीय व मानसिक प्रवाहांना पकडून नायकाचे अंतःकरणही वाचकांसमोर उलगडले आहे. नाना पाटलांच्या कल्पकतेने व ठाम निश्चयाने उभी राहिलेली ग्रामस्वराज्याची बीजे, ब्रिटिशांविरुद्धचा असहकार आणि शोषितांसाठी झटण्याच्या तळमळीने प्रेरित त्यांचे मार्क्सवादी दृष्टिकोन हे सर्व लेखक उभे करतात तेव्हा कादंबरी फक्त इतिहास राहत नाही; ती वर्तमानालाही स्पर्श करते.

भाषेतील ओज, प्रसंगांची नाट्यमयता, ग्रामीण जनजीवनाचे चित्रण आणि स्वातंत्र्यलढ्याची धग यामुळे क्रांतिसूर्य वाचकाला गुंतवून ठेवते. कादंबरी नानांच्या संघर्षाचे गौरवगान करते, पण अंधभक्ती न करता त्यांच्या विचारांचे, मर्यादांचे आणि धडाडीचे वास्तववादी चित्र रेखाटते, ही तिची मोठी ताकद आहे. क्रांतिसूर्य ही कादंबरी स्वातंत्र्यलढ्याचा एक वेगळा अध्याय जिवंत करताना नाना पाटलांच्या व्यक्तिमत्त्वातील तेज, साधेपणा आणि लढाऊ बाणा प्रभावीपणे पकडते. इतिहास, क्रांती आणि साहित्य यांचा सुंदर संगम घडवणारी ही कादंबरी मराठी वाचकांच्या स्मरणात कायम राहील अशी आहे.

**वाङ्मयीन आकलन**

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांतील पात्रे दुहेरी किंवा बहुविध स्तरांची असतात.

ती केवळ नायक/खलनायक असे विभाजन नसून परिस्थिती, राजकारण, इतिहास आणि सामाजिक शक्तिसंबंध यांद्वारे तयार झालेली असतात.

उदाहरणार्थ, पानिपतमधील सदाशिवराव भाऊ, अब्दाली. संभाजीतील संभाजी महाराज विद्रोही, बुद्धिमान, भावनिक आणि रणनीतीकार. चंद्रमुखीतील चंद्रमुखी समाजव्यवस्थेच्या दडपणाखाली अडकलेली, पण स्वाभिमानी कलाकार.

झाडाझडतीतील विस्थापित सामूहिक वेदनेचे प्रतीक. यात पात्रे म्हणजे

व्यक्तिरेखा नसून, एखाद्या कालखंडाची जिवंत प्रतिमा आहेत. भूभाग, किल्ले, रणांगणे, खेडी, शहरांचे नकाशे हे दृश्यात्मक बनवतात. वाचक समोरचा इतिहास वर्तमानकाळात उभा राहिल्यासारखा अनुभवतो. संवाद हे फक्त बोलणे नाही, तर तत्त्वज्ञान, नेतृत्व, विचारधारा, कूटनीती यांची देवाणघेवाण आहेत.

'बघता बघता महाडचा निसर्गरम्य परिसर आला. चौफेर पहारेकऱ्यांसारखे गस्त घालत बसलेले चौफेर डोंगर आणि मधे दूरवर पसरलेली बाणकोटची खाडी दिसू लागली. धावून धावून घोड्यांच्या तोंडाला खरस आली होती. सकाळच्या कोवळ्या, आल्हाददायक थंडीतही ती जनावरे घामाने निथळत होती. त्यांच्या फऱ्यापर्यंत तांबड्या मातीचा लेप चढला होता. शेपटीच्या पुंजात कुसळं अडकली होती.

बाणकोट खाडीच्या काठावर दुरून अनेक लहानमोठे तंबू आणि राहुट्या दिसल्या. राजांचा नाविक तळ जवळ आला. डाव्या बाजूचे डोंगरकडे पाहतच शंभूराजांनी घोड्यावरून खाली उडी ठोकली. त्यांच्या अश्वाचा लगाम पकडण्यासाठी एकदम पाचसहा मोतद्दार पुढे धावले.

अजून हवेत चांगलाच गारठा होता. अंगावर शाली आणि घोंगड्याच्या भाळी घेतलेले वृद्ध मायनाक भंडारी, दर्यासारंग, गोविंदराव काथे, संताजी पवळा, सिद्दी मिस्त्री अशा नौदल अधिकाऱ्यांनी राजांना वेढा दिला. फुलमाळा देऊन हर्षभरित स्वागत झाले. मायनाकला तर आपल्या धन्याचं खूपच कौतुक वाटले. तो हर्षभरित होऊन बोलला, ''वाऽ राजं! सूर्याची किरणं उगवण्याआधी आपण इथं पोचलात,

मनालच भारती अलयगत जालन बाघा.''

''देर तर झाला नाही?'' राजांनी विचारले.

''छे, छे! अजून सुतार कामाठीबी इथं पोचलेलं नाहीत.'' संताजी पवळा कौतुकानं बोलला.

राजे तिथेच खाडीच्या काठावर उभे राहिले. खाडीच्या दोन्ही अंगाला अनेक लहानमोठ्या राहुट्या आणि यंत्रशाळा उभ्या केल्या गेल्या होत्या. पश्चिमेकडून प्रातःकाळचा वारा भिरभिरत विस्तीर्ण खाडीतून आत येत होता. पाण्याशी दंगामस्ती करत होता. त्याबरोबर आत जळात नांगरलेली गुराबे, पाल, तरांडी, माचवे अशी लहानमोठी जहाजं जागच्या जागी डुचमळताना दिसत होती. डोलकाठ्यांजवळ बांधलेल्या भगव्या झेंड्याचे फरारे वाऱ्याच्या झोतावर डौलाने फडकताना दिसत होते.

शंभूराजे तिथेच स्वप्नात हरवल्यासारखे उभे राहिले. ते एकटक जलपृष्ठाकडे पाहत होते. राजाच स्तब्ध असल्याने बाकीचा झमेलाही खोळंबला होता. कविराज दोन पावले पुढे सरकले. हलकेच शंभूराजांना बोलले, ''राजन–''

"हां, कविराज. हीच ती बाणकोटची खाडी. आमच्या आबासाहेबांना समुद्र-स्नानाची खूप आवड होती. ते अनेकदा यायचे इथे मनसोक्त डुंबायला. आम्ही पहिल्यांदा कुठं पोहायला शिकलो ठाऊक आहे?"

"कुठं?"

"आम्ही पाण्यात हातपाय हलवायची कला शिकलो. (संभाजी पृ.३६५)

कथेमध्ये एकाच वेळी उत्कंठा, संशोधन आणि भावभावना यांचा ताळमेळ.

युद्ध, राजकीय संघर्ष, प्रेम, सत्ताकारण, विस्थापन या सर्व घटनांची मांडणी नाट्यपूर्ण आहे. भाषा साधी, प्रवाही आणि सशक्त आहे. संवादांमध्ये बोलीभाषेचा स्पर्श, वर्णनांमध्ये उच्च प्रतीची साहित्यिकता, आणि ऐतिहासिक प्रसंगांमध्ये तटस्थ व वस्तुनिष्ठ शब्दप्रयोग असा संतुलित वापर. रूपक, उपमा, प्रतीक यांचा वापर नियंत्रित; पण अर्थवाही.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या संरचनेच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत :

क्षैतिज (Horizontal) स्तर व्यापक ऐतिहासिक/सामाजिक घटनाक्रम, उर्ध्व (Vertical) स्तर व्यक्तीचे मानसशास्त्र, अंतर्मन, संघर्ष कालक्रमाचे काटेकोर पालन (विशेषतः पानिपत, महानायकमध्ये) समांतर कथन.

(उदाहरणार्थ, चंद्रमुखी – कलाकार आणि राजकारणी यांच्या दोन वेगळ्या, पण जोडलेल्या जीवनरेषा)

**सामाजिक बांधिलकी**

विश्वास पाटील यांचे लेखन समाजप्रतिबद्ध आहे. विस्थापन आणि जलनीतीतील अन्याय– झाडाझडती, महाराष्ट्रातील ग्रामीण पीडा आणि राजकीय नियंत्रण – पांगिरा, स्त्रीजीवनाचे संघर्ष आणि सामाजिक दांभिकता – चंद्रमुखी,

इतिहासातील चुकीच्या प्रतिमांचे पुनर्मूल्यांकन – संभाजी.

सत्तेचे राजकारण आणि नेतृत्वाचे मानसशास्त्र – महानायक, ही काही उदाहरणे देता येतात. त्यांचे लेखन समाजशास्त्रीय वास्तव आणि मानवी अस्तित्वाचा संघर्ष यांची सांगड घालते. विश्वास पाटील यांची कादंबरी ही कथानक, इतिहास, समाजविश्लेषण, राजकारण, मानसशास्त्र, संशोधन यांच्या विलक्षण संयोगातून तयार झालेली आहे. त्यांचे साहित्य वाचकांना माहिती देते, विचार करायला लावते आणि भावनिक पातळीवर हलवतेही. त्यांच्या कादंबऱ्या मराठी साहित्याला गंभीरता, व्याप्ती, संशोधन, आधुनिकता आणि सामाजिक बांधिलकी यांची नवी दिशा देतात.

**विश्वास पाटील यांचे कथालेखन**

विश्वास पाटील यांचा एक कथासंग्रह प्रकाशित आहे.

विश्वास पाटील यांनी अनेक अप्रतिम कथा लिहिलेल्या आहेत. त्यात 'फलाटावरील शहीद' ही सुंदर कथा आहे. एखादा देशभक्त आपल्याच नातेवाइकांच्या माध्यमातून कसा बदनाम होतो आणि त्याचा शेवटही फलाटावर होतो, अशी शोकांतिका या कथेतून आलेली आहे.

विश्वास पाटील हे प्रामुख्याने ऐतिहासिक, सामाजिक आणि संशोधनप्रधान कादंबऱ्यांसाठी ओळखले जातात. परंतु या प्रतिमेच्या पलीकडे विनोद, उपरोध आणि ग्रामीण राजकारणातील खेळकर माहौल रंगवण्याची त्यांची ताकदही तितकीच भक्कम आहे, याचा उत्तम प्रत्यय 'सातारा कोर्टात जेठमलानी' या कथेमधून येतो. ही कथा जत्राच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली असून तिचा गाभा विनोदी साहित्याच्या परंपरेशी घट्ट जोडलेला आहे. कथेचा विनोद हा कोणत्याही कृत्रिम प्रसंगातून येत नाही. तो उद्भवतो ग्रामीण राजकारणातील डिंगखोरपणातून, मातब्बर नेत्यांच्या संवादातून आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या हट्टी जिद्दीमधून.

वसंतदादांच्या इंजिनीअरिंग कॉलेज मंजुरीपासून ते जेठमलानीला साताऱ्यात आणण्याची विचित्र इच्छाही विरोधाभासी परिस्थिती स्वतःच हास्यनिर्मिती करते. संवाद इतके जिवंत, टायमिंगयुक्त आणि बोलक्या मराठी ढंगात आहेत, की वाचकाला हा विनोद सहज आणि नैसर्गिक वाटतो.

कथेमधील विनोद हा केवळ हसवणारा नाही; तो व्यंगात्मकही आहे.

राजकारण्यांच्या सामर्थ्यदर्पावर, न्यायालयीन व्यवस्थेतील दिखाऊपणावर आणि इज्जतीसाठी लढणाऱ्या कट्टर कार्यकर्त्यांच्या मर्दानी भावनांवर लेखक हलकेच बोट ठेवतात.

जेठमलानीसारखा नामवंत वकील एका जिल्हा न्यायालयात यावा, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. पण हीच कल्पना मराठी विनोदी परंपरेतील 'अतिरंजित वास्तववाद' जिवंत करते.

कथेमधील पात्रे ही मराठी विनोद-परंपरेतील ठरावीक, परंतु आकर्षक ढंगातील आहेत. डिंग मारणारा कार्यकर्ता, संतुलित पण गमतीदार मुख्यमंत्री, आणि सेरेमोनियल जेठमलानी.

त्यांच्या वर्तनातील विसंगती वाचकाला सतत हसवत राहते. विनोदाची शिदोरी पात्रांच्या बोलण्यातील नैसर्गिक खटके आणि ग्रामीण भाषेच्या गंधातून उलगडते. विनोदी कथा म्हणून तिची गती चपळ, स्वच्छ आणि वाचनात खेळकर आहे.

'जत्रा' दिवाळी अंकासाठी ही कथा योग्य ठरते, कारण तिच्यातील हलकेफुलके

प्रसंग, टाळ्यांचे आपटबार आणि हास्याचे भूसनळे वाचकाला सणासुदीची प्रसन्नता देतात.

ही कथा मराठी विनोदी साहित्याला मिळालेल्या राजकीय विनोदाच्या परंपरेतील एक सुंदर भर घालते.

कार्यकर्त्यांचा गर्व, नेत्याची सहजता आणि या सर्वांच्या मध्ये 'जेठमलानी'चा अनपेक्षित प्रवेश- या त्रिकोणातून निर्माण होणारा हशा कथेचे वेगळेपण सिद्ध करतो. 'सातारा कोर्टात जेठमलानी' ही कथा विनोद, व्यंग आणि संवादातील चपळाईचा सुंदर नमुना आहे.

विश्वास पाटील यांच्या गंभीर साहित्यिक प्रतिमेला समांतर असा हलकाफुलका, ग्रामीण, राजकीय आणि गमतीदार पैलू वाचकांना यामुळे अनुभवायला मिळतो.

**मराठी कादंबरीस योगदान**

मराठी कादंबरीचे स्वरूप विसाव्या शतकाच्या मध्यावर जसे आधुनिकतेकडे झुकले, तसे शोधक, संशोधनात्मक, बहुविध आणि समाजनिष्ठ लेखन करण्याचे प्रयत्नही वाढले. याच प्रवाहात विश्वास पाटील यांचे आगमन एक निर्णायक टप्पा मानला जाऊ शकतो. त्यांनी कादंबरीला केवळ कथनकलेची चौकट न ठेवता इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, मानवी मानसशास्त्र आणि विकासनीती यांचा सखोल अभ्यास एकत्र विणून मोठ्या प्रमाणावर प्रभावी साहित्यनिर्मिती केली.

विश्वास पाटील यांचे कादंबरीविश्व हे इतिहासाची जाण, राजकीयता, मानवी संघर्ष, विकासाच्या प्रक्रियेतील विस्थापन, स्त्री-अस्तित्वाचे जग, युद्ध आणि राष्ट्रवादाचे प्रश्न या विविध स्तरांनी बनलेले आहे. त्यांच्या साहित्याची मिती एकाच विषयापाशी थांबत नाही; ती प्रादेशिकतेपासून जागतिकतेकडे, वैयक्तिक वेदनेपासून राष्ट्रीय हिताकडे आणि इतिहासापासून समकालीन वास्तवाकडे निगडित आहे.

विश्वास पाटील यांचे कादंबरीविश्व हे प्रामाणिक संशोधन, साहित्यिक दृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्ये यांचा संगम आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये इतिहासाचा भव्य पट आणि सामान्य माणसाची वेदना हे दोन्ही एकत्र दिसतात. हीच त्यांची साहित्यिक शक्ती आहे. मराठी कादंबरीला त्यांनी व्याप्ती, लय, संशोधन, तीव्रता आणि मानवी संवेदना दिल्या. त्यांची कादंबरी वाचकाला विचार करायला लावते, अस्वस्थ करते, आणि इतिहास-समाज-मानस यांचे नवे संबंध उलगडते.

**- प्रा. डॉ. बाळासाहेब लवंडे**

भ्रमणध्वनी : ९१४५४७३३७८

# साहित्यिक जीवनचरित्र

## विश्वास पाटील : साहित्यिक परिचय

***विश्वास पाटील,** १९९२ सालच्या मुख्य साहित्य अकादमी पुरस्काराचे विजेते. मराठीतील प्रख्यात कादंबरीकार व नाटककार आहेत. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील नेरले नावाच्या छोट्याशा खेड्यात शेतकरी कुटुंबात झाला.*

**महत्त्वाचे सन्मान व पुरस्कार**

फेब्रुवारी २०२० मध्ये श्री. पाटील यांना त्यांच्या साहित्य योगदानासाठी विशेषतः झाडाझडती (A Dirge for Dammed) आणि नागकेशर या कादंबऱ्यांसाठी इंदिरा गोस्वामी साहित्य राष्ट्रीय पुरस्कार (आसाम) प्राप्त झाला. यापूर्वी हा मान महाश्वेता देवी आणि भैरप्पा यांसारख्या नामवंत लेखकांना मिळाला होता.

झाडाझडती (हॅशेट या विख्यात प्रकाशन संस्थेकडून इंग्रजीत A Dirge for Dammed नावाने प्रकाशित). या कादंबरीसाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. ही कादंबरी मोठ्या धरणांमुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांच्या जीवनावर व त्यांच्या पुनर्वसनाच्या समस्येवर आधारित असून भारतातील तिचा अनेक भाषांत अनुवाद झाला आहे.

**सामाजिक आणि राजकीय कादंबऱ्या**

**लस्ट फॉर मुंबई (Lust for Mumbai) –** मुंबईतील ६२ कापड गिरण्यांच्या विक्रीमागील राजकारण, माफियांचा हस्तक्षेप आणि तीन लाख गिरणी कामगारांचे हाल. १९८२च्या गिरणी कामगारांच्या संपानंतरचे मन्वंतर.

**पांगिरा –** शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याच्या अतोनात वापरामुळे समृद्धीकडून दुष्काळाकडे परिवर्तन झालेल्या एका खेड्याच्या ऱ्हासाची कथा.

**नागकेशर –** सहकार, ऊस उद्योग आणि सार्वत्रिक निवडणुका भोवती फिरणाऱ्या राजकीय खेळी आणि सामान्य कष्टकऱ्यांच्या वाट्याला आलेले दैन्य या विषयावरची ही वेगळी कादंबरी आहे.

**दुडिया –** नक्षलवादाकडे फोडलेली वळलेली एक आदिवासी तरुणी आणि

छत्तीसगडच्या पार्श्वभूमीवर पाटील यांनी लिहिलेली दुडिया ही कादंबरी. पाटील यांची ही कलाकृती तीन वर्षांमध्ये ही कादंबरी हिंदी, इंग्रजी, कन्नड, तेलगू, बेंगाली, आसामी, ओडिया, मल्याळी अशा आठ भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होऊन साहित्यिक चर्चेचा विषय बनलेली आहे.

**ग्रेट कांचना सर्कस** – श्री. पाटील यांची दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील एका कांचना नावाच्या एका सर्कसरागिणीच्या बहादुरीची आणि तिने आपल्या माणसा जनावरांसह केलेल्या दोन हजार किलोमीटर प्रवासाची वेगळी कहाणी आहे. ही कादंबरी हिंदीमध्ये 'वाणी प्रकाशन'ने प्रकाशित केली आहे.

**ऐतिहासिक कादंबऱ्या**

**संभाजी आणि पानिपत** – या ऐतिहासिक कादंबऱ्यांना अफाट लोकप्रियता लाभली असून पानिपतच्या युद्धाबाबत वाङ्मयीन पटलावरून नवीन प्रमेय पाटील यांनी मांडली. तसेच संभाजीराजांच्या परंपरागत व्यक्तिरेखेच्या मांडणीला छेद देऊन एक बलदंड राजकीय पुरुष व शिवछत्रपती नंतर हिंदवी स्वराज्य कणखरपणे सांभाळणारे शंभुराजे असे त्यांचे विराट चित्र या कादंबरीच्या द्वारे वाचकांसमोर सादर केले. केवळ मराठीतच तीन लाखांहून अधिक प्रती विकल्या गेल्या आहेत. पानिपत आणि संभाजी दोन्ही कादंबऱ्या अलीकडे इंग्रजीमध्ये सुद्धा 'वेस्टलँड इका' या प्रकाशन संस्थेने इंग्रजीमध्ये प्रकाशित केल्या आहेत.

**महानायक** – सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील संघर्षावर आधारित राजकीय नाट्य व व्यक्तिगत परस्पर संबंधांचा पाटील यांनी धांडोळा घेतला. तसेच नेताजींच्या ब्रह्मदेशातील व जपान मधील कारकिर्दींचा शोध घेऊन तो कादंबरी माध्यमातून सकसपणे सादर केला.

या कादंबरीसाठी श्री. पाटील यांनी इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान, म्यानमार (बर्मा) आणि आग्नेय आशियातील अनेक देशांत जाऊन त्यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेतला.

**महासम्राट** – या नावाने श्री. पाटील यांनी छत्रपती शिवराय यांच्या जीवनावर कादंबरी मालिका घोषित केलेली आहे. त्यापैकी झंझावात आणि रणखैंदळ हे दोन भाग प्रकाशित झालेले आहेत. या दोन्ही भागांचे इंग्रजी, हिंदी आणि कन्नड मध्ये भाषांतरे झालेली आहेत.

**नाटक – पानिपतचे रणांगण**

पानिपत कादंबरीवर आधारलेली श्री. पाटील यांची ही नाट्यकृती रंगमंचावर

२००० मध्ये आली. तिचे देशात व विदेशात ७०० प्रयोग झालेले आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शक वामन केंद्रे यांनी या नाट्यकृतीचे दिग्दर्शन केले होते.

आपल्या साहित्यिक कार्याबरोबरच श्री. पाटील यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत (IAS) अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी केवळ १४ महिन्यांत शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम पूर्ण केले.

**पुरस्कार**

१९८९ – नाथ माधव पुरस्कार (पानिपत)

१९९० – प्रियांदर्शनी राष्ट्रीय पुरस्कार (पानिपत), भारतीय भाषा परिषद पुरस्कार (पानिपत), महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार (पानिपत), विखे पाटील पुरस्कार (झाडाझडती)

१९९२ – साहित्य अकादमी पुरस्कार (झाडाझडती), रोहमारे साहित्य पुरस्कार

१९९३ – राज्य शासन सर्वोत्तम कादंबरी पुरस्कार (पांगीरा)

१९९९ – राज्य शासन सर्वोत्तम कादंबरी पुरस्कार (महानायक)

२००० – जयवंत दळवी पुरस्कार (नाटक लेखन – रणांगण)

२००० – सर्वोत्कृष्ट नाटक शासन पुरस्कार पानिपतची रणांगण

२००५ – महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार (चंद्रमुखी)

२००९ – राज्य शासन चित्रपट समीक्षण पुरस्कार (नॉट गॉन विथ द विंड)

२०११ – लाभसेटवार पुरस्कार (अमेरिका) – एक लाख रुपये, सर्वोत्तम मराठी लेखक म्हणून

२०१६ – लोकमंगल सर्वोत्तम कादंबरी पुरस्कार (लस्ट फॉर मुंबई)

२०१६ – महाराष्ट्र टाइम्स तर्फे गेल्या दोन दशकातील सर्वोत्कृष्ट व वाचनीय कादंबरी म्हणून महानायकची निवड

२०१७ – सर्वोत्कृष्ट मराठी लोकप्रिय लेखक, वाचकांच्या पसंतीचा सर्वाधिक लोकप्रिय मराठी लेखक पुरस्कार (दिव्य मराठी)

# शब्दसृष्टीचे ईश्वर साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख

डॉ. प्रिया निघोजकर

*''वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकारू सूर्य जैसा ।*
*येणे एके गुणे आकाशा । अंबरत्व ।।''*

(अमृतानुभव ३.३)

समग्र व्यक्त सृष्टी ही अव्यक्तापासूनच व्यक्त दशेला आलेली आहे. म्हणून अव्यक्त हे सर्वांचे वडील. अव्यक्ताच्या वंशात जन्माला येऊन सूर्य जसा व्यक्ताला प्रकाशित करतो, तद्वत सर्वत्र पसरलेले, पण न दिसणारे व न भासणारे असे जे आकाश-त्याला आकाशत्व, अंबरत्व प्राप्त करून देणारा शब्द हा एकच एक गुण आहे. शब्दनिर्माणाचं महत्त्व अधोरेखित करणारी अमृतानुभवातली ही ओवी प्रकटीकरणाला उजळवणारी आहे. शब्दाचा अनुवंश अव्यक्ताचा आहे. पण तो आकाशाचा गुण असल्यामुळे आकाश आपल्या जाणिवेत येतं. आकाश पंचमहाभूतांपैकी एक महाभूत. इतर चार महाभूते म्हणजे पृथ्वी, आप, तेज व वायू यांची जाणीव आपल्याला इंद्रियांद्वारे होते. त्यांचे अस्तित्व आपल्या इंद्रियांस कळते. आकाशाचे तसे नाही. ते कळण्यासाठी, जाणिवेत येण्यासाठी 'शब्दा'चा आधार घ्यावा लागतो. शब्दांचा हा आधार न घेता, वाङ्मयनिर्मिती होऊ शकणार नाही. वाङ्मयात अरूपाला जे रूप प्राप्त होते, ते केवळ सार्थ शब्दामुळेच!

विचार व भाव ह्यांच्या अभिव्यक्तीसाठी शब्दांचं महत्त्व खूप आहे. शब्दकळा, शब्दसंग्रह, शब्दनिर्माणाची शक्ती या साऱ्या घटकांना वाङ्मयीन व्यवहारात महत्त्व आहे. एखादा जाणता लेखक नवीन शब्दांची निर्मिती अकारण करीत नाही. स्वतःला अपेक्षित असलेली अर्थच्छटा आढळेपर्यंत तो चिंतनमग्न असतो. उचित अर्थच्छटेचा शब्द सुचला की, तो नवा प्रदेश दिसल्यासारखा हरखून जातो. कधी



एखादा सामासिक शब्द, कधी एखादं विशेषण, तर कधी क्रियापदाचंच रूप बदलून निर्माण झालेला शब्द जाणत्या लेखकाच्या संहितेमध्ये अवतरतो. वाचकाला अशा शब्दांसाठी नवा पर्यायी शब्द देता येत नाही. माउली म्हणतात तसं आकाश आपल्या संवेदनेच्या कवेत यावं आणि अनुभवामागचा हृदयाचा अवकाश प्रतीत व्हावा! हाच हेतू प्रतिभावंत, जाणीवसंपन्न लेखकाचा असतो. प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख हे असेच प्रतिभावंत साहित्यिक होत. कथा, कविता, नाटक, कादंबरी, अनुवादीत लेखन, समीक्षा अशा ललित व ललितेतर साहित्यप्रकारांत त्यांनी विपुल लेखन केले आहे. मराठी वाचकांना साहित्यसृष्टीतील साक्षेपी समीक्षक, कादंबरीकार म्हणून 'त्र्यं. वि सरदेशमुख' परिचित आहेत. 'कादंबरीत्रय' म्हणूनही त्यांची ओळख आहे. विशेषतः ललितलेखनातील त्यांच्या भाषाविशेषाने आणि भावसौंदर्याने त्यांनी आपले वेगळेपण जपले आहे. त्यांचे हे वेगळेपण वाचकांना आणि लिहित्या हातांना दिशादर्शक आहे. म्हणूनच प्रस्तुत लेखातून त्यांच्या कादंबरीलेखनाच्या संदर्भाने भाषाविशेषाचा परामर्श घेतला आहे.

**कादंबरी लेखनातील सरदेशमुख यांची भाषाशैली**

त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी 'ससेमिरा' (१९४४), 'बखर : एका राजाची' (१९७२), 'उच्छाद' (१९७८), 'डांगोरा : एका नगरीचा' (१९९८) ह्या चार महत्त्वपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या आहेत. हरमान हेसच्या 'सिद्धार्थ' या कादंबरीचा 'नदीपार' (१९५९) हा मराठी अनुवाद त्यांनी केला. पुढे अनेक वर्षांनी त्याचे परिष्करण करून हीच अनुवादित कादंबरी त्यांनी 'सिद्धार्थ आणि पूर्वेची यात्रा' (२००३) ह्या शीर्षकाने प्रकाशित केली. सरदेशमुखांचे कादंबरीलेखन संख्येने कमी असले तरी गुणात्मकदृष्ट्या ते लक्षणीय आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे

सरदेशमुखांची ‘शब्दकळा’ हे होय.

वाचकांसोबत शब्द संवादी कधी होतात, तर जेव्हा लेखकाने वापरलेला शब्द आपल्या परिचयाचा असतो, त्यातील गर्भितार्थ आपल्याला उमजतो. ‘प्रत्ययकारिता’ नसेल तर भाषा निर्जीवच ठरते, सरदेशमुखांनी कादंबरीच्या आशयाची मांडणी करताना शब्दांचे अलंकरण अथवा प्रभाव महत्त्वाचा मानला नाही; तर भावप्रत्ययाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. ते शब्दयोजनेबद्दल सजग होते. उपजत जाणतेपणाला त्यांनी भाषाशास्त्राच्या स्वतंत्र अभ्यासाची जोड दिली. संत ज्ञानेश्वर, जे. कृष्णमूर्ती, योगी अरविंद, बा.सी. मर्ढेकर, बालकवी अशा तत्त्वज्ञ, भावज्ञ, रसज्ञ, कविहृदयाच्या व्यक्तींच्या भाषेचे त्यांनी चिंतन केले. त्याचे रसग्रहण केले आणि स्वतःची अशी एक नवीच परिभाषा निर्मिली.

परंपरेविषयी नम्र भाव ठेवत, प्राचीन-आधुनिकतेचा सुमेळ साधत सरदेशमुखांनी आपली भाषा फुलवली. कधी उपसर्ग वगळून, कधी प्रत्यय बाजूला सारून, कधी नवाच सामासिक शब्द तयार करून तर कधी एखाद्या महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमेवरील बोली भाषेतील शब्दाला अपेक्षित अर्थरूप देऊन सरदेशमुखांनी नव्या शब्दांची निर्मिती केली. अशा शब्दांनी अभिव्यक्तीला एक हृद्गताचं सौंदर्य प्राप्त होतं. अभिरुचीला एक उंची प्राप्त होते. आपल्या मायबोलीचे देशीपण अबाधित ठेवून सहजपणे सामावून घेतलेले तत्सम आणि तद्भव शब्द भावरूपाला देखणं करतात. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरदेशमुखांनी ह्या देखणेपणाला संवेद्य केल्याने, त्याला प्रत्ययकारितेचे लेणे बहाल केल्याने ते शब्द वाचकांना हृदयापर्यंतचा भावप्रवास घडवतात. या भाव-मोहनातच वाचक बराच काळ स्वतःला झोकून देतात, नित्याचा आनंद अनुभवतात. ही किमया केवळ शब्दांच्याच बाबतीत घडते असे नव्हे; तर कादंबऱ्यांमधील अनेक अवतरणेही हा प्रत्यय देतात. काही उदाहरणे येथे पाहता येतील. ‘बखर एका राजाची’ या कादंबरीत ‘ओठंगत’, ‘उताणखाट’, ‘खळेलूट’, ‘साखसूरत’, ‘हांडगेपणा’, ‘पैखाना’, ‘विधोशी’ असे काही शब्द आशयाच्या संदर्भाने येतात.

‘बखर एका राजाची’ ही कादंबरी म्हणजे राजा रघुवीरसिंहाची दुर्दैवी जीवनकहाणी आहे. राजाच्या आत्माविष्करणाला गहिऱ्या आत्मनिष्ठेचे रंग चढविण्यासाठी सरदेशमुखांनी रोजनिशीद्वारे आत्मनिवेदनाची भाषा योजिली आहे. ती विलक्षण प्रत्ययकारी आहे. उदा. ‘बखरी’च्या राजाचे व्यथित जीवन दुर्दैवाच्या दशावताराचे ‘लीलानाटक’ कसे होते, हे त्याच्याच तोंडून वदवताना सरदेशमुख लिहितात, “*जाणूनबुजून दिल्या धडका बुरुजाला, आणि छिनून घेतला टवका-टवका. रात्र-रात्र वितळून गेली हंड्या झुंबरांच्या साक्षीनं. रांजणाच्या तळाशी*

*साचत राहिला प्राक्तनाचा गाळ, आणि भविष्याच्या दिशा देखादेखी भेगाळून गेल्या.''* राजाच्या मनाची स्पंदने टिपताना सरदेशमुखांची भाषा अधिक धारदार होते. ती अशी, झोपेला चिरफाडून सदाच एक खवीस समंध दिसायचा कोन्याकोपऱ्यात झुंबरातल्या मेणबत्त्या जायच्या स्फुंदत-स्फुंदत वाऱ्याच्या झुळुकांवरून... आणि तावदानांच्या सळ्या दिसायच्या वेड्यावाकड्या होऊन हालत असलेल्या... गच्चीवर वाजायची सडक पाऊलवाट कुणाची. त्याबरोबरच रघुवीराचा उत्कट भाव व्यक्तवताना ही भाषादेखील कशी तरल होते पहा- दमयंती व राजस यांच्या भेटीची तुलना करताना राजा म्हणतो, ''एक रात्र... आणि दुसरी रात्र. एका पाठोपाठ एक दुसरीला वेडावणारी. एक भोग, आणि दुसराही एक भोग,'' या वर्णनांतून सरदेशमुखांनी मानवी जीवनाच्या सनातन भावनेलाच हात घातला आहे, 'भोग' शब्दाची हेतुपुरस्सर केलेली पुनरुक्ती व त्यातील अर्थवाही भाव सुज्ञ वाचकाला स्तिमित केल्याशिवाय राहत नाही.

'बखर एका राजाची' या कादंबरीत सरदेशमुखांच्या अशा उत्कट, तरल नि संयत भाषेचे दर्शन घडते, 'डांगोरा एका नगरीचा' कादंबरीतही अशी अनेक उदाहरणे पानोपानी प्रत्ययाला येतात. कादंबरीच्या प्रारंभीच व्हिक्टर ह्युगोच्या एका अवतरणाचा अनुवाद सरदेशमुखांनी उद्धृत केला आहे. तो असा- ''अथांग... छोट्या गोष्टींनी, अथांग मोठेपण तुम्हाला चिरडते, समुद्र नाही का थेंबाथेंबांनी आपल्याला बुडवतो।'' येथूनच वाचक कादंबरीच्या आशयाच्याबाबतीत सावध होतो नि त्या अवधानानेच वाचनाला प्रारंभ करतो.

सरदेशमुखांनी कादंबरीत बऱ्याच ठिकाणी नेहमीच्या वापरातील शब्द थोडे वळवून घेतले आहेत. उदाहरणार्थ, अट्टाग्रह ऐवजी 'हटाग्रह', खिसगणती ऐवजी 'किसगणती', चारित्र्यवान ऐवजी 'सुचरित', उदासपणा ऐवजी 'उदासखाना', नेहमी ऐवजी 'हरहमेश', 'पसाभर' किंवा मूठभर ऐवजी 'पसामूठ', सोपा ऐवजी 'सवघड', चिवटपण ऐवजी 'जिवटपण', 'घरकोंबडी ऐवजी 'घरबशी', चिंब भिजून ऐवजी 'चिमून'... अशी अनेक उदाहरणे देता येतील. हेच भाषेचे सौंदर्य कादंबरीतील अनेक अवतरणांमधूनही अनुभवायला मिळते. उदाहरणार्थ, ''मनाची व्यथा उखडून टाकता आली नाही की खोल खोल खणतच जाते. पिंपळाचे बी गच्चीच्या कुंभीत एकदा का रुजून बसलं, की चिरेबंदीही उलून काढतं,'' ''काळाचा पडदा कोणत्याही क्षणी उभा-आडवा फाटून जातो. अज्ञेयाचा जबडा उघडतो आणि माणूस इतिहासजमा होऊ शकतो.'' ही अवतरणे वाचकांना थबकवतात. अंतर्मुख करतात. हे सरदेशमुख यांच्या भावगर्भ भाषेचे यश आहे. कादंबरीत्रयीतील त्यांची तिसरी कादंबरी म्हणजे 'उच्छाद'. त्यांची ही कादंबरी सर्वार्थाने काव्यात्मक आहे. ही काव्यात्मकता

विविधांगी आणि बहुस्तरीय आहे. कादंबरीच्या यशस्वीतेत सरदेशमुखांची अर्थगर्भ व भावगर्भ शब्दयोजना महत्त्वाची ठरली आहे. उदाहरणादाखल काही शब्द सांगता येतील. 'दफनदरी', 'बाजवत', 'लेंढार', 'नागवानीस्स', 'वेडभंग', 'धरमधक्का', 'नित्राण', 'फन्ना', 'हुच्चपणा', 'हुमांडीन', 'खवडेलपणा', 'जळभार' इत्यादी. सरदेशमुखपूर्व ललितलेखनात क्वचितच असे शब्द वाचकांना परिचित झाले असतील. एखाद्या सिद्धहस्त चित्रकाराच्या सामर्थ्याने शब्दकुंचल्याच्या मोजक्या फटकाऱ्यांनी आणि फिनिशिंग टचेस्नी सरदेशमुख आपल्यापुढे या शब्दांच्या चपखल वापराने अनेक व्यक्तिरेखा सादर करतात. "आपले पाय चिखलाचे, हात मेणाचे, काळीज मात्र ज्योतीचं." हे या कादंबरीचा नायक श्रीधर याचे आत्मनिवेदन असो अथवा 'अलीकडे खंदक, पलीकडे भुयार, कुठं भोवरा, कुठे निखारा, एक भयाण - डांबरट आकाश. त्याची एक नजरबंदी.' अशा गतिमान पंक्ती असोत; अथवा 'शरीर जुळतात तरी मनं कुठे उडून जातात आणि मनं मिळतात तरी शरीराची घरटी उजाड का राहतात? माणसाचे संबंध इतके भंगुर आणि आयुष्य इतकं ठकबाज असू शकतं?' असे मानवी प्रज्ञेचा प्रवाह कुंठीत करणारे प्रश्न असोत... सरदेशमुखांची शब्दकळा, त्यातला काव्यात्म भाव आणि गहन वेदनेचा हुंकार वाचकांच्या हृदयात उमटतो. आणखी एक उदाहरण देता येईल. एक साधेच वाक्य, पण केवढे मोठे तत्त्वज्ञान सांगून जाते. ते असे- 'माणसाचा चेहरा म्हणजे सगळा माणूस नव्हे.' अल्पाक्षरत्व हा काही सरदेशमुखांच्या लेखणीचा गुण नव्हे; परंतु कादंबरीतील अशी छोटी-छोटी वाक्ये, अवतरणे वाचकांना मानवी जीवनाचं व्यापकपण दाखवतात. संवेदनांच्या मुळाशी घेऊन जातात. आणखी हे एक वाक्य पहा- 'संवेदना जितकी व्यापक, तितकी ती दुःखाच्या आक्रमणाखाली चिरडली जाण्याची शक्यता. जितकी तरल, तितकी क्रोध-द्वेषाने मत्सराने फाटली जाण्याची शक्यता. कलानिर्माणात गुंतलेल्या मनाचे व्यापार या फाटलेपणावर हळुवार लेप देऊ शकतात.' कोणीही संवेदनशील वाचक या वाक्याजवळ थबकला नाही तरच नवल! कादंबरीच्या कथानकाला प्रवाही ठेवण्यात ही अवतरणे जशी साहाय्यभूत होतात, तशीच स्वतंत्ररीत्या तत्त्व-विवेचनही करतात.

सरदेशमुखांच्या भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शृंगारक्रीडेतील तरल भाव भडक न करता, त्यांनी संयतपणाने व्यक्त केला आहे आणि त्यामुळे त्या भावनेची तीव्रता कुठेही कमी न होता, ती अधिकच उत्कट, हळुवार झाली आहे. एक उदाहरण देता येईल. एके ठिकाणी सरदेशमुख म्हणतात, "स्पर्शाला एक शैली असते. तिच्यानं किती आकारांचं रूप दिसतं आणि ते आपल्यात चेतनेचा झंकार कसा छेडतं, ते मी अनुभवलं." 'बखर...' कादंबरीत अशी अनेक अवतरणे

आहेत. ''पुरुषातलं आणि स्त्रीतलं चैतन्य तेवढं त्या रात्रीच्या सर्व प्रहरांना अखंड व्यापून राहिलं होतं. त्या चैतन्याला सुख मिळवण्यापेक्षा सुखी करण्याची तहान होती. तहान शमवणारं आणि भडकवणारं चंद्रामृत ओठाच्या प्याल्यातून ओतलं जात होतं. शोषलं जात होतं.'' सरदेशमुखांच्या भाषेचा रसास्वाद हा वाचकांनी त्यांच्या कादंबरी वाचनातूनच घ्यायला हवा आणि भावसमृद्ध व्हायला हवे. त्यांच्या कादंबरी लेखनासंदर्भात अभिप्राय देणारी अनेक पत्रे त्यांना आली. 'बखर...' या कादंबरी संदर्भात गो.नि. दांडेकर असं म्हणतात, ''बखर प्रथम वाचली. शहारलो. गेल्या पाच-सात वर्षांत ह्या जातीचे वाचले नव्हते. ती सांभाळून परत कपाटात ठेवली... ज्या पुस्तकांचे पुनर्वाचन करायचे असते, त्यांच्यामध्ये. काल-परवा बाहेर काढून पुन्हा वाचली आणि मग त्याच जागी ठेवली, परत एकदा वाचण्यासाठी. सरदेशमुख तुम्हाला मुजरा. हे सर्व कुठून मिळवलेत? ही शैली, हे शब्दभांडार, त्या लेखनात हरवून जाणं, हा तपशील! तुमचं विलक्षण आहे. स्वतः जगलात. परकाया प्रवेशाचे अतर्क्य करून दाखवलेत.'' असे अनेक बोलके अभिप्राय सरदेशमुखांना त्यांच्या कादंबरी लेखनासंदर्भात आले आहेत. मराठीतील सुप्रसिद्ध लेखक व नाटककार महेश एलकुंचवार यांनी देखील सरदेशमुखांच्या शब्दयोजनेबद्दल एक महत्त्वपूर्ण अभिप्राय नोंदवला आहे. ते म्हणतात, ''सरदेशमुख कोणताही शब्द चूष म्हणून वापरत नाहीत. त्यांनी योजलेल्या शब्दाला आपण प्रतिशब्द देऊ शकत नाही.'' ही सरदेशमुखांची प्रतिभा. शक्ती.

**समारोप**

सरदेशमुखांच्या शब्दयोजनेतून, भाषाशैलीतून त्यांचे भावसौंदर्य वाचकांसमोर उलगडत जाते. त्यांचे सर्जनशील मन आकळते. शब्दांना मागचे व पुढचे वाक्यातील संदर्भ उकलून घेतानाचे सर्जनशील वाचकाचे थांबे नव्या चिंतनाची भूमी होऊ शकतात. त्यांच्या भाषेचे वैभव केवळ शब्दयोजनेचे नाही; तर त्याही पलीकडच्या सहज-संवादाचे आहे. कधीकधी शब्दयोजना अर्थजड वाटते; पण वाचकांच्या मनात अर्थकाहूर माजवणारी ती नाही. ती प्रचलित अर्थानं सुबोध नाही, पण हृदय मोकळं करण्याचा हेतू दडवून जाणीवपूर्वक दुर्बोधही होणारी नाही. सरदेशमुखांच्या भाषेचा हा विशेष वाचकांच्या जीवनदृष्टीला समृद्ध करणारा आहे. स्वसंवेद्य करणारा आहे.

**– डॉ. प्रिया निघोजकर**

भ्रमणध्वनी : ९८९०६४२१६१

# हाय! ही माय रडते आहे!

## डॉ. संध्या पवार

हिरवळ! मनाला हवीहवीशी वाटणारी हिरवळ. हिरव्यागार हिरवाईत स्वतःला हरवून अंगोपांगी बहरत हसणाऱ्या धरतीचं ते पावसाळी हिरवंगार रूप पाहिलं की, आपलं मनही कसं हवेहून हलकं हलकं होत जातं. मधून मधून खळखळत जाणारे पाऊस प्रवाहाचे सुरेख सूर आणि सोबतीला वृक्षराजींच्या हिरव्यागर्द पानांआडून कानावर येणारा पक्ष्यांचा किलबिलाट; साऱ्या आसमंतात एक सुरेल संगीत हळुवार पसरत जातं. गवतफुलांची गुलबक्षी नक्षी असलेला धरतीचा हिरवा शालू वाऱ्याच्या झुळकेसरशी झुळझुळत राहतो. निसर्गाचं असं हे नयनमनोहर पावसाळी रूप आज वारंवार नजरेसमोर येते आहे आणि भर पावसाळ्यात दडी मारून बसणारा पाऊस माझ्या डोळ्यांमध्ये मात्र सारखा दाटून येतोय. पापण्यांआड दडलेलं अश्रूंचं आभाळ गालांवर ओघळू पाहतंय. निसर्गाशी असणारं नातं कधीच जुनं होत नाही, म्हणूनच निसर्गाचं रूक्ष, कळाहीन हे पावसाळी रूप मनाला सहन होत नाही.

जून-जुलैमध्ये शाळा सुरू झाली की, घरापासून शाळेपर्यंत जाताना दोन-तीन गावं पार करीत शाळेपर्यंत पोहचावे लागायचे. आताच्यासारखी वाहतुकीच्या साधनांची रेलचेल नसली तरी शाळेच्या वेळात पोहचविणारी लाल बस तर होतीच; पण बसमध्ये बसून आपल्या नजरेची साथ सोडून पळत राहणारी झाडं पाहण्यापेक्षा हिरव्यागार हिरवाईने नटलेल्या धरतीशी नवतीच्या गप्पांचं हितगूज करीत पायी पायी चालण्यासाठी मन तत्पर असायचं. रस्त्याने चालताना कधीकधी तो अवखळ पाऊस साऱ्या शक्तीनिशी बरसायचा. आम्ही मैत्रिणी एखाद्या झाडाखाली आसरा घ्यायचो; पण त्या सरसर सरींमध्ये चिंब चिंब होणारी धरती पाहिली की त्या सरसरणाऱ्या सरींपासून दूर पळण्यापेक्षा सरींमध्ये समरस होण्यास मन आतुर व्हायचं. या अशा साऱ्या पावसाळ्यांमध्ये निसर्गाशी असलेले नात्यांचे पाश पाऊसधारांच्या साक्षीने अधिक घट्ट व्हायचे.

हिवाळ्यातला हळवा निसर्गही हृदयाशी कायमची बांधिलकी जपणारा. हिवाळी

थंडीत कोवळं ऊन अंगावर घेत पायी चालण्यातला आनंद तर काही औरच असायचा. शेतांमध्ये गव्हाची इवली इवली पाती वाऱ्याशी गप्पा करीत डुलताना दिसायची आणि हरबऱ्याचा आंबट-गोड सुगंध आसमंत भारून टाकायचा. 'आणि हो, ते बोरबन!' तांबूस, पोपटी बोरांनी लदबदलेली बोरांची झाडं दिसली की, आपण मोठं झालोय, शिक्षिका झालोय, हे विसरून मन बोरं वेचायला धावायचं. हिवाळ्यातलं कोवळं ऊन अंगावर खेळवत रस्ता पार करताना शाळेचं गाव कधी आलं हे कळायचंही नाही, पण गाव जवळ आल्याची चाहूल लागताच पायांना नकळत वेग यायचा. त्या लहानशा गावाचं ते डौलदार रूप दुरूनच नजरेत भरायचं. ती टुमदार कौलारू घरं, ती सडा-रांगोळ्यांनी सजलेली अंगणं, अंगणातील गुरंढोरं सारं आपलंसं वाटायचं. गावातील वडीलधाऱ्या मंडळीचा हवासा वचक, बरोबरीच्या मंडळींची हवीहवीशी साथ! जीवनाला एक आश्वासक, आदर्श वळण देण्याचं सामर्थ्य या अशा साऱ्या गावागावांमध्ये गवसायचं.

आज पुन्हा पंधरा-वीस वर्षांनी पाय त्याच रस्त्याने चालत आहेत, कारण निसर्गासह असलेली मैत्रीची घट्ट वीण चारचाकी वाहन झुगारून पायी चालण्यास बाध्य करते आहे. निसर्गभेटीची आतुरता जुने दिवस आठवून निसर्गाला साद घालीत आहे. 'दिवस बदलायला वेळ लागत नाही' असं म्हणतात. सहसा स्वतः न बदलणाऱ्या निसर्गाने कालानुरूप झालेले बदल कसेही का होईना, पचविण्याचा प्राणांतिक प्रयत्न केला आहे, म्हणूनच कदाचित निसर्गाला ऋतुचक्राचं आगमनही समजत नाही. उन्हाळ्यात पाऊस बरसतो, हिवाळ्यात उन्हाचा तडाखा जाणवतो.

पावसाळ्यातील पाऊसधारा या वर्षीही पाहिजे तशा बरसल्याच नाहीत, तप्त धरा शांत झाली नाही. पाऊसधारांमध्ये न्हाऊन टवटवीत दिसणारी धरती आज मलूल दिसते आहे. हिवाळ्यात गव्हाच्या पात्यांनी डुलणारी शेतं तर दूरवर कुठेच दिसत नाहीत. गव्हाचं पीक सोडा, शेताचंही अस्तित्व नाही. अखंड शेतजमिनीचे अनेक निर्जीव तुकड्यांमध्ये रूपांतर झाले आहे. हे केवळ तुकडे नाहीत! तर लाखो रुपयांच्या रूपात पहुडलेले लखपती लोकांचे भूखंड आहेत. लँड डेव्हलपर्सच्या ठेकेदारांचे मोठमोठे बोर्ड्स मोठ्या दिमाखामध्ये या शेततुकड्यांवर आपले पाय घट्ट रोवून उभे आहेत. बोरीचं बन तर कुठेच दिसत नाही. हं... दूरवर गाव नजरेच्या टप्प्यात यायला लागले आहे. गावानेही तर आपली ओळख गमावल्यासारखी दिसतेय. हिरव्यागार वनराईचं लेणं लाभलेलं गाव आता उजाड-ओसाड दिसते आहे. पूर्वी या वेळी गावातला पिंपळाचा पार कसा गजबजलेला असायचा. आज त्याची कुठलीच चाहूल कानी येत नाही. गावातील कौलारू घरांनी आता सिमेंट-काँक्रिटची छतं डोक्यावर घेतलीत. अंगणात सायंकाळी गळ्यातील टिणमिण्या

वाजवत गायी-म्हशी उभ्या असायच्या. आता तिथे दोन-दोन दुचाकी उभ्या आहेत. बालगोपालांचा गलबलाट तर कुठेच ऐकायला येत नाही. शहरी संस्कृतीतील बंद दारांची प्रथा इकडेही आलेली दिसते. घरातील लहान-थोर मंडळी टी.व्ही.समोर नाहीतर आपापले मोबाइल घेऊन बसली असेल. मोबाइलमुळे संवादच संपल्यासारखा झालाय. शहरी सुविधा गावागावांत पोहचल्या आणि गावांचा गावरानी गोडवा हरवल्यासारखा झाला.

शहरं विस्तारत गेली आणि शहरालगतच्या गावांतील शेती डेव्हलर्पस आणि बिल्डर्सच्या हाती गेली. ज्या शेतीतून फक्त काही हजारांचंच उत्पन्न हाती यायचं, त्याच शेतीच्या तुकड्यांना लाखोंचा भाव आला. आजच्या काळात शेती करणं एक मोठं आव्हान आहे. कधीकधी वर्षभर खस्ता खाऊनही हाती काही लागत नाही. शेतात डोलणारं पीक पाहून सुखाची स्वप्नं पाहत झोपी जावं, तो एका रात्रीतून धाड्‌धाड् कोसळणारा पाऊस हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून नेतो. एकतर शेतात पिकत नाही आणि पिकलं तर टिकत नाही. कर्ज काढून शेती करावी तर कर्जफेडीची शाश्वती नाही. दुबार पेरणीचं, ओल्या-सुक्या दुष्काळाचं, नापिकीचं, कर्जाचं सारखं रडणं रडत बसण्यापेक्षा शेतकरी आपली शेती विकून मोकळे होत आहेत. वर्षोनगणती ज्या काळ्या मातीच्या शेतीच्या भरवशावर अनेक पिढ्या पोसल्या गेल्या, तीच जमीन विकून संसार चालवले जात आहे.

जमिनीची कूस उजाडून, तिला वांझोट करून तिचे तुकडे करणारे लाखोच काय, करोडोंनी कमवत आहे. जमिनी विकणारे शेतकरी काही वर्षांतच हवालदिल होत आहेत. व्यसनांच्या अधीन होत आहेत, कारण पैसा कधीच पुरत नाही. या शेतजमिनी विकत घेणारे तिथे शेती कधीच करीत नाहीत. अनेक पिढ्या पोसणारी ती काळी आई स्वतःचं भयाण, विराण वाळवंटी रूप पाहून रडत राहते. तिच्या रुदनातील आर्तता आपल्या हृदयापर्यंत झिरपत जाते. हिरवा शालू ल्यालेली, नववधूसम सजलेली धरणी केव्हा दृष्टीस पडेल, या विचारात पुढे पुढे चालताना, ते उजाड रूप पाहताना मनात येत होतं-

*जिने जगविल्या पिढ्या हजारो*
*तिचीच कूस उजडते आहे*
*हाय, ही माय रडते आहे*

**- डॉ. संध्या पवार**

भ्रमणध्वनी : ९८५०३६४६९२

# नातीगोती

## बा. बा. कोटांबे

संग्राम नुकताच विदर्भात बदलून आला होता. ऑफिसमध्ये ज्या थोड्याफार ओळखी झाल्या होत्या, तेवढ्याच. बाकी गावात कुणालाही ओळखत नव्हता. तालुक्याचे गाव धड शहरही नाही, न धड खेडंही नाही. दुपारी दोनची वेळ, कार्यालयातील एकेक करून सगळे लंच घ्यायला जात होते. संग्रामनंही डब्बा आणला होता, भूक नसल्यामुळे तो काही आणखी जागेवरून उठला नव्हता. अंगही कणकण करत होते. सध्या तरी तो एकटाच घर भाड्याने घेऊन राहत होता. जालन्याचे घर स्वतःचे असल्यामुळे बायको आणि मुलगी जालन्यातच राहत होते. एक मुलगा पुण्यात इंजिनीअरिंगला होता, दुसरा मुंबईत अभिनय क्षेत्रात काहीतरी करत होता. दोघांनाही प्रत्येक महिन्याला बऱ्यापैकी रक्कम द्यावी लागत होती. जालन्याचं घर किरायाने देऊन बायको आणि मुलीलाही नोकरीच्या ठिकाणी आणण्याचा संग्रामचा विचार होता. परंतु ते काही जमले नाही, मुलगी दहावीला असल्यामुळे ती शाळा बदलायला तयार नव्हती. बायकोचीही तशीच इच्छा होती, त्यामुळे संग्राम नोकरीच्या गावी एकटाच राहत होता.

सगळे जेवायला उठल्यामुळे हा एकटाच बसून होता. सकाळी पण जेवण बरोबर झाले नव्हते, आताही जेवायची इच्छा होत नव्हती. असं उपाशी राहून कसं चालेल? आणखीच तब्येत बिघडायची हा विचार करून संग्राम खुर्चीतून उठला, डब्बा हातात घेऊन स्टाफ रूमकडे निघाला. अचानक कसंतरी झंकारल्यासारखं झाले, डोळ्याला अंधारी आली, तोल जाऊन पडतोय की काय, असे वाटून त्यानं भिंतीचा आधार घेतला. काही वेळ तसाच भिंतीला टेकून उभा राहिला. थोड्या वेळाने हळूहळू चालू लागला. पायांना गोळे आल्यासारखे वाटत होते, कमालीचा अशक्तपणा जाणवायला लागला. या प्रकारामुळे भूक कुठल्या कुठे उडून गेली. असं का होतंय, कळत नव्हतं. स्टाफ रूममध्ये टेबलवर डब्बा ठेवला, हात धुण्यासाठी बेसिनकडे गेला, तेवढ्यात शिपाई ओरडत आत आला.

''सगळे बाहेर चला, अँब्युलन्स आणि नगरपालिकेचे काही लोक आलेत. पांढऱ्या कपड्यात दवाखान्याचे काही लोकही आहेत.''

स्टाफ रूममध्ये बसलेल्या सर्वांचे चेहरे पाहण्यासारखे झाले. संग्रामनं उघडलेला डब्बा परत बंद केला, सगळे बाहेर आले.

''काल तुमच्या कोरोना टेस्ट केल्या होत्या आठवतंय ना, त्यात तिघे पॉझिटिव्ह आलेत.'' नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याने नावं वाचून दाखवली, त्यात संग्रामचेही नाव होते. आधीच थोडं बरं वाटत नव्हतं. नाव ऐकून तर संग्रामचे होते नव्हते तेवढे अवसानही गळून पडले. संपूर्ण अंगाला थरथरी सुटली. म्हणजे कोरोनामुळेच अस्वस्थ वाटत होतं तर.

''बाहेर अँब्युलन्स आहे. तिघंही आत जाऊन बसा, तुम्हाला कोरोना सेंटरमध्ये दाखल करावे लागेल. बाकी लोक पण ऑफिसच्या बाहेर निघा. ऑफिस सील होणार आहे. बाकीचे राहिलेले सुद्धा काही दिवस अलग रहा, दोन-तीन दिवसांनी परत एकदा टेस्ट करा. निघा सगळे बाहेर.''

तिघांना घेऊन अँब्युलन्स निघून गेली, नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी ऑफिस आतून-बाहेरून फवारणी करून निर्जंतुक केले व संपूर्ण इमारत सील केली.

ध्यानीमनी नसताना अचानक हे घडले होते.

कोरोनाची साथ चालू आहे हे सर्वांना माहीत होते. त्यामुळे ऑफिसमधील सर्व सहकारी काळजी घेत होते. संग्राम विशेष काळजी घेत होता, मराठवाड्यातून विदर्भात बदलून आलेला. काळजी घेऊनही व्हायचं तेच झाले. नगरपालिकेच्या कोरोना सेंटरवर संग्रामचा इलाज चालू झाला. दुपारी कसंतरी होत होतं ते यामुळेच होत होतं की काय, अशी शंका त्याला आली. डॉक्टरांनी आणखी काही तपासण्या केल्या. रात्री राउंडला आले तेव्हा म्हणाले.

''बाहेर कुणी नातेवाईक आले आहेत का तुमचे!''

''नाही साहेब मी इथे एकटाच आहे, काही दिवसांपूर्वीच माझी इकडे बदली झाली आहे. सध्या एकटाच राहतो.''

''हे बघा, तुम्हाला थोडी काळजी घ्यावी लागेल, दुखणं थोडं जास्त आहे. घरी फोन करा, आहार वगैरे चांगला घ्या. इथेही जेवण मिळते, तुम्हाला बाहेरूनही कुणी देत असेल तर घेऊ शकता.''

औषध वगैरे चालू झाले, कोरोना झाला आहे हे कळल्यामुळे की काय आणखीच गळून गेल्यासारखे वाटत होते. त्यात डॉक्टरांनी सांगितलंय दुखणं जास्त आहे म्हणून. पत्र्याच्या शेडमध्ये दवाखाना होता, एका लाइनमध्ये कॉट टाकलेले, रोज एक-दोन पेशेंट दगावत होते. आरोग्य कर्मचारी विशिष्ट कपड्यात यायचे,

मेलेल्या व्यक्तीला प्लास्टिक कपड्यात बांधून घेऊन जायचे. काही वेळातच दुसरा पेशेंट कॉटवर दाखल व्हायचा. संग्राम मनातून हादरला, आपलाही एक दिवस नंबर लागणार, हे त्यानं मनोमन ठरवून टाकले होते. जेवण तर जात नव्हतेच, रात्री बायकोला फोन लावला. प्रथम तर तोंडातून शब्दच फुटेना, कंठ दाटून आला, डोळे पाणावले.

''सुरेखा, मी काय सांगतोय ते नीट ऐक, धीरानं घे. काळजी करू नको, यातून मी नक्की नीट होईन.''

''असं का बोलायले तुम्ही, काय झालं नीट सांगा बरं.''

''तेच सांगतोय, मला कोरोना झालाय. ऑफिसमधल्या आणखी काही लोकांना झाला आहे. इथं सरकारी दवाखान्यात दाखल केले आहे. औषधपाणीही चालू आहे. डॉक्टरांनी सांगितले आहे घरचे जेवण मिळाले तर लवकर बरे व्हाल. मी म्हणतो, तुझ्या भावाला सोबत घेऊन इकडे येशील का चार दिवस? तुला सोडून तो परत जाईल. तू रूमवर थांबून स्वयंपाक करून पाठवून देत जा. मी इथल्या एका मुलाला सांगतो. तो दोन टाइम डब्बा आणून देईल.''

''आहो काहीतरीच काय, मला कसं जमंल याला. इकडं हिंडा-फिरायला बंदी आहे. तिकडं याला जवळय का. कोण पोरगंय म्हणता त्यालाच दोन टायमाचं जेवण द्याला सांगा. त्याला चार पैसे जास्त द्या म्हणजे समदं करील. आता आराम करा इकडची काळजी करू नका. करुना झालेल्या माणसाला फोनवर बोललं तरी करुना व्हतय म्हणत्यात, रात्र बरीच झालीय झोपा आता.''

''काहीतरी वेड्यासारखं बोलू नको. अगं माझी झोप उडालीय, असं करू नको, काहीही कर चार दिवस ये. अशा वेळेला नाही तर केव्हा येणारेस, नसता मी काही वाचत नाही बघ.''

''तुम्ही शिकल्या सवरलेले एवढंही कळना का, सगळी दुनिया बेजारंय या बिमारीनं. मित्रांबरोबर भटकत असताल गावभर, आधीच नीट काळजी घेतली असती तर जाऊद्या, आता जे झालं ते झालं. नशिबाला आलंय ते भोगावच लागन. औषधपाणी नीट घ्या.''

बायकोनं फोन बंद केला. संग्राम अस्वस्थ झाला, त्याला जेवणापेक्षा कुणाच्या तरी आधाराची गरज होती. आपण एकटे पडलोय बेवारससारखं, अशी त्याची भावना झाली होती. त्यानं परत बायकोला फोन लावला.

''काय, तुम्ही पण आराम करीनात, दुसऱ्यालाही करू देईनात. अशानं तुम्हीबी मराल अन् मलाबी माराल, आता झोपा गुमान.''

''सुरेखा ऐक ना, मुलीला दोन दिवस तुझ्या माहेरी सोड. काहीही कर दोन

दिवस तरी येऊन जा. हवं तर गाडी करून या मी ड्रायव्हरला ऑनलाइन पेमेंट करतो. लांबून एकमेकांना डोळेभरून बघू, बोलू. वाटलं तर लगेच परत जा. मला बरं वाटेल. नंतर व्हवू दे माझं काय व्हायचं ते.''

''तुम्हाला वेड लागलंय का, उलट तुम्ही मला येऊ नको म्हणून सांगायला पाहिजे. तुम्ही तर बायकोलाच मारायला निघालात. तिकडं आले न मलाही लागन झाली तर केवढ्याला पडंल. घरात तरणी पोरगीय तिला कुणाच्याही घरी सोडून येता येत असतंय! तुमच्या निष्काळजीपणानं ही बिमारी ओढून घेतलीय. मी घरा भाईर निघना झालेय, एक पोरगं पुण्याला, एक मुंबईला. त्यांची काळजी करू का तुमच्याकडे येऊन बसू. काही झालं तरी मी येणार नाही. उगीच परत परत फोन लावू नका, ठिवा आता फोन.''

नर्स आली. तिने दोन गोळ्या वरतून अलगद हातावर टाकल्या.

''या गोळ्या घ्या न आराम करा, उगीच जागरण करीत बसू नका. सारखं फोनवर बोलत बसल्यानं बाकी पेशेंटला त्रास होतो.''

रात्रभर संग्रामच्या डोळ्याला डोळा लागला नाही. पहाटे पहाटे थोडी डुलकी लागली. कसली तरी धावपळ सुरू झाली त्यामुळे संग्रामलाही जाग आली होती. परत स्ट्रेचर, ती माणसं. संग्रामपासून तिसऱ्या नंबरच्या कॉटवरचा पेशंट रात्रीच केव्हा तरी वारला होता. असे रोज एक-दोन माणसं दगावत होती. वार्डात असलेल्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर उदासी पसरलेली, सगळे भेदरलेले. आपला कधी नंबर लागतोय, असाच सगळ्यांच्या चेहऱ्यावर भाव दिसत होता. मृत व्यक्तीच्या कॉटवर मोबाइल आणि पैशाचं पाकीट होतं, डेड बॉडी उचलणाऱ्यापैकी एकाने दोन्ही खिशात घातले. सकाळी सकाळी प्यायला गरम पाणी आले, एखादं उकडलेलं अंडं. काही वेळाने चहा आणि दोन बिस्किटे दिली. खायला-प्यायला वेळेवर मिळत होतं. असं असलं तरी दुखण्याची धास्ती मनातून जात नव्हती. दुपारचं जेवण आलं, जेवण करून कॉटवर संग्राम भिंतीला टेकून बसला. सतत घरची आठवण येत होती. काल बायकोला म्हणाला, मुलीला फोन दे दोन गोष्टी बोलतो,तर म्हणाली.

''तुम्हाला कसं कळंना झालंय, इकडंबी तिच अवस्थाय. रोज एक-दोन तरी दगावतेत. ती पोरगी आधीच भेदरलीय, तुमालाबी करूना झालाय म्हणल्यावर किती धास्ती खाईल. शाने सुरते माणसंबी येड्यासारखं वागायलेत.'' काल बायकोशी झालेलं बोलणं संग्रामला आठवलं. पुण्याला शिकत असलेल्या अशोकची आठवण झाली. अशोक मोठा मुलगा. संग्रामनं फोन लावला,

''अशोक कसायस बाळा!''

''मी ठिकंय बाबा, तुम्ही कसे आहात? आता तब्येत बरीय का!''

''तुला कुणी सांगितले माझी तब्येत बरी नाही ते!''

''काल आईला फोन लावला होता तेव्हा कळलं, काळजी घ्या बाबा. इकडेही परिस्थिती फारशी चांगली नाही. औषध वेळेवर घेत जा, जेवण भरपूर करा, ठेवू आता फोन?''

''ऐक ना अशोक, चार-दोन दिवस तू येशील का इकडे? काही नाही, तुला पाहू वाटतेय रे, दुरून पाहीन. राहू वाटलं तर दोन दिवस रहा रुमवर. उभ्या उभी येऊन गेलास तरी चालेल. नशिबात काय वाढून ठेवलंय, माहीत नाही. बघ जमलं तर येऊन जा, बरं वाटेल मला. येशील ना बाळा.''

''कसं शक्य आहे बाबा, एकतर बस, रेल्वे बंद आहे, शिवाय गर्दीत येणे किंवा प्रवास करणे किती धोकादायक आहे. तुम्हीच काळजी घ्या.''

''असं करू नको रे, आपलं इकडं कुणीच नाही. चार दिवस जगायचे तर दोनच दिवसांत मरतोय बघ मी, लांबून बघतो मी तुला. इथं कोविड सेंटरला आलास की खिडकीतून बघन तुला.''

''बाबा असं लहान लेकरासारखं काय करताय, काल असाच तुम्ही आईलाही त्रास दिलात. तुमच्याबरोबर घरातल्या सगळ्यांनी मरावंसं वाटतंय का तुम्हाला. उलट तुम्ही आम्हाला संभाळून रहा असं सांगायला पाहिजे. बातम्या बघत नाहीत का, सगळ्या जगात कोरोनानं धुमाकूळ घातलाय. कुत्र्या-मांजरासारखे माणसं मरायलेत न तुम्ही आम्हाला मरणाच्या दाढेत ढकलताय. ठेवा आता फोन.''

मुलानं खट्कन मोबाइल बंद केला, संग्रामचे डोळे अश्रूंनी डबडबले, हॉल मधल्या पेशंटवर नजर टाकली. तसं निराशेचं जाळं डोक्यात जास्तच घोंगावू लागलं.

रात्रीचं जेवण झालं, औषधही घेतलं. डॉक्टर आतल्या आत उठून थोडं फिरत जा म्हणून सांगायचे, कालपर्यंत थोडं फिरता येत होतं, सकाळपासून खूपच गळून गेल्यासारखं वाटत होतं. दोन पावलं टाकले तरी दम लागत होता. खोकला वाढला होता,नाक गळत होते. डॉक्टर तोंडाचा मास्क अजिबात काढू देत नव्हते. मास्कनं आणखीच गुदमरल्यासारखं होत होतं. संग्राम आतल्या आत चकरा मारत होता, पण मनातून खूपच धास्तावला होता. आपण एकटे पडलोय, कुणीही नाही आपल्या मागे. एक दिवस इतर लोकांसारखं इथंच मरणार, पालिकेचे लोक गठोडं बांधून घेऊन जाणार, लाकडं असले तर जाळतील नसता मातीत गाडतील. मोबाइल, घडी, अंगठी मुलगा आला असता तर त्याच्याजवळ देऊन टाकली असती, आता हे लोक सगळं घेऊन टाकणार. जाऊदे मरू दे, आपणच नसणार तर या वस्तूला

काय चाटायचंय का! आपल्या माघारी या वस्तू घरी किंवा मुलांकडे असाव्यात असं मनापासून वाटायचं; पण तसं होणार नाही हे संग्रामला कळून चुकलं होतं. हे सगळं डोक्यात चालू असतानाच आणखी थोडी आशा पल्लवित झाली. अरे रवीला फोन लावायचा राहिलाच की, रवी नक्कीच येईल. सर्वात लहान आहे; पण समजदार आहे. संग्राम चकरा मारायचं थांबवून कॉटवर येऊन बसला आणि रवीला फोन लावला. रिंग जात होती, पण उचलला जात नव्हता. बाथरूमला वगैरे गेला असेल. दोन मिनिटे थांबून परत फोन लावला.

''रवी अरे किती वेळापासून फोन करतोय, कसायस बाळा!''

''मी ठिकंय बाबा, तुम्ही कसे आहात, तब्येत ठिकय न आता.''

''ठिकंय बाळा, तुलाही सांगितले वाटते, तुझं बरं चाललंय ना!''

''हो बरंच म्हणायचं, घराच्या बाहेर निघता येत नाही. क्लासेस वगैरे बंदच आहेत.''

''बरं ऐक ना, तू उभ्या उभी येऊन जाशील का! मला तुला पहावंसं वाटतंय रे, इथं आल्यावर सरकारी कोवीड सेंटर कुठंय म्हणून कुणालाही विचारलंस तरी सांगतात. तू आलास की बाहेरून फोन कर. मी तुला लांबूनच बोलन, खिडकीतून पाहीन. इकडं आपलं कुणीच नाही. मी बेवारस सारखा एकटाच दवाखान्यात पडलोय, नाही म्हणू नकोस, एकदा येऊन जा बाळा. मला तुम्हा सगळ्यांची खूप आठवण येतेय रे.''

''बाबा कसं शक्य आहे, बाहेर पडणं किती धोकादायक आहे. मरणाला कवटाळल्यासारखं आहे. सगळं ठीक होईल. तुम्ही काळजी करू नका, होईल तुमची तब्येत बरी. रात्र बरीच झालीय, जागरण करीत बसू नका. आणखी तब्येत बिघडायची. झोपा आता.''

''रवी ऐकून घे ना, तुम्हाला कुणाला तरी पाहिल्या शिवाय माझी तब्येत सुधारत नाही. मी तुला पैसे पाठवतो गाडी करून ये हवं तर.''

''बाबा वेडे झाले का तुम्ही. वडील आहात ना तुम्ही माझे? मुलाला असं मरणाच्या दाढेत ढकलेल का कोणता बाप? काल भाऊला, परवा आईला आणि आज मला, एक झालं की एक सारखे फोन लावत आहात. याचा आम्हा सगळ्यांना किती त्रास होतोय, याचा थोडातरी विचार करा. सगळे आपापली काळजी घेताहेत आणि तुम्हीही घ्या. ही बिमारी मया-दया, नातं-गोतं काही बघत नाही, जो जीता वही सिकंदर, अशी अवस्था झाली आहे. झोपा आता गुपचूप.'' मुलानं चित्रपटातला ऐकून ऐकून गुळगुळीत झालेला डायलॉग सुनावला.

शेवटची आशा असलेला फोनही बंद झाला. संग्रामचे डोळे भरून आले.

तोंडातून शब्द बाहेर पडायला उशीर, 'हो बाबा सांगा की, काय हवंय, काही बाजारातून आणायचे आहे का, बाबा या महिन्यात दोन हजार जास्त पाठवा, हो बाबा मलाही थोडे जास्तीचे हवे आहेत.' दोन्ही मुलांच्या डिमांड असायच्या. घरी जरा जास्तीचे पैसे ठेवत जा, महागाई कसली वाढलीय, तुम्हाला तर कसली फिकीरच न्हाई. बायकोची भुणभुण तर नेहमीचीच. बाबा मला पण हजारेक रुपये देऊन जा, या महिन्यात माझ्या मैत्रिणीचा वाढदिवसंय तिला काही गिफ्ट द्यावं लागेल. शिवाय मागच्या महिन्यात मला ड्रेस घेतो म्हणाला होतात, तो तर घेतलाच नाही. सुट्टीत गावी गेलं की सर्वांच्या अशा काही ना काही डिमांड असायच्या.

''अरे हा गेला बरं का.'' डॉक्टर वार्डबॉयला म्हणाले.

तसा संग्राम तंद्रीतून बाहेर आला. त्याच्या बाजूच्याच कॉटवरचा तीस-पस्तीस वयाचा तरुण वारला होता. आता तर त्याला रडूच कोसळले. नर्स त्याच्याजवळ आली.

''तुम्हाला काय झालं रडायला, औषध घेतलंय न झोपा आता.''

''अहो बाई माझ्या बाजूला माणूस मरून पडलाय न मला गुपचूप झोपा म्हणताय, कशी झोप येईल?''

''आहो रोजचंच मढं त्याला कोण रडं, घरचे लोक ढुंकून बघंना झालेत न तुम्ही रडत बसलाय. त्याच्यामुळे तुमचीही तब्येत बिघडून घेणार आहात का तुम्ही? दहा मिनिटात बॉडी हलवतील काळजी नका करू.''

असं रोज चालू होतं, वार्डातील प्रत्येकाला वाटायचं आपला नंबर कधी लागतोय की. काही पेशंट नशीबवान पण होते. तीन-चार लोकांना घरून जेवण येत होते. इथं असलेल्या डब्ब्यात अलगद वरून जेवण टाकायचे आणि आणलेला रिकामा डब्बा परत घेऊन जायचे. परत उद्या त्याच डब्ब्यात घेऊन यायचे. यात कुणाचा मुलगा असायचा, कुणाचा नातू असायचा तर कुणाचा भाऊ असायचा. वार्डातील संख्येच्या मानानं हे प्रमाण फारच कमी होते. संग्रामला त्या पेशंटचा हेवा वाटायचा. संग्रामचा अशक्तपणा वाढतच होता. आपण यातून बरे होणार नाही, हे त्यानं मनोमन ठरवून टाकले.

सकाळची वेळ, डॉक्टरचा नुकताच राउंड झाला होता. पोहे, एक अंडं आणि चहा देण्यात आला. संग्राम खिडकीतून बाहेर बघत होता, ऊन मी म्हणत होतं, सकाळीच दुपारच्या सारखे ऊन चमकत होते. काही अंतरावर असलेला गुलमोहर लालजर्द फुलांनी सजला होता. हवेच्या मंद झुळकेनं छान डोलत होता. एवढ्या कडक उन्हातही आपल्या देखण्या रूपानं पाहणाऱ्यांच्या मनाला गारवा देत होता. त्याच्याकडे पाहून संग्राम काही वेळ आपलं दुखनंही विसरला, पण काही

वेळच. काही तरी एकदम आठवल्यासारखं झालं, संग्रामनं लागलीच मोबाइलची बटनं दाबायला सुरुवात केली.

‘‘हॅलो कोण बोलतंय!’’

‘‘हॅलो नंदाबाई बोलताय का?’’

‘‘व्हय मिच बोलतीय, तुम्ही कोण!’’

‘‘दोन दिवसांपूर्वी तुम्ही ऑफिसला आला नव्हता का, तेव्हा तुम्ही मला फोन नंबर दिला होता. मी संग्राम बोलतोय.’’

‘‘हां हां आलं ध्यानात, अन् तुमच्या आवाजाला काय झालंय, चांगला टाळसर आवाजंय तुमचा. असं कुचमरल्यासारखं कामून बोलायले, आवाज एकदम गळा दाबल्यासारखाच येतोय.’’

‘‘ऐका नं नंदाबाई, माझी तब्येत बरी नाही, मी ॲडमिटंय.’’

‘‘अरे देवा, आली का तुमच्यवरबी पाळी, कोणत्या दवाखान्यात!’’

‘‘नगरपालिकेच्या बाजूला सरकारी कोवीड सेंटर नाही का, तिथं ॲडमिटंय. मला कोरोना झालाय.’’

‘‘हो आलं ध्यानात. त्यामुळंच एवढं कुचमरलेत की काय, नका काळजी करू ते आपल्या सर्दी-पडशासारखं दुखणंय. तिथं तर सगळी सोय हाय म्हणं. खाचं, प्याचं औषीध येळंवर घ्या. आठ दिवसात भाईर येता तुम्ही.’’

‘‘काही ठीक नाही हो, इकडे माझं कुणीही नाही, कुणी येऊही शकत नाही. मला थोडी मदत कराल का?’’

‘‘काय सायेब, मी त्या दिवशीच म्हणले न्हवं कायी अडीअडचण असंल तर सांगत जा म्हणून.’’

‘‘माझी खोली आहे इथं, आमचा शिपाई दाखवील तुम्हाला. सकाळ-संध्याकाळ जेवण बनवून इथपर्यंत पोचवत जा, पहिल्या दिवशी आणलेला डब्बा इथंच राहू द्या. दुसऱ्या दिवसापासून दुसरा डब्बा आणा. तो इथल्या डब्ब्यात वरतून टाकत जा. मी तुमच्या जवळही येणार नाही. डब्बा दारात ठेवत जाईन, तुम्ही त्यात टाकत जा.’’

‘‘बस एवढंच, आज संध्याकाळी तुम्हाला घरचं जेवण मिळंल. अन् घाबरू नका हो, बिनधास्त ऱ्हावा.’’

‘‘चावी माझ्याकडे आहे, पण-’’

‘‘मी येते घटकाभरानं घ्यायला.’’

संग्रामला दोन दिवसांपूर्वीचा प्रसंग आठवला, काही कामानिमित्त ही नंदाबाई ऑफिसमध्ये आली होती. तिचं काहीतरी काम होतं, ते झालं नव्हतं. ती कारकुनावर

चांगलीच चिडली होती. आठ दिवसांपासून चकरा मारतेय वगैरे चालू होतं. तसं प्रत्यक्ष तिचं काम नसायचं. ओळखी पाळखीच्या लोकांची कामं घेऊन यायची. संग्राम मध्ये पडला, थोडा वेळ तिला बसायला सांगितले आणि काम करून दिले. खरंच डॅसिंग बाई आहे, आपल्याला नक्कीच मदत करील.

''ओ संग्रामसाहेब तुम्हीच का!''

''हो मिचय.''

''कुणीतरी बाई आलीय तुमच्याकडे, चावी मागतीय.''

''बरं बरं आलोच, रिलेटिव्ह आहे.''

संग्राम उठून दारात आला, नंदाला बघून हसरा चेहरा करीत चावी पायऱ्यांवर ठेवली.

''तुम्ही मागे सरका चावीवर सॅनिटायझर मारतो.''

गार्डनं जंतुनाशक मारून चावीला अंघोळच घातली.

''बाई पाच मिनिटं थांबा, जरा हडकू द्या चावी. मंग घ्या.''

''कायी व्हयना, सरका तुम्ही.'' नंदानं झटक्यात चावी उचलली.

''सायेब काळजी करू नका, जास्त घोर केला की दुखणं वाढतंय. मी आठ वाजता डब्बा घेऊन येते.''

''खुंटीला काळी पॅन्ट लटकवलेली आहे. खिशात पैसे आहेत.''

नंदा आली तशी वाऱ्यासारखी निघून गेली. ती रोडला लागेपर्यंत संग्राम उभा राहून खिडकीतून तिच्याकडे पाहत होता. तिच्याशी बोलणं झालं आणि संग्रामचं अर्ध दुखणं गायब झाले.

''साहेब कुणी नातेवाईक आहे का!'' वाचमन.

''होय, माझ्या तब्येतीविषयी कळलं म्हणून आलीय. आता खाण्याची थोडी सोय होईल.''

''मंग बेस्ट हाय बघा, इथंही जेवण मिळतंय, पर घरचं ते घरचंच असते. मंग बघा तुम्ही चार दिवसांत बरे व्हता का नाही.''

''तुमचा बोल खरा ठरो न माझी यातून सुटका व्हावी म्हणजे सगळं पावलं बघा. तुम्हाला तोंड भरून पेढे भरवतो बघा.''

''नका नका मलाही कोरोना होईन.'' दोघंही मास्कच्या आतून खळखळून हसले.''

रात्री आठ-सव्वाआठची वेळ, गेटवर काहीतरी बाचाबाची चालू होती. दिवटीवर असलेले डॉक्टरही आवाज ऐकून आले.

''काय झालं? कोण आहेत या बाई?'' डॉक्टर

''यांचा पेशेंट आहे आत, डब्बा घेऊन आल्यात. त्यांना म्हणलं, इथं ठेवा मी पेशंटला बोलावतो तर त्या म्हणतात आत सोडा.''

''बाई असं नाही करता येणार. आत सगळे कोरोना पॉझिटीव पेशंट आहेत. तुमच्यासाठी सुद्धा धोकादायक आहे, शिवाय बाहेर आजार पसरण्याची शक्यता असते. गार्ड म्हणतात तसं करा.''

''प्लीज साहेब, पाच मिनिटं फक्त आत सोडा. डब्बा देते दुरून दोन शब्द बोलते न् जाते. मीही एक कार्यकर्ती आहे, आरोग्यसेवेची मला आवड आहे. हे तर माझे नातेवाईक आहेत.''

''ठिकंय फक्त पाच मिनिटे आणि दुरून बोला. मास्क, सॅनिटायझर वापरा. सोडा यांना पाच मिनिटे.''

संग्राम डोळे फाडून नुसता पाहतच राहिला, तो आतून सर्व ऐकत होता.

''आहो तुम्ही आत कशाला आलात, तुम्हालाही लागण झाली तर देव मला तरी माफ करीन का?''

''देवाचं नंतर बघू, आधी बसा मी तुम्हाला वाढून देते न् मग जाते, पाच मिनिटं दिलेत बुवानं.''

बाजूला असलेला स्टुल तिनं ओढला. त्यावर बसून डब्बा उघडला. संग्राम कॉटवरच बसला. चिकन, चपाती न् भात सगळं समोर ठेवलं.

''चला जेवा पटापट, कुस्करून घ्या म्हणजी चव लागतीय दोन घास जास्त खातंय माणूस.''

''हो खातो, पण तुम्ही जरा लांबून बोला की, परत जाताना दोन-तीन चांगले मास्क घ्या. स्वतःची काळजी घ्या हो, मला आता माझ्यापेक्षा तुमचीच जास्त काळजी वाटायला लागलीय.''

''बाई झालं का, निघा लवकर.'' गार्ड म्हणाला.

''व्हय दादा झालंच, मी डब्बा ठिऊनबी गेले असते पर हे माणूस जेवत न्हाई हो. घरीबी असंच बळंबळं खाऊ घालावं लागतंय.''

''ठीकंय पर जरा लवकर, माझ्यावर डॉक्टर वरडतेन.''

नंदाबाई एवढी रिस्क घेऊ नका हो, उद्यापासून गेटवरून मला आवाज देत जा. आता हे डब्बा इथंच राहू द्या, उद्यापासून आणलेलं जेवण वरतून यात टाकत जा.''

''बरं धुऊन ठिवा पण, हे ग्लास पण धुवा.''

तिनं कमरेला खोवलेली छोटीशी बाटली काढली. आजूबाजूला पाहिले आणि पदराआडून बाटली ग्लासात रिकामी केली, त्यात थोडं पाणी टाकलं, परत

बाटली कमरेला खोवली. संग्राम डोळे फाडून पाहत राहिला.

''अहो नंदाबाई काय हे, कुणी बघितलं तर. अन् देशीय हो ही.''

''व्हय देशीचंय, मीच आणलीय. घ्या गट्कन पिऊन पाण्यासारखं. चार दिसात डिस्चार्ज मिळाला फायजे आपल्याला.''

संग्रामनं एका दमात ग्लास रिकामा केला. नंदानं ग्लासात आणखी थोडं पाणी टाकलं.

''ग्लास हिसळून त्यातलं पाणी पिऊन टाका.''

''ओ बाई माझी पर्मनंट नोकरी न्हाई हो, निघा बरं तुम्ही.''

''व्हय दादा झालंच, आता जेवा पटापट. गोळ्या घ्या न् आराम करा. सकाळी दहा वाजता येते मी.''

''बरं काळजी घ्या, हवं तर खोलीवर गेल्यास अंघोळ करा. पैसे मिळाले नव्हं.''

''व्हय, मी चलते.''

नंदा चार चारदा मागे वळून पाहत गेटबाहेर पडली.

सकाळ-संध्याकाळ नंदा डब्बा आणून संग्रामला खाऊ घालत होती. संग्राम दिवसातून चार-चारदा मोबाइलवर तिला बोलत होता, चौकशी करत होता. काळजी घ्यायला सांगत होता. नंदा रोज देशीची कॉटर चोरून देत होती. त्या धुंदीत संग्राम केव्हा झोपायचा, कळायचंही नाही. रात्रीतून कोण आणि किती वारले, हे त्याला दुसऱ्या दिवशीच कळायचं. चाळीस-पन्नास पेशेंट मधून रोज दोन-तीन तरी जायचे. याचं आता काही वाटेनासं झालं होतं. संग्रामची तब्येत सुधारत होती. ताप, सर्दी, खोकला, अशक्तपणा असं काहीही जाणवत नव्हतं. संग्रामसोबत दाखल झालेल्या सर्वं पेशंटची तपासणी झाली. सकाळी सकाळी डॉक्टरांनी सांगितले.

''संग्राम नाव आहे ना तुमचं, आज सुट्टी द्यायची आहे तुम्हाला. तुम्ही रोगमुक्त झालात, सुट्टी झाली तरी काही दिवस घरी आराम करा, बाहेर फिरू नका. काही त्रास झाला तर सरळ इकडे या.'' संग्रामसोबत आणखी तीन-चार लोकांना डिस्चार्ज मिळाला. सगळे खुशीत होते. संग्रामनं नंदाला फोन करून कळवले, तीही खूश झाली.

''मी रिक्षा घेऊन येते, तोपर्यंत तिथंच थांबा.''

''बरं.'' संग्राम आज्ञाधारकपणे म्हणाला. सामान काहीच नव्हतं, ऑफिसमधून उचलून सरळ इकडे आणले होते. पहिल्या दिवशी नंदानं आणलेला डब्बा हातात घेऊन संग्राम कोविड सेंटरमधून बाहेर पडला. रोज खिडकीतून पाहायचा त्या गुलमोहराच्या झाडाखाली येऊन थांबला. काही वेळातच नंदा रिक्षा घेऊन आली,

रिक्षा सरळ पुढे निघाली तसा संग्रामनं आवाज दिला.

''नंदाबाई, अहो नंदाबाई, मी इकडे आहे.''

रिक्षावाल्यानं रिक्षा वळवून त्याच्यासमोर उभी केली.

''तिथंच थांबायचं की, उन्हात इकडं कशाला आलात!''

''तो परिसर केव्हा एकदाचं सोडतो, असं झालं होतं मला. खरं सांगू, या दुखण्यातून मला बाहेर कुणी काढलं असेल तर तुम्ही. न् या बहरलेल्या लालजर्द गुलमोहरानं. तुम्ही यायच्या आधी मी खिडकीतून याच्याकडेच कितीतरी वेळ बघत बसायचो. नंतर याची जागा तुम्ही घेतली. म्हणजे प्रत्यक्ष बघत नाही; पण नजरेसमोर तुम्हीच असता.''

नंदा त्याच्या चेहऱ्याकडे बघत राहिली, डोळ्यात पाणी येतेय असं वाटायला लागलं, तसं तिने नजर फिरवली.

''घ्या ते डब्बा इकडं, बसा रिक्षात.''

''बाई मास्क लावा हो, पोलीसवाले आधीच भाईर पडू देईना झालेत.'' रिक्षावाला काकुळतीला येऊन म्हणाला.

''तुही लावलास, यांनीही लावलाय, मग मी नाही लावला तर चालत नाही का?''

''नाही चालत, लावा तो मास्क.'' संग्राम रिक्षात बसत म्हणाला. तसं तिने कमरेला खोवलेला मास्क तोंडाला लावला.

रिक्षा रूमसमोर येऊन थांबली, नंदानं शंभर रुपये रिक्षावाल्याला दिले.

''आणखी शंभर द्या.''

''नेहमी पन्नासमध्ये आणून सोडता, मी शंभर दिलेत.''

''आहो बाई पाचशे रुपये दिले तरी, कोरोना झालेल्या माणसाला रिक्षात कुणी घेयना झालंय, तुम्ही लयीच विनवणी केली म्हणून आलो न् तुम्ही शंभर रुपयाला बघायलात. शंभर रुपयाचं तर सॅनिटायझर रिक्षात फवारावं लागंल.''

''नंदाबाई देऊन टाका त्याला आणखी शंभर रुपये.''

''काय तुम्ही पण, घे बाबा व्हवू दे तुह्या मनासारखं.''

नंदानं खोलीचं दार उघडलं. आत येताच तिनं संग्रामला अंगावरचे सगळे कपडे काढायला लावले. तिने आधीच गरम पाणी तापवून झाकून ठेवले होते. संग्राम तिच्यासमोर कपडे काढायला लाजत होता.

''असं लाजताय काय पोरीसारखं, सगळे कपडे त्या कोपऱ्यात टाका न् न्हाणीत व्हा.''

संग्राम न्हाणीत गेला आणि दार लावून घेतलं.

“दार उघडंच ठिवा, तेवढ्यानं काय व्हतंय? आणखी एक पातेलं पाणी तापायला ठिवलंय.”

संग्रामनं हातापायांवर पाणी घ्यायला सुरुवात केली. तेवढ्यात तापलेलं दुसरं पातेलं घेऊन नंदा आत आली.

“असं देवावर पाणी टाकल्यासारखं काय टाकायले, सरका जरा पलीकडं.”

नंदानं गरम गरम पाणी त्यात भरपूर डेटॉल टाकून त्याच्या डोक्यावर, पाठीवर पाणी टाकले. केसांना शांपू लावून स्वच्छ धुऊन घेतले. पाठ, पोटाला साबून लावून अंग रगडून धुतले. सुरुवातीला संग्राम अंग चोरून घेत होता, नंतर मात्र त्याच्या हातात काहीच राहिले नाही. गप बसून राहिला. कसलाही मुलाहिजा न ठेवता हांजडहिंजड करीत तिनं सगळं अंग स्वच्छ धुऊन घेतलं. अशी अंघोळ लहानपणी फक्त आईच घालत होती. खुंटीवर ठेवलेला टॉवेल त्याच्या हातात दिला. त्यानं काढून ठेवलेले कपडे वाशिंग पावडरच्या पाण्यात भिजू घातले. स्वच्छ कपडे घालून संग्राम खुर्चीत बसला.

“बरं वाटतंय न्हवं आता, मस्त आधी चहा करते. मंग थोडावेळानं जेवण करू.”

त्यानं मानेनेच होकार दिला, पुतळ्यासारखा खुर्चीत बसून तिची हालचाल न्याहाळत होता. एखाद्या गृहिणीसारखं तिनं सगळं घर ताब्यात घेतले होते. काय नातं आहे हिच्याशी आपलं? ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यासोबत वाद झाला म्हणून आपण मध्ये पडलो. छोटसं काम होतं ते करून दिलं. नंतर दोन–तीन वेळा काही कामानिमित्त ऑफिसमध्ये आली, दोन शब्द बोलायची न निघून जायची. एवढीच काय ती ओळख. तेव्हाही तिचा बिनधास्त आणि धाडशीपणा आपल्याला आवडला होता. बोलताना कुणाचाही मुलाहिजा न करणारी ही बाई आज आपल्या घरात कित्येक दिवसाची ओळख असल्यासारखी वावरत होती. वयाने आपल्यापेक्षा बरीच लहान आहे, आता या क्षणी कुणी नवीन माणूस घरी आला तर कोण आहात तुम्ही दोघं? असं त्याला विचारावे लागणार नाही. दोघं नवरा–बायको आहेत असेच त्याला वाटणार.

“अहो चहा घ्या, एवढा काय इचार करीत बसले?”

“हं, काही नाही, तुम्ही घ्या की.”

“हो मीही घेते, अन् आता जास्त इचार करीत बसू नका. तुम्ही नीट झालात आता.”

“हो डॉक्टर म्हणाले तसं. पण तोंडाला चव नाही हो, काहीही खाल्लं तरी चव लागत नाही.”

‘‘व्हंय कायी दिवस होतं म्हणं तसं, कोणत्याही दुखण्यात असं होतंय, अंगात ताप-बिप असतीय न्हवं, त्यामुळं होत असन. आता जरा घटकाभर पडा. मी भाईर जाऊन येते. मटण नाही तर चिकन घेऊन येते.’’

‘‘चिकन नको मटणच आणा, पैसे आहेत की संपले!’’

‘‘खर्चच कुठं झालेत संपायला!’’

त्यानं उठून लटकवलेल्या पँटच्या खिशात हात घातला. सगळे पैसे तसेच होते, नंदानं त्या पैशाला हातही लावला नव्हता.

‘‘काय हे नंदाबाई, पैशाला हातही लावला नाही तुम्ही. असं असते का कुठं.’’ त्यानं सगळे पैसे तिच्या हातात घातले.

‘‘राहू द्या साहेब, मी तरी कुठं धा-इस हजार खर्च केलेत. अन् माझ्याजवळ तरी तेवढे कुठून येतेन.’’

‘‘ते काही नाही. ते पैसे ठेवा जवळ.’’

हातात पैसे असलेली तिची मूठ संग्रामनं आपल्या दोन्ही हातानं बंद कली.

‘‘जा बरं लवकर. मला भूक लागलीय, असं बनवा की या आठ-दहा दिवसांचा कडता निघाला पाहिजे.’’ नंदा हसत पिशवी घेऊन बाहेर पडली. संग्राम कॉटवर आडवा झाला. सावळी, नाकेलशी, हसरी नंदा त्याच्या नजरेसमोरून हलत नव्हती. खरंतर त्या दिवशी तिला फोन लावताना संग्रामला भीती वाटत होती. कुणाचाही मुलाहिजा न ठेवता फाड् फाड् बोलणारी, माझ्यासाठी एवढं करता का असं विचारल्यावर काय उत्तर येईल, याची त्याला भीती वाटत होती. किती सेवा केली आपली तिनं, सर्वात महत्त्वाचे म्हणजे किती धीर दिला, काही होत नाही काळजी करू नका. हे शब्दच आपल्याला जीवदान देणारे ठरले. केवढा आत्मविश्वास होता या दोन शब्दांत. ग्रेट आहात नंदाबाई.

संध्याकाळी छान स्वयंपाक केला. दोघं सोबतच जेवले, जेवताना संग्राम म्हणाला,

‘‘नंदाबाई हे बरोबर नाही, एवढं छान मटन बनवलंत, तिथं दवाखान्यात गुपचूप ग्लासात टाकून द्यायचात आणि इथं तर आपण घरी आहोत.’’

‘‘अजिबात नाही, तिथली गोष्ट येगळी होती. तुम्ही जास्त विचार करू न्हाई, तिथं रोज एक-दोन एक-दोन माणसं मरत होते. याची तुम्ही धास्ती घेऊ न्हाई न् इचारातून थोडं भाईर पडावं, म्हणून देत होते. मला एका म्हाताऱ्यानं सांगितलं होतं म्हणलं बगू करून. तुम्हाला दोन दिसात बरंही वाटाय लागलं. आता तुम्ही बरे झालात, तुम्हाला सवं बिवं नाही न रोज प्याची.’’

‘‘न्हाई हो लगेच तुम्ही तर माझ्यावरच संशय घ्यायला लागलात. असंच

कधी चार-सहा महिन्याला मित्रांबरोबर घेतली तर घेतो. नाही तर ढुंकून सुद्धा बघत नाही.''

''मित्रांबरोबरचंही बंद करा, चांगलं नसतंय ते.''

''पण काही म्हणा, तुम्ही आणत होतात ती लयी कडक होती हो, माणूस पार आडवाच होतंय.''

''पुरे झालं. जेवा आपलं गुमान.''

संग्रामला घरी येऊन दोन दिवस उलटून गेले. सकाळी दहा-अकराची वेळ, संग्राम जेवण करून कॉटवर लोळत होता. नंदाला काहीतरी बोलायचे होते; पण सुरुवात कशी करावी, कळंत नव्हतं.

''मला म्हणता, विचार करत जाऊ नका न् तुम्ही कुठल्या विचारात पडलात?''

''हेच, तुम्ही आता घरी आलात, तब्येतबी चांगलीय. मी आता घरी जावं म्हणते.''

संग्राम झट्कन उठून बसला. चेहरा पार उतरला. नंदालाही ते जाणवलं. काही वेळ तीही गप्प बसून राहिली.

''आहो दोनच दिवस झालेत मी घरी येऊन, परत काही झालं तर काय करू!''

''गप बसा, आता तुम्हाला कायबी होणार नाही. डॉक्टर काय म्हणले आठवतंय न्हवं, आताच कामावर जाऊ नका. सरकार चांगली सुट्टी देतंय ह्या दुखण्यासाठी.''

''हो, पण तुम्ही जायची गरबड करू नका ना प्लीज. तुमचं घर कुठंय हवं तर घरी जाऊन सांगून या.''

''साहेब, मी बाई माणूसंय, तुमचा फोन आला. मागचा-पुढचा विचार न करता घर सोडलं न् इकडं आले. तिकडं काय म्हाभारत घडलंय कुणाला ठावं!''

''माफ करा, थोडं वयक्तिक विचारतोय, घरी कोण कोण असतंय?''

''घरी आईवडील अन् मी तिघंच असतोय.''

''मला वाटले, तुमचं लग्न झाले असेल.''

''तसं असतं तर मला इथं ऱ्हाता आलं असतं का!''

''तुमचं लग्न झाले नाही!''

''लग्न झालं होतं, पर टिकलं नाही. त्यानं दुसरी बायको केली. नंतर माझ्या वडिलांनी चार पावणे रावणे जमवून सोडचिट्ठी लिहून घेतली. नंतर बरेच ठिकाणं आले, माझं मनच उठलं. मायबाप सांगून सांगून कंटाळले, आता वडील थकलेत, आई मंजुरीचे कामं करतीय. मी खेड्यापाड्यातील बाया-बापड्यायचे सरकारी

कामं, चिठ्ठ्या-चिपाट्या करते, हे तर तुम्हाला ठावंच आहे. गावात आमचा एक महिला बचत गट आहे, घरगुती काही वस्तू बनवतो, इथं शहरात काही दुकानदार आहेत, त्यांना माल देतो. काही किरकोळ विक्री करणारे घरी येऊन घेऊन जातात. छान चालतंय. आई जोवर काम होतंय, तोवर करते म्हणतीय.''

''इकडे इतक्या दिवस थांबलात, काही म्हणणार नाहीत का?''

''ओरडणार तर हाईतच, तुमचंबी म्हत्वाचं होतं. थातूरम्हातूर कारण सांगून आले निघून. आधीच रोज काय काय घडायलंय आपुण बघायलोच की, तुम्ही इकडं एकटे. अशा टायमाला कुठं इचार करीत बसायचं. तुम्ही बरे झालात, ही मोठी गोष्ट झाली; आता मी जाते.''

''मला तुमची काळजी वाटतेय, घरी काय सांगता!''

''नका काळजी करू. सांगते कायीतरी. इथं आईची चुलत बहीण असतीय, तिच्याकडं व्हते म्हणून सांगते.''

''त्यांना पटेल का पण? गावात लोक तर फार शहाणे असतात, नको ते विचारत असतात.''

''न्हाई पटणार त्यांना, पण गावात इचारणारांना मी सांगितलं तेच कारण सांगतेल.''

''इतक्या दिवस राहिलात तसं आणखी दोन दिवस रहा ना.''

''नका साहेब, तेबी थकलेत, असं बिनधास्त राहनं बरं न्हाई.''

''बरं आजच्या दिवस रहा, आज काहीतरी गोडधोड करू. सकाळी जा लवकर.''

''काय तुम्ही पण, काय करायचं गोडधोड!''

''करा पुरणपोळी, पण तुम्हाला आवडतीय न्हवं. नसता तुमच्या आवडीचं करा.''

''न आवडायला काय झालं, करू पुरणपोळी.''

आजच्या दिवस का होईना, नंदा थांबली याचा आनंद संग्रामला झाला. लगेच उतरलेल्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच नंदा गावी निघून गेली. सगळं घर सुनंसुनं वाटायला लागलं. संग्रामला सकाळी जेवू घालून, काही जास्तीचा स्वयंपाक करून नंदा गेली होती. रात्रीचं जेवण करून संग्रामनं नंदाला फोन लावला,

''हेलो नंदाबाई, व्यवस्थित पोचलात ना.''

''व्हय मी दुपारीच घरी पोचले, माझी काळजी करू नका. जेवण केलं का.''

''कशाचं जेवण जातंय, खाल्लं थोडंसं. तिकडं ठिकंय न सगळं,आई, बाबा ओरडले नाहीत ना.''

''आई खूप बरडत होती, मावशीला फोन लावून दे, म्हणत होती. मी तिथंच होते का इचारायला.''

''माय गॉड, मग!''

''तिच्या समोर उगीच लावल्यासारखं केलं, लागत नाही म्हणून सांगितलं. उद्या सकाळी लवकर लाव म्हणालीय.''

''मला त्यांना भेटायचंय हो, जमंल का!''

''नका नका, उगीच त्यांना नको ती शंका येईल. गावातबी उगीच चर्चा व्हतीय.''

''नंदाबाई, मला गावाचं नाव सांगा, मी येतो तिकडे.''

''आवो पण कशाला, तुम्ही बरे व्हा तुम्ही ऑफिसला आलात की मीच येऊन भेटते. कायी गरज पडलीच तर फोनवर बोलत जाऊ.''

''एक विचारू का!''

''इचारा की.''

''तुम्ही माझ्याबरोबर लग्न करताल!''

''घेतला का तुम्हीबी गैरसमज करून, आवो सायेब मी मनाला बरं वाटतंय म्हणून असे कामं करते न् मला ते आवडतं. शिवाय माझं एकदा लगीन झालेलंय. या कोरोनात लयी लोकांचे हाल झालेत. तुमची येवस्था माझ्या लक्षात आली, कायी लोकं नीट काळजी न घेतल्यानं वारलेत. तुम्ही मला मदत मागितली, मी नसते आले न् कायी बरं-वाईट झालं असतं तर मला जलमभर मनाला लागून ऱ्हायलं असतं. फक्त माणुसकी म्हणून मी हे केलंय, बाकी सगळं इसरून जा. तुम्ही लेकराबाळावाले हाईत, असलं तुमच्या डोक्यात आलंच कसं.''

''कुणाचे लेकरं न् कुणाचं काय, आयुष्यभर ज्यांच्यासाठी झिजलो, त्यांनी मला मरनाच्या दारात लोटलं. माझ्याकडे पाठ फिरवली. खरं सांगू का नंदाबाई, तुम्ही नसता तर मी नक्कीच मेलो असतो.''

''गप बसा, वाटंल ते बोलू नका, मी तिथं तुम्हाला मरू देण्यासाठी आले व्हते का! आता बरे झाले न्हवं, मंग असं वाईट वंगाळ बोलू नका.''

''नंदाबाई, ऐका नं, मी तुम्हाला कसलाच त्रास होऊ देणार नाही. आणि आपण वेगळे राहणार आहोत. तुम्ही माझ्याबरोबर लग्न केलं तरीही आणि नाही केलं तरीही. मी आता घरी जाणारच नाही. आहो त्यांनी मला मेलं म्हणून सोडून दिलय, बायको म्हणाली तुम्ही पण मरसाल न् आम्हालाही मारसान. पोरं पण

असंच म्हणाले.''

‘‘आहो या बिमारीमुळं लयी ठिकाणी असं झालंय, म्हणून काय सगळे असंच वागणारेत का.''

नंदा काही ऐकून घेत नव्हती आणि संग्राम काही तिचा पिच्छा सोडत नव्हता. आणि एक दिवस संग्राम तिच्या गावी घरी येऊन धडकला. ऑफिसातल्या काही कागदपत्रांवरून तिच्या गावाची माहिती काढली. नंदाला ज्याची भीती होती, तेच घडलं. तिनं पाये धुवायला पाणी दिलं, आत येऊन सतरंजीवर बसला.

‘‘पावणे कोणयत!''

‘‘बाबा ते हापीसातले साहेब हाईत, मी सरकारी कामासाठी यांचेकडं जातेय कधी कधी. काहीतरी कामासाठी गावात आले व्हते, घर इचारीत-इचारीत आलेत.''

‘‘बाबा गावात माझं काही काम नव्हतं, मी तुम्हालाच भेटायला आलोय. मला तुमच्या मुलीबरोबर लग्न करायचंय.''

नंदाचे वडील झोपलेले तट्कन उठून बसले. नंदाची छाती धडधडायला लागली. नंदा संग्रामकडे रागानं सारखी बघत होती, त्याची मात्र तिच्याकडे पाहायची हिंमत होत नव्हती. त्यानं ठरवूनच आला होता, हो म्हणील नाही तर नाही म्हणील, उगीच झुरणी लागणं काही कामाचं नाही. नंदाची आई तोंडाचं बोळकं पदरानं झाकून आळीपाळीनं दोघांकडेही पाहत होती.

‘‘नंदा हे काय म्हणतेत ते खरंय?'' नंदाचे वडील म्हणाले.

‘‘न्हाई बाबा मला म्हायीत नाही, मी तुम्हाला आधीच सांगितलंय, मला लग्न करायचं नाही म्हणून.''

‘‘बरं च्या तर टाक. एवढ्या लांबून घरी आलेत.''

‘‘बाबा मला तुमच्यापासून काहीही लपवायचे नाही. माझी न् नंदाची जुजबी ओळख होती. मला पंधरा दिवसांपूर्वी कोरोना झाला होता, मी तिकडं पार जालन्याचा आहे. मी बिमार पडलो, अगदी मरायला टेकलो होतो. माझं इकडं कुणीही नाही. दवाखान्यात बेवारस सारखा पडून होतो. यांचा फोन नंबर माझ्याकडे होता, यांना सगळं सांगितलं. या धावून आल्या, म्हणून मी वाचलोय. मध्ये आठ-दहा दिवस नव्हत्या ते यामुळेच. माझ्या खोलीवर एकट्या राहून माझ्या खाण्या-पिण्याची सोय केली.''

नंदा कोपऱ्यात उभी राहून सगळं ऐकत होती. आपण मावशीकडे गेलो होतो असं तिनं आईला सांगितले होते, हे उघडं पडलं. नंदानं वडील आणि संग्रामला चहा दिला. आई तिला बाजूच्या खोलीत घेऊन गेली.

‘‘आमी एवढं लगीन कर म्हणून बोंबलत होतो, ऐकलं न्हाईस अन् हे असले

चाळे चांगले हायीत का!''

''आई त्यांना काही म्हणू नका, त्या एकदम निर्मळ आहेत. पहिल्या नवऱ्यानं सोडलं हे त्यांचं दुर्दैव. तुम्ही माझ्या आईसारख्या आहात. मी मनापासून सांगतो, यांना जिवापाड जपेन. मी यांना आधी म्हणालो होतो; पण त्या ऐकायला तयार नाहीत. आता तुमच्यावर आहे सगळं.'' संग्राम दोघींजवळ येत म्हणाला.

वडिलांनी नंदाला आवाज दिला, तसे सगळेच बाहेर आले.

''पावणं तुम्ही कोण, कुठलं, जात कोणची, कायबी म्हायती न्हाई. तुम्ही आमची म्हायती काढली असंल, पर आम्हाला कायीच म्हायती न्हाई. तसं तुमच्या बोलण्या-वागण्यातून तुमी बऱ्या घरचे दिसता, पर आमचं तसं कायीच न्हाई. सगळं जगजाहीरंय. दोन टाइम खायचे वांदे, तेंवा नीट इचार करून बोला.''

''मला तुमचं काहीही पाहायचं नाही, माझा तुमच्या पोरीवर जीवंय. मी त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ देणार नाही.''

''तुमचं वय तर बरंच दिसतंय, बायको, लेकरं!''

''बायको, लेकरं आहेत; पण त्यांनी मला कोरोनात मारून टाकलंय. माझ्याकडे पाठ फिरवली, मला वाऱ्यावर सोडून दिलं. आता माझं जे काही आहे, ते नंदा.''

''असं कुठं तोडून टाकता येतंय व्हय? मुलं, बाळं कुणाला तुटलेत का. तरीबी नंदा काय म्हणतीय, ते बघा. आमालाबी वाटतंय, आमचं कायी बरं-वाईट व्हायच्या आत हीचं कायीतरी मार्गी लागावं. आमाला पोरगं न्हाई एवढीच पोरगीय. आमी लयी इनिवलं दुसरं लगीन करू म्हणून पर तिनं ऐकलं न्हाई. तिला पयलं पोळलेलं हाय म्हणून तिचा इस्वास उडालाय. ती हो म्हणली तर आमची ना न्हाई. आज ताकत हाय, चार कामं करून जगतीय. आमालाबी जगवतीय. आमच्या डोळ्यांदेखत तिचं भलं व्हावं, एवढीच आता आशा ऱ्हायलीय.''

हे सगळं नंदा बाजूला उभी राहून ऐकत होती. एरवी कुणाचा एक शब्द ऐकून न घेणारी नंदा मोठाले डोळे वटारून संग्रामकडे पाहत होती.

''मी थोडं तिच्याशी बोलू का!''

''बोला की, आठ-दहा दिवस सोबत ऱ्हायलात न् आता बोलू का म्हणून इचारायलात.'' नंदाची आई थोडं रागातच बोलली.

''आई तुमचा गैरसमज झालाय, अहो मी आठ दिवस दवाखान्यातच होतो. त्या एकट्या खोलीवर होत्या. त्यांनी औषध, पोटापाण्याची सोय केली म्हणून तर मी तुमच्या समोर उभा आहे.''

''बरं बरं जा, बोला काय बोलायचं ते.''

भिंतीला लागून स्वयंपाक आणि काही सामान ठेवण्यासाठी तीन-चार पत्र्याची

खोली बनवली होती, तिथे दोघं आले.

''आखीर तुम्ही केलंच तुमच्या मनासारखं.''

''आहो ऐकून तर घ्या, तुम्हाला आधीही म्हणालो होतो. तुम्ही ऐकलं नाही, म्हणून यावं लागलं. न सांगता आलो त्याबद्दल माफी मागतो हवं तर.''

''पुरं झाला मानभावीपणा, मायबापाच्या पुढं जायची हिंमत व्हयना झालीय. आई तर खाऊ की गीळू कराय लागलीय.''

''तसं काही नाही, नीट समजावलंय मी त्यांना, नंदाबाई तुमच्यावर विश्वासंय त्यांचा.''

''हं एकीकडे नंदाबाई म्हणा न् एकीकडे लग्नाची मागणी घाला. अशानं कोण विश्वास ठिवील तुमच्यावर?''

नंदा संग्रामवर नजर रोखत म्हणाली.

''सॉरी, पण मी त्यांच्या समोर नंदाच म्हणालो.''

''जा भाईर बसा, मला आणखी एकदा चाहा करायचाय.''

''मग होकारचंय म्हणाचा!''

''ते वडिलांना विचारा.'' संग्राम खुशीतच समोरच्या खोलीत आला.

संग्राम एक दिवस थांबला, पिठलं-भाकरी खाल्ली. गोधडी अंथरलेल्या बाजेवर झोपला. दुसऱ्या दिवशी गावाबाहेरच्या मंदिरात जाऊन एकमेकांना हार घातले. चार लोकांना कळावं म्हणून काही माणसांना जेऊ घातले. नंदाच्या आई-वडिलांना एकीकडे बरंही वाटत होतं तर दुसरीकडे आपला आधार गेल्याचं दुःखही वाटत होतं. नंदानं घरी काही सामान भरून दिलं. दोघांचेही मोबाइल नंबर एका चिठ्ठीवर लिहून दिले. बाजूला राहत असलेल्या चुलतभावाला थोडं लक्ष द्यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी संग्राम नंदाला घेऊन नोकरीच्या गावी आला.

आता संग्रामची तब्येत उत्तम झाली होती. नंदा आल्यानंतर घरात बरेच बदल झाले, काही नवीन सामानांची खरेदी केली. अशा तऱ्हेने संग्रामनं दुसरा संसार थाटला. महिना झाला तरी बायकोचा किंवा मुलांचा फोन आला नव्हता. निदान बायकोने तरी नवरा जिवंत आहे की मेला, याची चौकशी करायला हवी होती. संग्राम नंदाला म्हणाला.

''नंदा, दोन दिवस आपण माझ्या गावी जाऊन येऊत का!''

''जाऊ, पण तुमची बायको, मुलं काय म्हणतील?''

''त्यांना कळावं म्हणूनच जाऊन यायचंय.''

''बघा, पण मला न्हाई वाटत ते मला स्वीकारतील.''

''स्वीकारण्या-न स्वीकारण्याचा अधिकार त्यांनी मागंच गमावलाय. मी त्यांना

कोरोना झाला तेव्हा फोन केला होता, मेलाय की वाचलाय, याची चौकशी तरी केलीय त्यांनी!''

''सारख्या मरणाधरणाच्या गोष्टी कशाला करता हो, देव दयेनं नीट झालात. पुन्हा नका बोलत जाऊ असं, तुम्ही म्हणता तर येऊ जाऊन. एक ना एक दिवस आमने-सामने यावंच लागणारंय.''

रविवारचा दिवस, सकाळी-अकरा साडेअकराची वेळ, प्रथमच संग्रामला स्वतःच्याच घरी परक्यासारखं वाटत होतं. दाराची कडी वाजवली. दार मोठ्या मुलाने उघडले. दोघांकडेही तो आश्चर्याने पाहत होता. आत आल्यावर बायकोसहित सगळेच प्रश्नार्थक नजरेने नंदाकडे पाहत होते.

''पप्पा हातपाय धुऊन घ्या.'' मुलगा.

''ह्या कोणयत!'' बायको.

''सांगतो, आम्हाला नीट टेकू तर दे.''

''आधी कोणयत, ते सांगा.''

''माझी दुसरी बायको आहे ती.''

''लाज वाटतीय का सांगायला, लेकरं लग्नाला आलेत, लोक तोंडात शेण घालतेल.''

सुरेखाचं अंग थरथरत होतं, डोळे आग ओकत होते.

''आपण सावकाश बोलू, आम्ही प्रवास करून आलोय.''

**– बा. बा. कोटांबे**

भ्रमणध्वनी : ९४२१०६०६५५

# सूचना

'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक-खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास,
तुमचा पोस्टल ॲड्रेस, पिनकोडसहित
९८३३४४४३६९ या मोबाइल नंबरवर पाठवावा.

# मराठी साहित्य संमेलनातील बालमेळाव्यांचे महत्त्व

डॉ. कैलास दौंड

बालकुमार वाचकांचा गट हा संस्कारक्षम वाचकांचा गट असतो. या वयोगटांमध्ये कल्पना करण्याची आणि विचार करण्याची गती अधिक असते. कल्पनांचे नावीन्य असते. अवतीभोवतीच्या जगाबद्दल कुतूहल असते. ते कुतूहल कायम ठेवणाऱ्या अनेक घटना अवतीभोवती देखील घडत असतात. अशाच घटना काही ताकदीचे बालसाहित्याचे लेखक त्यांच्या लेखनातून घडवत असतात. असे लेखन बालवाचकांच्या मनाचा ताबा घेते. त्यांच्या जिज्ञासेला वाव देते. त्यांचे कल्पनांचे जग फुलवते. त्यातून त्यांच्या आकलनशक्तीला आणि निरीक्षणशक्तीला बळ मिळते. या वयातील बालकांजवळ नवनिर्मिती क्षमता देखील असते आणि नवनिर्मिती करणाऱ्या व्यक्तींविषयी आकर्षण देखील असते. त्यासंबंधाने त्याच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झालेले असतात. ते प्रश्न त्याला संबंधित व्यक्तीला विचारायचे असतात. मात्र अशी संधी त्याला मिळत नाही. मग तो ही माहिती त्याच्या संपर्कात येणाऱ्या पालकांना, शिक्षकांना आणि त्याही आधी आपल्या समवेत मित्रांना विचारत असतो.

ही संवादाची, जिज्ञासा वाढवणारी, कुतूहल शमवणारी आणि निर्माण करणारी, कल्पनांचा जग फुलणारी संधी बालकांना साहित्य संमेलनांच्या माध्यमातून निर्माण होऊ शकते, याची कल्पना काही संयोजकांना आल्यामुळे मराठी साहित्य संमेलनामध्ये बालवाचकांना सहभागी करून घेणारी सत्रे साहित्य संमेलनामध्ये समाविष्ट होऊ लागली आहेत. प्रादेशिक स्तरावर भरणाऱ्या साहित्य संमेलनामध्ये देखील अशी सत्रे प्रामुख्याने समाविष्ट होतात. महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्यासाठी एक-दोन संस्था मुद्दाम अशी सत्रे आयोजित करतात, बालकुमार साहित्य संमेलने देखील आयोजित करतात. त्यामुळे काही प्रमाणात बालवाचकांची, लेखन क्षमता असणाऱ्या बाल-

लेखकांची काही प्रमाणात का होईना, वैचारिक भूक भागवतात. विद्यार्थ्यांना लिहिण्यासाठी आणि इतर माध्यमातूनही व्यक्त होण्यासाठी जाणीवपूर्वक संधी देणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी आपले बाल साहित्यिक नक्कीच पुढे येतील. फक्त आयोजकांनी तसे आयोजन करायला हवे.

१९९७ मध्ये अहमदनगर (आत्ताचे अहिल्यानगर) येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लेखकांशी संवाद हे सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात गंगाधर गाडगीळ, आनंद यादव, अरुण खोरे आणि शरणकुमार लिंबाळे आदी लेखकांचा समावेश होता. या लेखकांच्या लेखनाचा त्या वेळच्या पाठ्यपुस्तकांमध्ये समावेश होता. त्यामुळे साहजिकच या सत्राला विद्यार्थिवर्गाची मोठी गर्दी होती. या साहित्य संमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातील कुतूहल शमवणारे कितीतरी प्रश्न विचारून या लेखकांना बोलते केले होते. लेखकांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला त्यांच्या पातळीवर जाऊन मनमोकळेपणाने उत्तरे दिली होती. अशा सत्रांचा परिणाम म्हणून या विद्यार्थी वर्गांनी मोठ्या प्रमाणात पुस्तक खरेदी देखील केली होती.

२०२४ मध्ये अंमळनेर येथे भरलेल्या ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वसंध्येला 'कलानंद बालमेळावा' या अनोख्या सत्राचे आयोजन केले होते. त्यात राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेऊन त्यातील निवडक बालनाट्य, कविता वाचन, नाट्यछटा, नाट्य प्रवेश, सादरीकरण झाले होते. यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, त्यांच्या लेखनाला आणि त्याचबरोबर सादरीकरणालाही वाव मिळाला होता. अशा प्रकारच्या उपक्रमाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात उपयोग होतो.

९४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक मध्ये भरले. या कार्यक्रमांमध्ये पहिल्यांदाच 'बालकट्टा' व 'बाल आनंद मेळावा' यांचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रथमतः अशा सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

बालसाहित्याच्या वाढीसाठी आणि बालकांमध्ये साहित्य प्रेम वृद्धिंगत होण्यासाठी, तसेच त्यांच्या अभिव्यक्तीला वाव मिळण्यासाठी मराठी साहित्य संमेलनामध्ये बालसाहित्य विषयक सत्र आयोजित केले जातात. तरीही अजून त्यात म्हणावी तितकी जागरूकता आले नाही. बाल ही संकल्पना आपण ढोबळ मानाने वापरतो, तितकीशी ती ढोबळ नाही. समजा, शून्य ते सात वर्ष वयोगटापर्यंतच्या बालकांसाठी साहित्य संमेलनामध्ये काय देता येईल? याचाही विचार झाला पाहिजे. शिशुगटाला बालगीते, बडबड गीते आवडत असतात, त्यांना शारीरिक हालचाल

करायला आवडते. त्याचप्रमाणे वय वर्ष ८ ते १३ किशोरवयीन गटांचे आकलन अधिक असते. त्यांना वाचन करायला आवडते, त्यांना ज्या गोष्टीचे किंवा कवितेचे वाचन करायचे असते, त्या गोष्टीची किंवा कवितेची भाषा त्यांना समजेल इतकी सोपी असावी लागते. उगीचच कुणीतरी मोठ्या माणसाने, बालमनाचे आकलन नसलेल्या माणसाने, स्वतःच्या बालपणाच्या अनुभवाला गृहीत धरून काहीबाही लिहिले असेल आणि ते बालकांना आवडत नसेल तर त्यालाच बालसाहित्य म्हणण्याचा अट्टाहास धरू नये, असे वाटते. ही मुले त्यांना प्रेरणा दिली तर स्वतः देखील काही लिहू किंवा निर्माण करू शकतात. आपण काहीतरी कृती करू शकतो याचा त्यांना विश्वास आणि आनंद असतो. मात्र हा आनंद निर्माण करणे आपले काम आहे. साहित्य संमेलनामधून अशा विविध वयोगटांसाठी सत्र आयोजित करणे हे आयोजकाच्या कौशल्याचे काम आहे. मात्र ते व्हायला हवे, हे नक्की.

त्यापुढील जो दुसरा वयोगट असतो, तो वय वर्ष १३ ते १६. हा वादळी अवस्थेचा कार्यकाळ म्हटला तरी चालेल, अशा प्रकारचा वयोगट असतो. विद्यार्थी भावनिकदृष्ट्या विकसित झालेल्या असतात. त्यांच्या संवेदना आणि भावना प्रबळ असतात. त्यांच्यावर केलेल्या संस्काराचा परिपाक याच वयोगटात दिसून येतो. या वयोगटांतील बालकांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाल्यास चांगले बालसाहित्य निर्माण होऊ शकेल.

आणखी महत्त्वाचे म्हणजे मोठ्यांच्या दुनियेत बालकांना मार्गदर्शन करण्याचा एक भाग असतो. मात्र आपल्यालाही न कळू शकणारे, आपल्याला न सुचलेले असे काही बालक आपल्याला सांगू शकतील, हे गृहीत धरून साहित्य संमेलनामध्ये एखादा परिसंवाद 'बालवाचकांचे लेखकाला मार्गदर्शन' असे ठेवायला हरकत नसावी. अमरेंद्र भास्कर बालकुमार साहित्य संस्था व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था बालकांसाठी काहीतरी करू इच्छितात. त्यांची बाल साहित्य संमेलनही होतात. त्याला त्या-त्या प्रादेशिक भागातील बालकांची आणि शिक्षकांचीही उपस्थिती असते हे विशेष. अशा बाल साहित्य संमेलनातून देखील बालकांच्या अभिव्यक्तीला वाव देण्याचा प्रयत्न व्हायला हवा. एकूण सर्व साहित्य संमेलना मधील सुरुवातीची ग्रंथ दिंडी हा एक महत्त्वाचा भाग असतो. या दिंडीमधील विद्यार्थ्यांचा सहभाग देखील लक्षणीय असतो. या ग्रंथदिंडी मधील दिंडीत जे काही ग्रंथ ठेवलेले असतात, त्यात आवर्जून बालसाहित्य विषयक पुस्तकांचा समावेश जाणीवपूर्वक करायला हवा. बालसाहित्य हे प्रतिष्ठित साहित्य आहे, ही जाणीव साहित्यिकांसह आयोजकांनाही व्हायला हवी. कुठलाही साहित्य व्यवहार हा लेखक, वाचक आणि

प्रकाशक यांच्यावर अवलंबून असतो, यात ग्रंथालये देखील महत्त्वाची भूमिका पार पडतात. बालसाहित्य मेळाव्याचा विचार करत असताना आपल्याला प्रकाशकांना दुर्लक्षून चालणार नाही. आज पारंपरिक पुस्तकांना डिजिटल पंख फुटले आहेत. ई बुक्स, ऑडिओ बुक्स बाजारात उपलब्ध होत आहे. अगदी नजीकच्या काळातच दृकश्राव्य पुस्तके उपलब्ध होतील. त्यामुळे बालसाहित्याच्या प्रकाशकांचा काय अनुभव आहे? बालसाहित्य लिहिणारे लेखक कवी आणि बालसाहित्याचे वाचक यांना देखील कळावयास हवा. तो कळण्यासाठी बालसाहित्यिक, वाचक, प्रकाशक यांच्यात सुसंवाद असायला हवा. बालकांना त्यांच्या क्रयशक्तीला अनुसरून पुस्तके विकत घेता येतील. यासाठी बालसाहित्याचे प्रकाशन, बालसाहित्य-लेखक, कवी, बालसाहित्याचे वाचक यांच्यातील सुसंवादासाठी एखाद्या परिसंवादाचे आयोजन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील तीन दिवसांपैकी एखाद्या दिवशी नक्कीच केले पाहिजे. याचा उपयोग ग्रंथ व्यवहार वाढण्यास नक्कीच होईल. लिहिणाऱ्या लेखकांनाही दिशा व चांगला मिळेल.

आपल्याला वाचणारी, लिहिणारी आणि विचार करणारी देखील पिढी निर्माण करायची आहे. आज सर्वत्र वाचन कमी झाल्याची ओरड करण्यात येते. सगळीकडे विद्यार्थी आणि तरुण पिढी मोबाइल मध्ये गुंतून पडल्याचे सांगण्यात येते, मात्र त्यातून मुलांना बाहेर काढण्याचे प्रयत्न कितपत केले जातात? त्यांच्या कल्पनांना, त्यांच्या जिज्ञासेला शमवण्यासाठी, त्यांच्या नवनिर्मितीला उत्तेजन देण्यासाठी, त्यांचे कलागुण फुलवण्यासाठी, त्यांच्या लेखन प्रेरणा जागृत करण्यासाठी किती प्रयत्न केले जातात? असे प्रश्न जेव्हा उपस्थित केले जातात, तेव्हा त्याच्या उत्तरासाठी साहित्य संमेलना मधील बालमेळाव्याचे महत्त्व पुन्हा पुन्हा अधोरेखित होत राहते. त्या दृष्टीने जिल्हा पातळीवर भरणाऱ्या, तालुका पातळीवर भरणाऱ्या आणि अखिल भारतीय पातळीवरील काही साहित्य संमेलनामध्ये बालसाहित्य विषयक, विद्यार्थी विषयक सत्रांचे आयोजन सक्तीचे करण्यात आले पाहिजे. आता महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मोठ्या प्रमाणावर जिल्हास्तरीय साहित्य संमेलनांना देखील अनुदान देत आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर साहित्य संमेलने आयोजित देखील होत आहेत. अशा साहित्य संमेलनामध्ये भावी पिढीच्या जडणघडणीसाठी बालसाहित्य विषयक आणि बालकुमार वाचकांचा समावेश असणारे किमान दोन सत्रे साहित्य संमेलनात असावेत अशी अटच ठेवली जायला हवी. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या, यांच्या लेखनाबद्दल कुतूहल आहे, अशा लेखकांशी संवाद करता येईल. हे घडत असतानाच विद्यार्थ्यांना स्वतःच्या कथा,

कविता, नाट्य प्रवेश, संवाद, नाट्यछटा, बाल नाटिका सादरीकरणासाठी मोठे व्यासपीठ देखील निर्माण होईल. त्यातून व्यक्तिमत्त्व विकास झालेल्या बालकांचा समाजात समावेश होईल.

सगळेच आपल्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर सोपवून मोकळे होता येणार नाही हे देखील खरेच आहे. बालकांच्या जडणघडणीत महत्त्वाचे काम करणारा घटक म्हणजे शाळा होय. त्यात बालवर्ग, पूर्व प्राथमिक वर्ग, पूर्व माध्यमिक वर्ग व माध्यमिक वर्गाचा समावेश होईल. वर्षभरात प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला वाव देणारा एखादा साहित्यिक मेळावा शाळा स्तरावर आयोजित केला पाहिजे. त्यासाठी त्या शाळांना सरकारकडून अर्थसाहाय्य देखील मिळाले पाहिजे. व शाळेने केलेल्या मेळाव्याच्या नियोजनाची व पूर्ततेची माहिती घेतली पाहिजे. अशी खातरजमा केल्यामुळे मेळावे नीटनेटके व विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला चालना देणारे, त्यांच्या अभिरुचीत वाढ होणारे आणि प्रथितयश बालसाहित्यिकांशी चर्चा घडवणारे होतील. हा एक भाषिक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांचा आवडता देखील होईल.

विद्यार्थ्यांच्या भाषिक जडणघडणीसाठी साहित्य विषयक बालमेळावे महत्त्वाचे ठरणार असून त्याचे आयोजन शाळा, प्रादेशिक व विभागीय साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये नियोजनपूर्वक झाल्यास साहित्य प्रेमी, वाचन आवड असणारी, ग्रंथालयात जाणारी, सर्जक विचार करणारी पिढी निश्चितच तयार होईल.


**– डॉ. कैलास दौंड**

भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११


लोकमान्य टिळक म्हणायचे, मी नरकातसुद्धा उत्तम पुस्तकांचं स्वागत करेन. कारण नरकाचा स्वर्ग करण्याची ताकद पुस्तकांमध्येच असते.

---

प्रसिद्ध विचारवंत जॉन रास्किन म्हणायचे, पुस्तक नसलेलं घर हे खिडक्या नसलेल्या खोलीप्रमाणे असते.

---

पुस्तक म्हणजे अनेक पानांचा संग्रह. पण ह्या पानांमध्ये माणसाचं आयुष्य घडवण्याची ताकद असते.

## ‘मुकी माया’

घर बोलवत असतं मुक्यानं
खिडक्या-दारांतून
झरोक्यातून
वाट पाहात असतं
दगड-माती-विटा-लाकडाला घट्ट धरून
झाडं, फुलं, गवताची पाती
हळू थरथरत असतात
अंगण, फाटक, उंबरठा
घेत असतात कानोसा
पावलांना लोपटाळते धूळ
हवा बिलगते धावत येऊन
नुसतं हात लावला की करतात
भिंती-दारं कितीक दिसांचं हितगुज
दिवसभर आनंदानं गदगदून झालं की
गोळा करतं सगळीकडून काळोख
दुनियाभर फिरून आलेल्या
शरीर-मनावर पांघरायला
पुन्हा सुद्द होऊन निरोप देतं
देहाचा दगड-माती-विटा बनून
किती माया करतं घर
न बोलून...

**- अंजली ढमाळ**
भ्रमणध्वनी : ९७६२१०६६१७

## कसे सोडवावे असे बांधणे

खुले सप्तरंगी तिचे हासणे
कसे सोडवावे असे बांधणे

नजर लागते का फुलाला कधी
तिला शक्य नाही नजर लागणे

बटा मोकळ्या सोडलेल्या तिने
तिला छान जमते मला बांधणे

लखाखून उठते उन्हानेच ती
तिला का हवी व्यर्थ आभूषणे

समजणे तिला जात आहे कठिण
तिची चालली रोज पारायणे

किती शांत नाजूक हे बोलणे
जसे की फुलाने फुले वेचणे

विसरतोय मी श्वास घेणे कसा
कुणीही नसावे असे देखणे

दचकलाय अंधार माझ्यातला
तिने हे पसरले किती चांदणे...

**- सचिन अनिल मणेरीकर**
भ्रमणध्वनी : ८६०५८९१०१९

## बायका...

आवडतात मला बायका
ज्या व्यस्त असतात
स्वतःच्याच कामात
गुंग मुंग्या जशा...
नाक नाही खूपसत त्या नको तिथे
मात्र...
वाट्याला गेलं तर
हत्तीच्याही नाकाची वाट लावतात त्या...
अगदी तश्याच...!
बायका आवडतात मला...
जात...वशीला...रंग...रूप...
आणि...
स्त्रीत्वाचं भांडवल न करता
सतत कार्यक्षम राहून
संगठन करतात...
नसतो राबता सर्वत्र त्यांचा
मारत नाहीत त्या शब्दांचे डंख
मात्र...
आली त्यांच्या अस्तित्वावर गदा
तर...
रक्तबंबाळ करून सोडतात
मधमाश्यांसारखं...!
आवडतात मला अशा बायका
ज्या संघर्ष करतात
स्वतःचे अस्तित्व जपण्यासाठी
बाधा आणत नाही त्या सृजनात कुणाच्या
आणि
ओलांडली मर्यादा कुणी
तर...
वाहून नेतात त्याला पानामुळासकट
वाहून नेते शैलजा जशी...
हद्द ओलांडणाऱ्यांना...
आवडतात मला अशा बायका
ज्या जपतात आपल्या अस्तित्वाच्या खुणा.

**– प्रीती विलास जगझाप**
भ्रमणध्वनी : ९४२१७२३१९१

## जगाची रीत उफराटी

मनाला सारखी डसते जगाची रीत उफराटी
मलमपट्टी वरुन करते जगाची रीत उफराटी

तिला ठाऊक आहे की स्वभावाला दवा नाही
तरी शोधीत का फिरते जगाची रीत उफराटी

प्रसादाला न तीर्थाला तुला जी बोलवत नाही
तुझ्यावर आरती रचते जगाची रीत उफराटी

तुझ्यावर प्रेम करण्याची जरी ती भोगते शिक्षा
तुझ्यावर का तरी मरते जगाची रीत उफराटी

किती ही बोलते आता तुझ्या निर्जीव फोटोशी
अबोला जन्मभर धरते जगाची रीत उफराटी

जिता आहेस जोवर तू दखल घेणार ना कोणी
कदर मेल्यावरी करते जगाची रीत उफराटी

**– श्रीकृष्ण राऊत**
भ्रमणध्वनी : ८६६८६८५२८८

## जगण्याचा भ्रमनिरास झालेल्या माणसांसोबत

आपल्याच दुःखाला
आपलसं करत करत
कोणत्याच पराक्रमाची गाथा
सांगू नये कधी
आपल्याच जखमेच्या खपल्या
उखडत उखडत
जगत राहू नये कधी
कधी तरी का असेना
पण आपलीशीही
करता यायला हवी
दुसऱ्याच्या वेदनेची
खोल रक्तात
भिनलेली वाहती नदी
कुणाचे तरी
सुखाचे आकाश
दुभंगलेले असते कायमसाठी
कुणाची तरी
नात्याची मोडतोड होऊन
एकटेपणाच्या कोलाहलात
ऐन उमेदच हरवून गेलेली असते
कुणीतरी सगळंच गमावून
शून्यात नजर लावून
बसलेलं असतं कायमचं
त्यांच्यावर अंधारच स्वार
झालेला असतो आयुष्यभरासाठी
जगण्याचा भ्रमनिरास झालेल्या
अशा प्रत्येकाच्या सोबतीने
जगता येईल
असं कधीतरी पाहिलं जावं
आपल्याकडूनही स्वप्न

आनंदाला परक्या झालेल्या
आणि स्मशानाच्या वाटा
हव्याहव्याशा वाटणाऱ्यांच्या
कधीतरी आशा
वाढत जाव्यात जगण्याच्या
गर्भातूनच अनाथपण
घेऊन आलेल्यांना
कधीतरी आपलेपणाची
माय मिळो
ज्यांचे शब्द मुके मुके होत गेले
त्यांच्या संवादाच्या जागा
कधीतरी अंतर्मनातून
निरंतर भरून याव्यात
होत्याचं नव्हतं झालेल्या निराधारांना
त्यांच्या हक्काचं विश्व मिळो

आपली वेदना
तेवढी फुलारून आलेलीच नसते
असं भणंग आयुष्य
जगणाऱ्या माणसांएवढी
आपली स्वप्नं
तशी फार मरून गेलेलीच नसतात
सारंच उद्‌ध्वस्त होऊन
जगणाऱ्या माणसांसारखी
आपलं नातं एवढं
विस्कटलेलंही नसतं की
एकटेपणातून अचानक
जगण्यातून उठून जातात
काही माणसं
आपल्या मनाची फुललेली
असतेच पालवी
अगदी पानझडीच्या दिवसातही
म्हणूनच व्हावा कुणाचाही आधार
कुणाचाही एक एक ऋतू
गळण्याआधी
कुणाचं अखेरचं जगण्याचं
सरपण जळण्याआधीच!

**– अजय कांडर**
भ्रमणध्वनी : ९४०४३९५१५५

# झाडाची मुकसंमती?

झाड मुके असल्याचा
तो फायदा घेत आला आहे...

पानं तोडली तरी
त्याला कोणी रागावत नाही
कुणाला पुष्पगुच्छ देण्यासाठी
तो फुलं तर सर्रास तोडत असतो
मुखशुद्धीसाठी
वा आजारात जीवनसत्त्व मिळवण्यासाठी
फळेही हक्काने तोडून घेतो...

बंगला बांधताना
वा वाट तयार करताना
वाटेत आलीत झाडं तर
ती उपटून बिनधास्त बाजूला करतो
शक्य झालेच तर
अन्यत्र पुन:रोपण करतो...

झाड कुरबुर करत नाही
स्थलांतरित होतानाही...
नाहीतर त्याचे सहज सरपण होते
अन् ते नेहमीप्रमाणे बनून राहते मूकप्रेक्षक...

सत्पात्री दान करूनही
हळहळ येते झाडाच्या वाटेला
याची त्याला मुळीच नसते पर्वा;
अमलात आणणे सुरूच ठेवतो
झाड ओरबाडण्याचा त्याचा दुष्ट इरादा;
झाडाची पूर्वपरवानगी घेण्याची
उद्‌भवत नसतेच गरज...

निरपराध असूनही
ते कधीच करू शकत नाही
कुठेही त्याच्याविरुद्ध फिर्याद...
युगानुयुगे सर्वांग अर्पण करणारे
हे झाड तर उदार आहे
कर्णाहून कितीतरी पटीने अधिक,
खिन्न अश्वत्थाम्यासारखी
खंबीरपणे जखम सांभाळत...

तो निर्णय घेतो आहे एकतर्फी
हिरवाई नेसलेले जंगल
चतुराईने नेस्तनाबूत करण्याचा
जणू झाडाची मूकसंमती गृहीत धरून...

अजून
किती दिवस ती मुकी राहणार आहेत
त्याच्या पथ्यावर पडत;
स्वत:चीच सावली हरवत
दरीत, डोंगरावर, नदीच्या काठाशी,
विशेष धक्कादायक म्हणजे
त्याच्याही गावातून जागोजागी...

झाड होत कुणीतरी आता करावा नां
पर्वत हलवणारा आक्रोश...

**– सतीश लोथे**
भ्रमणध्वनी : ९०७५१३३५३३

# पुस्तकपरिचय

## प्रा. प्रतिभा बिश्वास




### एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी

संगीता अरबुने हे मराठी साहित्य विश्वातील प्रथितयश असं नाव. वैविध्यपूर्ण व वाचकांच्या मनाला साद घालणारं असं त्यांचं लेखनकार्य निरंतर सुरू आहे. त्यांचा 'एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी' हा नुकताच प्रसिद्ध झालेला कथासंग्रह हातात आला आणि पहिल्या कथेतच वाचक हरवत जातो. प्रत्येकाला त्याच्या गतकाळातील आठवणींचा धांडोळा घेण्यास प्रवृत्त करणारी 'आई तू का गं गेलीस...' ही करुण कथा. त्यामुळे हे पुस्तक शहरी गोंधळात आणि आधुनिक विषयांमध्ये हरवलेल्या मराठी साहित्याला एक वेगळी, शांत आणि संवेदनशील दिशा दाखवणारे ठरते. वाचकाला आपल्या भावविश्वात खेचून घेते, हेच या पुस्तकाचं यश म्हणावं लागेल. तेही केवळ नॉस्टॅल्जिया नाही, तर जगण्याच्या खोल जाणिवांना स्पर्श करणाऱ्या आठवणींच्या माध्यमातून. पुस्तकातील प्रत्येक लेख हा स्वतंत्र आठवणींचा कोपरा आहे. कधी घरातील स्त्रिया, कधी बालपणीचे प्रसंग, कधी ऋतूंची लय किंवा गावाकडच्या जगण्याची साधी, पण अर्थपूर्ण जाण- यातून त्यांचा स्वतःला शोधण्याचा प्रवास दिसतो. या पुस्तकाची सर्वात मोठी ताकद म्हणजे बोलीभाषेचा सुगंधी वापर, संवेदनशील लेखनशैली आणि निखळ प्रामाणिकपणा व सोप्या वाक्यांची भावनेशी जुळणारी मांडणी आणि रोजच्या आयुष्यातील क्षणांना साहित्यिक उंची देणारी शैली. त्यांच्या शब्दात नुसती वर्णनात्मक नाही तर खऱ्या भावना व्यक्त करणारी आत्मीयता आहे.

या पुस्तकात फक्त ९ कथा आहेत. कुमारवयीन प्रेमापासून तर प्रेम हा असा एक मानसिक प्रवास आहे, हे दिसून येतं. जगण्याच्या एका धाग्यातून दुसऱ्या

धाम्यात जाताना सहजता दिसते. परंतु अमूर्ततेवर विश्वास असलेल्या या लेखिकेने स्त्री–पुरुष नातं विशद करताना तिलाही कृष्ण हवा असा अंतःप्रवाह कायम ठेवला आहे.

शब्दालय प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केलेले असून अतिशय सुरेख मुखपृष्ठ साजेसं असंच.

**एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी** – संगीता अरबुने
पृष्ठे – १५०; किंमत – रु. ३००/-
प्रकाशक – शब्दालय प्रकाशन




## अभिरामप्रहर

आजच्या आधुनिक यंत्रयुगात, ज्यात वेगवान विचार, डिजिटल भाषा, वाढलेले इंग्रजाळलेपण अशा काळात मराठी कवितासंग्रह असं एक शांत, मोकळं पण अंतर्मुख करणारं काव्यविश्व देतो. 'अभिरामप्रहर' हा भारती बिर्जे–डिग्गीकर यांचा काव्यसंग्रह नक्कीच काव्यरसिकांसाठी मेजवानी ठरणारा आहे.

यातील कविता काही व्यक्तिगत–भावनिक आहेत. काव्यरसिकांना त्या अतिशय जवळच्या वाटतील तर काहींना त्या भावनेचा अनुभव नसल्याने ते कदाचित त्याच्याशी कनेक्ट होऊ शकणार नाहीत. जसं–

*नशीबवान होती ती तिच्या जन्माआधीपासून*
*आई–बाबांनी तिच्यासाठी घेतलं होतं वाहून.*
*चाला–बोलावं वावरावं कसं न्यून कमी लेखून*
*आनंदात कसं जगावं दिलं आखून–रेखून.*

पण असं आनंददायी आयुष्य व आई–बाबा सर्वांना लाभतात असं नाही.

'अभिरामप्रहर' हे एक कथाकाव्य आहे. निवेदन, कथन, चिंतन, संवाद यांच्या सहसंवादातून ते पुढे जाते, यातच त्याचं वेगळेपण आहे. यातून त्याचे विलोभनीय, लयबद्ध विभोर भाव काव्यरसिकांना जाणवतात.

या कथाकाव्यात देवी हे प्रमुख पात्र म्हणून, कवितेतील नायिका तिचं अधूरं राहिलेलं प्रेम, हव्या असलेल्या जिवलगाचे भास सर्वत्र होतात अन् कातर मनाने ती आतल्या आत त्याला साद घालत राहते.

ती स्वतःला कामात बुडवून घेते तरी तिला जीवघेणा एकटेपणा जाणवतो.

भावाच्या अचानक अपघाती मृत्यूनंतर संपूर्ण कुटुंबावर पसरलेली शोककळा व्यक्त करताना कवयित्री म्हणते,

*उलमणारं जीवन जेव्हा हिरावून नेतं मरण*
*तेव्हा कळतात अर्थ खरे मूळ कार्यकारण*

देवीचा भाऊ, प्रांजळ, आदिनाथ तोफी या व्यक्तिरेखा या काव्यसंग्रहात अधिक रंग भरतात व स्वतःची वेगळी जागा निर्माण करतात.

भारतीताईंच्या कवितेचा पोत मुक्तछंदात्मक आहे. त्यामुळेच त्या बऱ्याचदा अक्षरगणवृत्तापासून ते मात्रावृत्तांत लेखन करताना आढळतात. परंतु अभिरामप्रहर या कथाकाव्यात त्यांनी विशिष्ट वृत्तयोजना केलेली नाही.

*'तिला लाभत जातात कुणीतरी अधांतरातील आप्त*
*तिच्यासारखे अंतर्बाह्य कवितारतीने व्याप्त'* किंवा
*'देवी थांबली आहे घरी एक महिना होऊन गेला*
*आई-वडिलांच्या रिक्त मनात सामावलेय तिला'*

या काव्यपंक्ती आर्या, साकी वृत्ताच्या जवळ जाणाऱ्या वाटतात.

आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासात दीर्घ कथाकाव्याची परंपरा सशक्त नाही. प्रज्ञा दया पवार व कविता महाजन यांची अलीकडची काव्ये उल्लेखनीय कथाकाव्ये म्हणता येतील. भारतीताईंचे अभिरामप्रहर एक चिंतनशील कथाकाव्य म्हणून कथाकाव्याच्या परंपरेत आवर्जून उल्लेखले जाईल, याचा विश्वास वाटतो.

अभिरामप्रहर मध्ये रोजच्या आयुष्यातील प्रेम, व्यथा नाहीत. त्यात जीवन वेदना, स्मृती, सामाजिक अनुभव, अंतर्मनाचा शोध अशा अनेक स्तरांवर कवितांची गुंतवणूक आहे. त्यामुळे कोणत्याही वयोगटातील वाचक या कविता अनुभवू शकतो. कवयित्रीची लेखनशैली साधी व सरळ अर्थपूर्ण, मनाला भिडणारी आहे. तसेच साजेसं असं मुखपृष्ठ, उत्तम प्रतीचा कागद वापरल्याने पुस्तकाला अधिक उठाव आला. संग्रही ठेवावं असं हे कथाकाव्य.

**अभिराम प्रहर** – भारती बिर्जे-डिग्गीकर
पृष्ठे – ८०; किंमत – रु. २००/-
प्रकाशक – सृजनसंवाद




## कन्फेशन

विजय खाडिलकर यांनी निवृत्तीनंतर लेखन-कार्यास आरंभ केला आणि एव्हाना त्यांचे ३ कथासंग्रह व २ कवितासंग्रह, एक नाटक, कादंबरी प्रकाशित झाली. लेखनाचा प्रवास द्रुतगतीने सुरू आहे. प्रस्तुत कथासंग्रहात १५ कथा आहेत. ज्यामध्ये सामान्य लोकांच्या जीवनात घडणाऱ्या घटनांवर भाष्य केलंय. परंतु या आजूबाजूच्या सामान्य माणसांच्या मनाच्या, संबंधाच्या, चुका-संयोजनांच्या आयुष्याला उजाळा देताना या कथांचं आणखी एक कथारूप वाचकाला अनुभवास येतं. त्यातलं सौंदर्य, माणुसकी, आत्मविश्वास इतके खरे आहे की कथा वाचताना ती आपलीच कथा केव्हा होऊन जाते, कळतही नाही.

भावनांची साधी पण खोल मांडणी, कमीत कमी शब्दांत अधिक भाव निर्माण करण्याचे प्रावीण्य लेखकाने साध्य केलेले आढळते. तसेच कथांमध्ये विविधता आढळते. वेगवेगळ्या आयुष्यांचे, जाती भेदांचे, स्त्री-पुरुष अनुभवांचे संघर्ष-स्वीकाराचे संमिश्रण आहे. जसं 'पखवाज', 'ती' आहे तिथे, 'वारस', 'गोष्ट एका सिग्रेटची', 'लाल हिरवा' आणि 'तो' गेला... या कथा भाव-भावना आणि श्रद्धा पातळीवर विचार करायला लावतात. तर 'कन्फेशन', 'जीवनगौरव', 'माय हार्ट' या मानवी मनाचा गुंता उलगडणाऱ्या; 'लाल बांगडीवाला हात' ही सुद्धा विशिष्ट सामाजिक निरीक्षणावर आधारित कथा. 'गजरे', 'स्पंदन', 'प्लॅटफॉर्म' आणि 'लेव्हल-क्रॉसिंग' या तुलनेने हलक्याफुलक्या तरी रोजच्या जगण्यातला आनंद देणाऱ्या कथा आहेत.

सहज सोपी भाषाशैली हे लेखकाचे वैशिष्ट्य, आकर्षक, परिणामकारक मुखपृष्ठ या जमेच्या बाजू आहेत, तर आत्मचिंतन, कर्म, ज्योतीष, जीवनवृत्ती अशा विविध स्तरांवर विचार करताना बदलत्या काळातील माणुसकीला, आयुष्यातल्या संघर्षाला व अंतर्गत संवेदनांना हा कथासंग्रह सशक्तपणे साथ देतो.

**कन्फेशन** - विजय खाडिलकर
प्रकाशन- मधुश्री प्रकाशन
पृष्ठे - १९६; किंमत - रु. ३१०/-




## सप्तरंगी कोरिया : एक अनुभव

केपॉप डान्स वा कोरियन फुड हा आजच्या तरुणाईचा परवलीचा शब्द झालाय. कोरियन लोकांच्या मालिका तर प्रचंड लोकप्रिय झाल्या आहेत. पूर्वीच्या काळी मेड इन कोरिया म्हटल्यावर कोणत्याही वस्तूचा भाव वधारला जायचा. अशा या जगाच्या नकाशावर छोट्याशा देशाने संपूर्ण जगावर नाचातून व पदार्थांमधून अधिराज्य गाजवायला सुरुवात केली. त्यामुळे 'सप्तरंगी कोरिया' हे पुस्तक हातात आल्यावर अधाश्याप्रमाणे वाचून केव्हा संपलं कळलंही नाही.

प्रवासप्रेमींना, संस्कृती अभ्यासकांना, परदेशात राहणाऱ्या किंवा जाण्याची इच्छा असलेल्यांना हे पुस्तक नक्कीच मार्गदर्शक ठरेल; परंतु तितकेच आनंद देणारे आहे. कारण कोरिया हा देश नकाशावर न राहता जीवंत व भावपूर्ण जगासारखा मनात घर करून बसतो व कोरिया सफरीची दुर्दम्य इच्छा आपल्या मनात निर्माण करतो. कोरियामधील वास्तव्यातील आठवणी, अनुभव, रंगीबेरंगी संस्कृती यातील छटा तिच्या मनावर कसा ठसा उमटवतात याचे वर्णन सुधाताई अत्यंत प्रवाही, सोप्या भाषेत करतात. त्या फक्त माहिती देत नाही तर त्या देशातील सुंदरपण, ऊब, आपुलकी व्यक्त करतात.

सुधाताईंनी कोरियातील परंपरा, शिस्तबद्ध जीवन, नम्र वागणे, सण-उत्सव, खाद्यसंस्कृती, निसर्गाचे बदलते रूप हे तपशीलवार चित्रात्मकरीत्या प्रभावीपणे मांडले आहे. यातून भारतीय आणि कोरियन संस्कृतीतील साम्य आणि भिन्नता यांचे निरीक्षण लक्षवेधी ठरते.

स्थानिकांच्या संवादातून, त्यांच्या जीवनशैलीतून कोरियन लोकांचा वेगळा पण सुंदर चेहरा उलगडतो. यातून लेखिकेची संवेदनशीलताही दिसून येते, ही या पुस्तकाची ताकद आहे. नवीन देशात राहून मिळणारी समज, स्वीकार जुळवून घेण्याची प्रक्रिया आणि परदेशी संस्कृतीशी नाते जोडताना निर्माण होणारा भावनिक प्रवाह लेखिकेने समर्पकतेने मांडला आहे. जरूर एकदा वाचावंच.

जयंत नारळीकरसरांनी यावर समर्पक असं भाष्य केलंय, हे या पुस्तकाचं व लेखिकेचं भाग्य. 'ग्रंथाली'ने हे पुस्तक आकर्षक व समर्पक मुखपृष्ठ देऊन प्रकाशित केलंय.

**सप्तरंगी कोरिया : एक अनुभव** – सुधा हुजूरबाजार-तुंबे
प्रकाशन – ग्रंथाली
पृष्ठे – १५६; किंमत – रु. ३५०/-




## दिव्यत्वाच्या पारंब्या

महाराष्ट्र राज्याला संतांची दिव्यस्वरूप परंपरा लाभलेली आहे. समाजासाठी सर्वस्व झोकून अद्भुत काम करून गेलेल्या संत व समाजसेवकांची वेगळ्या दृष्टिकोनातून ओळख श्याम दाभाडे यांनी 'दिव्यत्वाच्या पारंब्या' या लेखसंग्रहातून करून दिली आहे. अतिशय साध्या सरळ सोप्या भाषेमुळे अशा महनीय व्यक्तींचं चरित्र नेमकेपणानं आपल्या लक्षात राहतं. पुस्तक वाचून ठेवताना चांगलं लेखन वाचल्याचं समाधान मिळतं, हे या पुस्तकाचं यश आहे. या पुस्तकातून श्याम दाभाडे यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, सकारात्मक दृष्टिकोन आणि मानवी मनाचे असंख्य कंगोरे टिपलेले दिसतात.

पुस्तकाचे तीन भाग केलेले आहेत. पहिले प्रकरण मांदियाळी यात ८ संतांच्या कार्याचा थोडक्यात परिचय केला आहे. यात आदि शंकराचार्य, माणकोजी आणि डेबुजी यांचा समावेश आहे.

दुसरे प्रकरण 'पाकळ्या' आहे. यात २२ लेख आहेत. वर्तमानपत्रांत येणाऱ्या बातम्यांतून प्रेरणा घेऊन त्यावर संशोधन करून लेखकाने सामाजिक भान जागवण्यासाठी लेख लिहिलेले दिसतात. जसं 'माती वाचवा, माटी बचाओ! रेवा अर्थात नर्मदा, कुत्र्यावर एफआरआय इत्यादी.

तिसरे प्रकरण 'रक्तटिळा' या शीर्षकाचे यात रश्मोणी राणी, बाबा हरभजनसिंग, बिरसा मुंडा या व्यक्तिमत्त्वांच्या कार्याची ओळख होते.

लेखकाला माणसं वाचायला आवडतात या अनुषंगाने त्याची माणूसयात्रा, आठवणीतील माणसं, माणूसपण विणताना ही तीन पुस्तके यापूर्वी प्रकाशित झाली असून वाचकांचा प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला आहे. या चौथ्या पुस्तकालाही वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभेल यात शंका नाही.

**दिव्यत्वाच्या पारंब्या** – श्याम दाभाडे
प्रकाशन – आदित्य प्रकाशन
पृष्ठे – १८०; किंमत – रु. २५०/-

# साहित्य शाखा

१. मुंबई मराठी साहित्य संघाचा ९०वा वर्धापनदिन शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी साजरा झाला. या समारंभास साहित्य संघाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे या अध्यक्षस्थानी होत्या. समारंभाच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ शास्त्रीय संगीत गायिका मा. आरती अंकलीकर-टिकेकर होत्या. डॉ. नरेंद्र पाठक संपादित 'साहित्य' दिवाळी विशेषांकाचे आणि श्री. अशोक बेंडखळे संपादित 'ग्लीमसेस ऑफ मुंबई मराठी साहित्य संघ' या पुस्तिकेचे प्रकाशन याप्रसंगी झाले.

मा. आरती अंकलीकर-टिकेकर (मराठी यशवंत पुरस्कार), मा. कविता मच्छिंद्र कांबळी (सहचारिणी पुरस्कार), मा. पुंडलिक पै (मनुकाका पंडित संस्था पुरस्कार), डॉ. सुकृत खांडेकर (राजकीय पत्रकार पुरस्कार), डॉ. ज्ञानेश्वर मिरगे (कै. वि.स. पागे स्मृती पुरस्कार), मा. नीलिमा कुलकर्णी (साहित्य गौरव पुरस्कार), मा. नानासाहेब खर्डे (चंद्रागिरी पुरस्कार), केशव बा. वसेकर (बालसाहित्य पुरस्कार), डॉ. सुनीता चव्हाण (कथाकार शांताराम पुरस्कार) असे विविध पुरस्कार अध्यक्ष प्रा. उषा तांबे, मुंबई मराठी साहित्य संघाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव-गांधी, प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ शास्त्रीय गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या हस्ते प्रदान केले गेले. मुंबई मराठी साहित्य संघाचे कोषाध्यक्ष श्री. प्रकाश पागे याप्रसंगी उपस्थित होते. प्रा. प्रतिभा सराफ आणि श्री. एकनाथ आव्हाड यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे समन्वयक या नात्याने डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. प्रतिभा सराफ, श्री. एकनाथ आव्हाड आणि प्रतिभा बिश्वास यांनी काम पाहिले.

२. बुधवार दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई मराठी साहित्य संघ (साहित्य शाखा) आणि कुमुद विद्यामंदिर, देवनार यांच्या संयुक्त विद्यमाने कुमुद विद्यामंदिर येथे आंतरशालेय बालकुमार साहित्य संमेलन घेतले गेले. संमेलनाचे अध्यक्ष बालसाहित्यिक सदानंद पुंडपाळ होते तर उद्घाटक अभिनेत्री श्रद्धा हांडे होत्या. या संमेलनात साने गुरुजी चित्रपट फेम बालकलाकार शर्व गाडगीळ याची मुलाखत घेतली गेली. कथाकथन या कार्यक्रमात कुमुद विद्यामंदिर तसेच महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी कथाकथन केले. कथाकथन सत्राच्या अध्यक्ष ज्येष्ठ कथा-कथनकार मेघना साने होत्या. त्यानंतर आंतरशालेय विद्यार्थ्यांचे कविसंमेलन ज्येष्ठ कवी प्रथमेश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले, ज्याला कुमुद विद्यामंदिर मराठी आणि इंग्रजी शाळा तसेच महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमासाठी प्रा. प्रतिभा सराफ, प्रा. प्रतिभा बिश्वास आणि श्री. एकनाथ आव्हाड यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला कुमुद विद्यामंदिर विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे तसेच कोषाध्यक्ष श्री. आनंद बिर्जे यांनीही

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्रीमती मीनाक्षी जयकर, श्रीमती सावित्री हेगडे, श्री. अरुण जोशी इ. मु.म.सा.सं. सदस्य उपस्थित होते.

३. मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेतर्फे प्रतिवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. बुधवार दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी 'निवेदकाच्या गावा जावे...!' या विषयावर जेष्ठ निवेदिका मा. मंगला खाडिलकर यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. अनेक कार्यक्रमांत निवेदन करताना त्यांना आलेले अनुभव आणि निवेदनादरम्यानचे खुसखुशीत किस्से ऐकण्यासाठी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुं.म.सा.सं. कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. चंद्रशेखर गोखले यांनी केले तर या कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून श्रीमती सावित्री हेगडे यांनी काम पाहिले. याप्रसंगी मुं.म.सा. संघाचे पदाधिकारी कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष आनंद बिर्जे, संघ मंदिर समिती कार्यवाह सुभाष भागवत, संघ मंदिर समिती सदस्य रोहिदास पांगे, मुं.म.सा. संघाचे सदस्य एकनाथ आव्हाड, सावित्री हेगडे, डॉ. मिलिंद जोग, अरुण फडके, अर्पणा साठे, चतुरंग प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. विद्याधर निमकर, फोटोग्राफर विजय तारी तसेच निवृत्त न्यायाधीश हेमंत गोखले, सदानंद पुंडपाळ, पत्रकार देवेंद्र भुजबळ, शांतीलाल ननावरे, डॉ. मनोज वराडे, कमलाकर राऊत इ. साहित्यिक तसेच मान्यवर रसिक उपस्थित होते.

४. 'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि 'पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे मुलुंड वाणिज्य महाविद्यालय' यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा पंधरवडा' निमित्ताने आयोजित सुप्रसिद्ध वृत्त निवेदिका, लेखिका आणि व्याख्याती दीपाली केळकर यांचा 'शब्दांच्या गावा जावे' हा कार्यक्रम २१ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात सादर झाला. या कार्यक्रमात शब्दांविषयीच्या गमतीजमतींसोबत शब्दांचे महत्त्व अधोरेखित केले, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मुं.म.साहित्य संघ कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांना महाविद्यालयातर्फे लोकमान्य टिळक लघुशिल्पकृती देऊन खास स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पवार, मुं.म.साहित्य संघ कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ, मराठी भाषा संवर्धन समन्वयक प्रा. सुहासिनी कीर्तिकर, महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. राजश्री देशपांडे यांचीही समायोजित भाषणे झाली. प्रमुख ग्रंथपाल अमेय रानडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मीनाक्षी जयकर, शैला सामंत, ज्योती कपिले इ. मुं.म.सा. संघाचे सदस्य उपस्थित होते.

५. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने लघुवाद न्यायालय, मुंबई येथे २७ जानेवारी २०२६ रोजी मराठी भाषा संवर्धन समिती सदस्य श्रीमती मीनाक्षी जयकर यांचे 'न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी व परिणामकारक वापर' या विषयावर व्याख्यान झाले.

**– प्रा. प्रतिभा सराफ**

कार्यवाह, मुंबई मराठी साहित्य संघ (साहित्य शाखा)

# मुंबई मराठी साहित्य संघ

## डॉ. अ.ना. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई ४०० ००४

### नियामक मंडळ २०२५-२०३०

**विश्वस्त**

श्री. अभिजित गजेंद्रगडकर • श्री. अभय भालेराव • श्री. उदय कुलकर्णी

**अध्यक्ष**

प्रा. उषा तांबे

**उपाध्यक्ष**

डॉ. अनिल बांदिवडेकर • श्री. सुदेश हिंगलासपूरकर • श्री. विजय केंकरे • श्री. अशोक कोठावळे
श्रीमती रेखा नार्वेकर • श्री. जयराज साळगांवकर • डॉ. मधुकर वर्तक

**सन्माननीय सल्लागार**

श्री. अशोक बेंडखळे • श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर

**कार्यकारी मंडळ**

कार्याध्यक्ष - डॉ. उज्ज्वला मेहंदळे • कोषाध्यक्ष - श्री. आनंद बिर्जे
प्रमुख कार्यवाह - डॉ. अश्विनी भालेराव-गांधी

**कार्यवाह**

साहित्यशाखा- प्रा. प्रतिभा सराफ • नाट्य शाखा - श्री. ज्ञानेश पेंढारकर
संघ मंदिर समिती - श्री. सुभाष भागवत

**सदस्य**

श्री. एकनाथ आव्हाड • प्रा. प्रतिभा बिश्वास • डॉ. मिलिंद जोग
श्री. रोहिदास पांगे • श्री. अरुण फडके • श्रीमती अर्पणा साठे

**स्वीकृत सदस्य**

श्री. उमेश पडळकर • श्री. चंद्रशेखर गोखले • श्रीमती मीनाक्षी जयकर

**नियामक मंडळ सदस्य**

श्री. गणेश आचवल,
श्रीमती संगीता अरबुने,
श्री. एकनाथ आव्हाड,
श्रीमती प्रियांका बांदिवडेकर,
श्रीमती दिपाली भागवत,
श्री. सुभाष भागवत,
श्री. मनन भालेराव,
डॉ. अश्विनी भालेराव-गांधी,
प्रा. प्रतिभा बिश्वास,
श्री. दिलीप भाटवडेकर,
श्री. चंद्रकांत भोंजाळ,
श्री. विजयराज बोधनकर,
श्रीमती धनश्री धारप,
श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. रवींद्र गोळे,
श्रीमती मीनाक्षी जयकर,
डॉ. मिलिंद जोग,
श्री. अरुण जोशी,
श्रीमती ज्योती कपिले,
श्री. प्रकाश कामत,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर,
श्री. विकास परांजपे,
प्रा. नरेंद्र पाठक,
श्री. प्रमोद पवार,
श्री. ज्ञानेश पेंढारकर,
डॉ. अमेय पुरंदरे,
श्री. अरुण फडके,
प्रा. प्रतिभा सराफ,
श्रीमती अर्पणा साठे,
श्री. गीतेश शिंदे
डॉ. अनुपमा उजगरे,
श्री. चंद्रशेखर वझे

**स्वीकृत सदस्य**

श्री. आनंद बिर्जे • श्री. उमेश पडळकर • श्री. तनय गांधी • श्री. रोहिदास पांगे • श्री. हेमंत जोशी

मुंबई मराठी साहित्य संघाने प्रकाशित केलेला
**'बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती'** या ग्रंथाची पुणे विद्यापिठाच्या एम.ए.
मराठी द्वितीय वर्षासाठी संदर्भग्रंथ म्हणून निवड झाली आहे.




**मुंबई साहित्य संघाचे प्रकाशन**

# बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती

संपादक : **डॉ. उज्ज्वला मेहेंदळे** । सहसंपादक : **एकनाथ आव्हाड**

**मूल्य ४०० रुपये**

**बालसाहित्य मुळापासून समजून घेणे; त्यावर सर्वंकष विचार होणे आजही फार गरजेचे आहे. याच उद्देशाने मुंबई मराठी साहित्य संघाने 'बालसाहित्य : स्वरूप आणि व्याप्ती' हा ग्रंथ संपादित केला आहे. या ग्रंथात बालसाहित्याबद्दल आस्था असणाऱ्या जाणकारांनी बालसाहित्यातील विविध विषयांवरील लेखांतून आपले विचार मांडले आहेत. हे विचार बालसाहित्य अभ्यासकांना नक्कीच उपयुक्त ठरतील. एकूणच बालसाहित्याच्या पूर्वपीठिकेपासून ते आजच्या बालसाहित्यापर्यंतचा अखंड प्रवास या ग्रंथातील विविध लेखांतून आपल्याला वाचायला मिळेल.**

---

**मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४**
**भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६**